सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
धाराशिव | रविवार, १० मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ६२ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




# बंगालमध्ये परिवर्तन पर्वाचा प्रारंभ

**शुभेन्दू अधिकारींनी घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ ● भाजपाचे राज्यातील पहिले मुख्यमंत्री ● पाच आमदारांनीही घेतली शपथ ● पंतप्रधानांसह २० राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित**



◆ **कोलकाता, ९ मे**

पश्चिम बंगालमध्ये भाजपाच्या पहिल्या सरकारचे मुख्यमंत्री म्हणून शुभेन्दू अधिकारी यांचा शपथविधी सोहळा शनिवारी ब्रिगेड परेड मैदानावर लाखो नागरिकांच्या उपस्थितीत पार पडला. ही बंगालच्या परीवर्तनाची नांदी ठरणार आहे. त्यांनी बंगाली भाषेत शपथ घेतली. त्यांना राज्यपाल आर. एन. रवी यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी पाच आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. ऐतिहासिक शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्रांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह २० राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

बंगालच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने तृणमूल काँग्रेसचा धुव्वा उडवत स्पष्ट बहुमतासह ऐतिहासिक विजय मिळवला. विजयाचे शिलेदार शुभेन्दू अधिकारी यांनी लाखो समर्थकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत पक्षाचे आमदार दिलीप घोष, अग्निमित्र पॉल, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू आणि निशित प्रामाणिक यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अधिकारी यांनी पंतप्रधान मोदी यांचा आशीर्वाद घेतला.

तत्पूर्वी, त्यांनी मंचावर रवींद्रनाथ टागोर यांच्या १६५ व्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. शपथ सोहळ्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी रोड शो केला, त्यांच्यासोबत शुभेन्दू उपस्थित होते. बंगालमधील विविध भागातून लाखोंच्या संख्येने नागरिक सोहळ्यासाठी आले होते. प्रथेनुसार ममता बॅनर्जी यांनाही शपथविधी सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते, मात्र अपेक्षेप्रमाणे त्या आल्या नाहीत. (वृत्तसंस्था)



शुभेंदू अधिकारी यांच्या शपथविधीदरम्यान भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते माखनलाल सरकार यांची गळाभेट घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिवादन केले. माखनलाल सरकार हे श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या काळातील कार्यकर्ते आहेत

### शपथ घेणाऱ्या इतर मंत्र्यांची कारकीर्द

- **दिलीप घोष** : खडगपूर सदर मतदारसंघातून दुसऱ्यांदा आमदार झाले आहेत. ते भाजपाचे सरचिटणीस आणि प्रदेशाध्यक्षही राहिले आहेत.
- **अग्निमित्रा पॉल** : २०२१ मध्ये पहिल्यांदा आसनसोल दक्षिण मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. त्यांनी २०२२ ची आसनसोल लोकसभा पोटनिवडणूक आणि २०२४ ची मेदिनीपूर लोकसभा निवडणूकही लढवली.
- **अशोक कीर्तनिया** : अशोक कीर्तनिया हे बनगाव उत्तर मतदारसंघातून आमदार आहेत. ते मतुआ समुदायाचे आहेत. ते राजकारणी आणि व्यावसायिक आहेत.
- **खुदीराम टुडू** : खुदीराम रानीबांध (एसटी) मतदारसंघातून भाजपाचे आमदार आहेत. ते पेशाने शिक्षक होते. पदवीधर असलेले टुडू दीर्घकाळापासून आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी कार्यरत आहे.
- **निशिथ प्रामाणिक** : मथाभंगा विधानसभा मतदारसंघातून आमदार आहेत. ते २०२६ मध्ये पहिल्यांदा आमदार झाले. यापूर्वी २०१९ मध्ये कूचबिहार लोकसभा मतदारसंघातून खासदार होते. केंद्रात गृह राज्यमंत्री आणि युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयात राज्यमंत्री राहिले आहेत.



कोलकाता येथील ब्रिगेड परेड ग्राऊंडवर आगमन होताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगालमधील जनताजनार्दनाला दंडवत घालून अभिवादन केले

## विचारपुष्प



संपूर्ण समाजाचे सुख ते आपले सुख, संपूर्ण चराचर सृष्टीचे सुख ते आपले सुख या मर्यादिपर्यंत आत्मानुभूती पोहोचते. त्यामुळे व्यक्ती व समाज हा संघर्ष होत नाही. निसर्गाचा व समाजाचा समतोल राहिला तर ते दोन्ही मिळून प्रत्येक व्यक्तीला सुखी करू शकतात.

**स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### ममतांनी बदलला 'एक्स'वरील बायो



**कोलकाता** : तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी एक्सवरील त्यांच्या प्रोफाईलमध्ये बदल केला असून, आता तिथे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री (१५ वी, १६ वी आणि १७ वी विधानसभा), असे लिहिले आहे. ममता बॅनर्जी यांनी बायोमध्ये संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस, असा बदल केला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री (१५ वी, १६ वी आणि १७ वी विधानसभा), असे लिहिले आहे. यापूर्वी तिथे केवळ संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस. माननीय मुख्यमंत्री, पश्चिम बंगाल, असे लिहिलेले होते.

### उत्तरप्रदेशात आज मंत्रिमंडळाचा विस्तार

**लखनौ** : उत्तरप्रदेशातील बहुप्रतीक्षित मंत्रिमंडळ विस्ताराबाबतच्या चर्चांना आता पूर्णविराम लागले असून, रविवारी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. सहा आमदार जन भवन येथे दुपारी ३:३० वाजता मंत्रिपदाची शपथ घेतील. या विस्तारात अनेक मंत्र्यांच्या खात्यांतही बदल होण्याची शक्यता आहे.



मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शनिवारी सायंकाळी राज्यपाल आनंदीबेन पटेल यांची भेट घेऊन त्यांना मंत्र्यांची यादी सादर केली. या भेटीदरम्यान, योगी आदित्यनाथ यांनी राज्यपालांना लालचंद राम लिखित 'इंडियन नॉलेज ट्रॅडिशन्स कॉन्सेप्ट' हे पुस्तकही भेट दिले. वास्तवात, उत्तरप्रदेशमध्ये सध्या ५४ मंत्री आहेत. सहा मंत्रिपदे रिक्त आहेत. एकूण क्षमता ६० असू शकते. सूत्रांनुसार, मंत्रिमंडळात समाविष्ट होऊ शकणाऱ्या सहा नवीन चेहऱ्यांमध्ये कृष्णा पासवान, पूजा पाल, मनोज पांडे, भूपेंद्र चौधरी, अशोक कटारिया आणि रोमी साहनी यांचा समावेश आहे.

### केरळच्या मुख्यमंत्रिपदासाठी हालचालींना वेग

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शुभेन्दू अधिकारी यांनी शपथ घेतली असताना केरळमध्ये काँग्रेसला अद्याप मुख्यमंत्री निवडता आला नाही. राज्याचा नवा मुख्यमंत्री निवडण्यासाठी काँग्रेसमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. केरळची राजधानी असलेल्या तिरुवनंतपुरम्‌मध्ये काँग्रेसला मुख्यमंत्री निवडणे शक्य न झाल्याने आता दिल्लीत हालचाली सुरू झाल्या आहे. १४० सदस्यांच्या केरळ विधानसभेत काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीने (यूडीएफ) स्पष्ट बहुमत मिळवले आहे. राज्यात मुख्यमंत्रिपदासाठी तीन प्रमुख दावेदार आहेत. यात के. सी. वेणुगोपाल, व्ही. डी. सतीशन् आणि रमेश चेन्नीथला यांचा समावेश आहे. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचा नवा नेता निवडण्यासाठी काँग्रेसने केंद्रीय निरीक्षक म्हणून अजय माकन आणि मुकुल वासनिक यांना केरळला पाठवले. या नेत्यांनी विधिमंडळ पक्षाचा नेता निवडण्यासाठी काँग्रेसच्या आमदारांची बैठक घेतली तसेच सर्व आमदारांशी स्वतंत्रपणे चर्चाही केली. बहुतांश आमदारांनी वेणुगोपाल यांच्या नावाला पसंती दिल्याचे समजते.

# विचारशून्यता हीच मोठी समस्या



पुण्यभूषण फाऊंडेशनतर्फे वाहन उद्योग क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल २०२६चा पुण्यभूषण पुरस्कार आज ज्येष्ठ उद्योगपती आणि फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया यांना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी (डावीकडून) परशुराम वाडेकर, चंद्रकांत पाटील, इंदिरा अभय फिरोदिया, डॉ. अभय फिरोदिया, नितीन गडकरी, ज्योतिरादित्य शिंदे, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रतापराव पवार आणि डॉ. शां.ब. मुजुमदार

**नितीन गडकरी यांचे प्रतिपादन**

**शाश्वत मूल्यांचा अंगीकार आवश्यक**

◆ **पुणे, ९ मे**

विचारभिन्नता ही समाजासाठी समस्या नसून विचारशून्यता हीच खरी चिंता आहे. त्यामुळे गौतम बुद्ध, भगवान महावीर तसेच रामायण, महाभारत आणि भगवद्गीतेतील शाश्वत मूल्यांचा अंगीकार केल्यावरच जगाला योग्य दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी केले.

पुण्यभूषण फाऊंडेशनतर्फे ज्येष्ठ उद्योगपती तथा फोर्स मोटर्सचे चेअरमन डॉ. अभय फिरोदिया यांना वर्ष २०२६ चा पुण्यभूषण पुरस्कार गडकरी यांच्या हस्ते बालगंधर्व रंगमंदिरात प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि पुण्यभूषण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, सिंबायोसिस शिक्षण समूहाचे संस्थापक - संचालक डॉ. शां.ब. मुजुमदार, प्रतापराव पवार, उपमहापौर परशुराम वाडेकर, व्यावसायिक गजेंद्र पवार आणि पुण्यभूषण फाऊंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सतीश देसाई उपस्थित होते.

ज्योतिरादित्य शिंदे यांनी आपल्या भाषणात डॉ. फिरोदिया यांचा गौरव करताना, हा सन्मान केवळ व्यक्तीचा नसून मूल्यांचा आणि विचारांचा असल्याचे सांगितले. डॉ. फिरोदिया यांनी उद्योगासोबतच समाजकार्यातही मोलाचे योगदान दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. अभय फिरोदिया यांनी आपल्या उद्योग प्रवासाचा आढावा घेतला. कठीण परिस्थितीत उद्योग उभा ठेवताना मोठे प्रयत्न करावे लागल्याचे सांगत त्यांनी कुटुंबीयांच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत विविध संस्थांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी देशभक्तीपर गीताद्वारे स्वातंत्र्यवीरांना अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. सतीश देसाई यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. समिरा गुजर-जोशी यांनी केले तर, आभार काका धर्मावत यांनी मानले. (तभा वृत्तसेवा)

# राजा सुब्रमणी नवे सीडीएस, स्वामीनाथन नौदल प्रमुख

**केंद्र सरकारकडून घोषणा ● ३० रोजी स्वीकारणार पदभार**



◆ **नवी दिल्ली, ९ मे**

केंद्र सरकारने नवीन संरक्षण (सीडीएस) आणि नवीन नौदलप्रमुखांच्या नियुक्तीची शनिवारी घोषणा केली. लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी (निवृत्त) यांची देशाचे पुढील सीडीएस म्हणून, तर व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामीनाथन यांची भारतीय नौदलाचे नवे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सध्याचे सीडीएस अनिल चौहान यांची जागा सुब्रमणी, तर ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी यांच्या जागी कृष्ण स्वामीनाथन यांची नियुक्ती करण्यात आली. जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर, लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी ३० मे रोजी सीडीएसपदाचा कार्यभार स्वीकारतील. त्यांच्याकडे लष्करी व्यवहार विभागाच्या सचिवपदाची जबाबदारीही असेल.

भारताच्या तीन सशस्त्र दलांमध्ये समन्वय साधणे आणि राष्ट्रीय सुरक्षा आणि लष्करी धोरणाशी संबंधित महत्त्वाच्या निर्णयांवर सरकारला सल्ला देण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. (वृत्तसंस्था)

### लेफ्टनंट जनरल सुब्रमणी यांची कारकीर्द

लेफ्टनंट जनरल राजा सुब्रमणी हे जवळपास चार दशकांचा लष्करी अनुभव असलेले अधिकारी आहेत. सप्टेंबर २०२५ पासून राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी लष्कराचे उपप्रमुख आणि सेंट्रल कमांडचे जीओसी-इन-सी म्हणूनही काम पाहिले आहे. याशिवाय ते लष्कर उपप्रमुखपदावरही कार्यरत होते. त्यांचे सामरिक ज्ञान आणि व्यापक अनुभव लक्षात घेऊन सरकारने त्यांची सीडीएसपदी निवड केली.

### व्हाईस ॲडमिरल स्वामीनाथन यांचा कार्यकाळ

व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामीनाथन ३१ मे २०२६ रोजी भारतीय नौदलाच्या नौदल प्रमुख पदाचा कार्यभार स्वीकारतील. सध्या ते मुंबईतील पश्चिम नौदल कमांडचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत असेल. त्यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत आणि अनेक मोठ्या सागरी सुरक्षा मोहिमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांचे आंतरराष्ट्रीय लष्करी शिक्षण आणि अनुभव भारतीय नौदलासाठी महत्त्वपूर्ण मानले जातात.

# अग्नी-६ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**दहा हजार किमीपेक्षा अधिक मारक क्षमता ● संपूर्ण चीन भारताच्या टप्प्यात**

◆ **नवी दिल्ली, ९ मे**

भारताची संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केलेल्या प्रगत अग्नी-६ क्षेपणास्त्राची 'मल्टिपल इंडिपेंडंटली टार्गेटेड री-एन्ट्री व्हेईकल' (एमआरव्ही) प्रणालीसह यशस्वी चाचणी शनिवारी घेण्यात आली. ओडिशातील डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून प्रक्षेपित करण्यात आलेल्या अग्नी-६ क्षेपणास्त्राने एकाचवेळी अनेक लक्ष्यांवर मारा केला. याची मारक क्षमता दहा हजारपेक्षा अधिक किमीपर्यंत असून, संपूर्ण चीन भारताच्या कक्षेत आले आहे.



डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून प्रक्षेपित झालेले क्षेपणास्त्र हिंद महासागर क्षेत्रातील मोठ्या भौगोलिक परिसरात विखुरलेल्या वेगवेगळ्या लक्ष्यांवर पेलोड्स अचूकपणे डागण्यात आले. जमिनीवरील आणि जहाजांवरील अनेक स्थानकांद्वारे क्षेपणास्त्राच्या प्रक्षेपणापासून ते लक्ष्यावर धडकण्यापर्यंतच्या संपूर्ण मार्गाचा मागोवा घेण्यात आला. या चाचणीची सर्व उद्दिष्टे यशस्वीरीत्या पूर्ण झाली, असा दुजोरा संरक्षण मंत्रालय आणि डीआरडीओने 'एक्स'वरील पोस्टमधून दिला. (वृत्तसंस्था)

### सुप्रिया सुळे यांच्या वाहनाला द्रुतगती मार्गावर अपघात

◆ **पुणे, ९ मे**

बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या वाहनाचा अपघात मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर झाला. गाडीतील सर्वजण सुखरूप असल्याची माहिती सुळे यांनी सोशल मीडियावरून दिली आहे. सुप्रिया सुळे आणि त्यांचे सहकारी वाहनातून द्रुतगती मार्गावरून प्रवास करत होते. यावेळी त्यांच्या वाहनाचा अपघात झाला. या अपघातात कोणालाही इजा झाली नाही. ज्या वाहनाने सुळे यांच्या वाहनाला धडक दिली, त्या वाहनाच्या क्रमांकाच्या पाटीचे छायाचित्र त्यांनी सोशल मीडियावर प्रसारित केले आहे. (तभा वृत्तसेवा)

# व्हाईट हाऊसमध्ये वैदिक मंत्रोच्चार

**मे महिन्यातील पहिल्या गुरुवारी साजरा होतो राष्ट्रीय प्रार्थना दिन**

◆ **वॉशिंग्टन, ९ मे**

अमेरिकी व्हाईट हाऊसमध्ये नुकताच वैदिक मंत्रोच्चार झाला. निमित्त होते ते राष्ट्रीय प्रार्थना दिनाचे. एका मंदिरातील स्वयंसेवकाने खणखणत्या आवाजात वैदिक मंत्रोच्चार केले.

न्यू जर्सीमधील रॉबिन्सविले येथील बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्था मंदिरातील स्वयंसेवकाने गुरुवारी व्हाईट हाऊसमध्ये आयोजित या कार्यक्रमात भाग घेतला. वैश्विक शांतीचे आवाहन करणाऱ्या यजुर्वेदातील शांतीपाठाचे पठण करताना, या स्वयंसेवकाने उपस्थित असलेल्या सर्वांना डोळे मिटून हात जोडण्याचे आवाहन केले. शांतीपाठ स्वर्ग, आकाश, पृथ्वी, पाणी, वनस्पती, झाडे, देव आणि स्वतःसह विविध क्षेत्रांमध्ये शांतीचे आवाहन करतो.

संपूर्ण सॉव्हरेन फेलोशिप, न्यू जर्सीमधील रॉबिन्सविले येथील स्वामीनारायण उक्षरा काउंटी आणि आमचे गुरू, गुरू हरी मोहन स्वामी महाराज यांच्या वतीने, आम्ही या संधीबद्दल तुमचे आभार मानतो, असे तो स्वयंसेवक म्हणाला.

### राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा विशेष संदेश

या राष्ट्रीय प्रार्थना दिनानिमित्त, अमेरिकेच्या प्रार्थना, श्रद्धा आणि सर्वशक्तिमान परमेश्वरावरील विश्वासाच्या चिरस्थायी परंपरेचा सन्मान करतो आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्याची २५० गौरवशाली वर्षे साजरी करत असताना, देवाने आपल्या लोकांवर आणि देशावर केलेल्या अगणित आशीर्वादांना कधीही न विसरण्याची प्रतिज्ञा करतो, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संदेशात म्हणाले.



१९५२ मध्ये अमेरिकी काँग्रेसने स्थापित केलेल्या एका सार्वजनिक कायद्यानुसार, संपूर्ण अमेरिकेत मे महिन्याच्या पहिल्या गुरुवारी राष्ट्रीय प्रार्थना दिन साजरा केला जातो. बीएपीएसला गुरुवारी व्हाईट हाऊस येथे झालेल्या राष्ट्रीय प्रार्थना दिनात सहभागी होण्याचा सन्मान मिळाला. तिथे बीएपीएसच्या एका स्वयंसेवकाने शांतता आणि एकतेसाठी हिंदू प्रार्थना केली. अमेरिका २५० वर्षांच्या वाटचालीस येत असताना, असे क्षण आपल्याला आठवण करून देतात की श्रद्धा, सेवा आणि सामायिक मूल्ये आपल्या समाजाला अधिक मजबूत करत राहतात, असे बीएपीएस पब्लिक अफेअर्सने शुक्रवारी एका समाज माध्यम पोस्टमध्ये म्हटले आहे. गुरुवारी ७५ वा वार्षिक राष्ट्रीय प्रार्थना दिन पार पडला. यामध्ये २०२६ च्या राष्ट्रांमध्ये देवाचे नामस्मरण करा, सर्व पिढ्यांमध्ये त्याचा शोध घ्या, या संकल्पनेवर आधारित, सर्व ५० राज्ये, अमेरिकेची प्रदेश आणि वॉशिंग्टन, डीसी मधील हजारो समुदायांमध्ये प्रार्थना सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. (वृत्तसंस्था)

# विजय यांनी केली बहुमताची जमवाजमव

**आज घेणार शपथ**

◆ **चेन्नई, ९ मे**

तामिळनाडूमध्ये सरकार स्थापनेबाबतचा संभ्रम आता दूर झाला आहे. जोसेफ विजय यांनी बहुमताची जमवाजमव केली असून, सकाळी १० वाजता मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील.



शनिवारी रात्री उशिरा राज्यपालांशी भेट घेतल्यानंतर त्यांनी शपथविधीची वेळ निश्चित केली आहे.

विजय यांच्या नेतृत्वाखाली टीव्हीकेने तामिळनाडू विधानसभेत १०८ जागा जिंकल्या. टीव्हीकेकडे बहुमत नसल्यामुळे तामिळनाडूमध्ये राजकीय अनिश्चितता निर्माण झाली होती. विजय यांनी ९ मे रोजी राज्यपालांची चौथी भेट घेतली. मात्र, त्यांना बहुमताचा आकडा गाठणारी आमदारांची यादी आणण्यास राज्यपालांनी सांगितले. होते. विजय चेन्नई येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये आयोजित सोहळ्यात शपथ घेतील.

**थिरुमावलवन यांनी वाढवली उत्सुकता**

तामिळनाडूमध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने व्हीसीकेचे अध्यक्ष थोल थिरुमावलवन यांनी उत्सुकता वाढवली. त्यांनी पक्षाचे माजी नेते आणि विजय यांचे निकटचे सहकारी अधव अर्जुन यांना पाठिंब्याचे पत्र सुपूर्द केले. त्यामुळे सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. या पाठिंब्यानंतर, टीव्हीकेचे सरचिटणीस अधव अर्जुन यांनी इन्स्टाग्रामवर व्हीसीकेच्या पाठींब्याबाबत माहिती देत त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले. (वृत्तसंस्था)

### व्हीसीके-आययूएमएलचा बिनशर्त पाठिंबा

शनिवारी झालेल्या चौथ्या भेटीदरम्यान राज्यपालांनी मान्य केले की, विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीकेकडे सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक संख्याबळ आहे. व्हीसीके आणि आययूएमएलकडून बिनशर्त पाठिंबा मिळताच विजय पुन्हा राज्यपालांना भेटायला गेले. यावेळी काँग्रेस, व्हीसीके, सीपीआय(एम), सीपीआय आणि आययूएमएलचे नेतेही उपस्थित होते. यापूर्वी, टीव्हीकेला बहुमत मिळाल्याचे कळताच राज्यपालांनी आपला केरळ दौरा रद्द केला होता. ते सायंकाळी रवाना होणार होते.

### टीव्हीके मुख्यालयाबाहेर जल्लोष

तामिळनाडूमध्ये टीव्हीकेच्या सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा होताच जल्लोषाला सुरुवात झाली आहे. चेन्नईतील पक्षाच्या मुख्यालयाबाहेर पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थकांची मोठी गर्दी जमली होती. उत्साही समर्थकांनी आपला आनंद व्यक्त करण्यासाठी फटाके फोडले. विजय मुख्यमंत्री होणार असल्याच्या वृत्तामुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट पसरली आहे.



सत्यमेव जयते
भारत सरकार
महाराष्ट्र शासन
सोमनाथ
अनंत ऊर्जा का अनुभव
सोमलिङ्गं नरो दृष्ट्वा सर्वपापैः प्रमुच्यते।
लभते फलं मनोवाञ्छितं मृतः स्वर्गं समाश्रयेत्॥
सोमनाथ
७५ वर्षे गौरवशाली वारशाची
सोमनाथ हे भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे. हजारो वर्षांपासून विध्वंसक आक्रमणांना सामोरे जाऊनही सोमनाथ आजही आपल्या अभिमान आणि शौर्याचे प्रतीक म्हणून अढळपणे उभे आहे.
७५ वर्षांपूर्वी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दृढ संकल्पामुळे आधुनिक सोमनाथाच्या पुनरुत्थानाचा मार्ग सुरळीत झाला. आज प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ही पवित्र भूमी भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाची गौरवशाली साक्ष देत आहे.
या सुवर्णमयी ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा!
मुख्य उपक्रम
कलश यात्रा | भजन संध्या | ओंकार मंत्राचे सामूहिक जप
सोमनाथ पुस्तिकेमध्ये मंत्र लेखन | सोमनाथाशी संबंधित कथांचे कथन
श्री सोमनाथ मंदिर परिसर, प्रभास पाटण | ८ ते ११ मे, २०२६
"सोमनाथ ही अशी यशोगाथा आहे जी आपल्याला शिकवते की सृजनाची शक्ती ही विध्वंसाच्या शक्तीपेक्षा कितीतरी अधिक महान असते."
प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी (अध्यक्ष, श्री सोमनाथ ट्रस्ट)
लोकराज्य
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
सोमनाथच्या गौरवशाली १००० वर्षांचा वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी योगदान द्या.
येथे स्कॅन करा

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# शुभेन्दूजी, इतिहासाचे 'अधिकारी' व्हा!

अनेक दशकांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर खऱ्या अर्थाने राष्ट्रीय प्रवाहाच्या महत्त्वावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या दृष्टीने पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक सत्तांतर झाले आहे. साऱ्या देशात त्याबद्दल समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे. पश्चिम बंगालमध्ये सत्तापालट झाल्यामुळे इतर राज्यांना त्याचा थेट फायदा होणार नाही, हे निश्चित. मात्र, वाढत्या घुसखोरीमुळे आव्हान बनलेल्या देशाच्या सुरक्षिततेच्या मुद्यामुळे पश्चिम बंगाल या सीमावर्ती राज्याकडे साऱ्या देशाचे लक्ष आहे आणि त्यामुळे नवे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी आणि नव्या सरकारकडून देशाच्याही अपेक्षा आहेत. पश्चिम बंगालमधील सत्तांतर अनेक दशकांच्या अस्वस्थतेनंतर घडले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस, कम्युनिस्ट आणि तृणमूल काँग्रेस असे तीन प्रकारचे सत्ताधारी पश्चिम बंगालने अनुभवले. यातील कोणत्याही सत्ताधारी पक्षाने पश्चिम बंगालचा विकास करण्यावर आणि त्या राज्याचा गौरवशाली इतिहास लक्षात घेता त्याला देशाच्या पातळीवर एक प्रगतिशील राज्य म्हणून नावारूपाला आणण्याकडे लक्ष दिले नाही. वैचारिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या आघाडीचे हे राज्य अर्थकारणात मागे राहिले. उद्योग-व्यवसायात पिछाडी आणि घुसखोरांसाठी आघाडी, असेच तिथल्या सरकारांचे धोरण होते. खरे तर पश्चिम बंगाल हा भारताला दिशा दर्शन करणारा प्रदेश. इतिहास-संस्कृती याबाबत श्रीमंत असलेल्या याच प्रदेशातून एकेकाळच्या बहुतांशी सुधारणावादी चळवळी सुरू झाल्या. 'वंदे मातरम'चे रचयिता बंकिमचंद्र चॅटर्जी आणि 'जन-गण-मन'चे रचयिता रवींद्रनाथ टागोर यांच्यासह अनेक थोर प्रतिभावंतांचे, विचारवंतांचे, समाजसेवकांचे, सुधारकांचे हे राज्य. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारख्या विभूतींचे हे राज्य स्वातंत्र्योत्तर काळात बांगलादेशी घुसखोर मुसलमानांना जपणाऱ्या आणि त्यांना निवडणुकीसाठी मतपेटीच्या स्वरूपात वापरणाऱ्या राजकीय पक्षांच्या ताब्यात राहिले. तेथे सत्तांतरे झाली तेव्हा सत्तेतले पक्ष बदलले, मुख्यमंत्री बदलले, पण घुसखोरांबद्दलचे धोरण कायम राहिले. गेल्या दीड दशकात ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील तृणमूल काँग्रेसने तर कहर केला. ममता बॅनर्जी सरकारने तर जणू घुसखोरांना भारतीय नागरिक बनविण्याचा चंगच बांधला होता. पश्चिम बंगालमधील हिंदू समुदायात कधी नव्हे तेवढी असुरक्षिततेची भावना ममतांच्या काळात निर्माण झाली होती. आपण भारतात आहोत की बांगलादेशात, असा प्रश्न तिथल्या नागरिकांना पडत होता. नव्या मुख्यमंत्र्यांकडून केल्या जात असलेल्या अपेक्षांना ही गंभीर पृष्ठभूमी आहे.

पश्चिम बंगालला 'भारताचा पूर्वेकडील भारताचा दरवाजा' (गेटवे टू ईस्टर्न-नॉर्थ ईस्टर्न इंडिया) मानले जाते. पश्चिम बंगालमधील सिलिगुडी येथे अवघ्या २२ किमी रुंदीचा एक भाग आहे. त्याला चिकन नेक किंवा सिलिगुडी कॉरिडॉर म्हणतात. हा भाग उर्वरित भारताला आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोरम, मेघालय, त्रिपुरा आणि सिक्कीम या ईशान्येतील राज्यांशी जोडणारा एकमेव भूतल मार्ग. पश्चिम बंगालच्या सीमा नेपाळ, भूतान आणि बांगलादेश या तीन देशांना लागून आहेत. बांगलादेश शेजारी असल्यामुळे तेथे घुसखोरीचा प्रश्न बराच आधीपासून आहे. गेल्या काही दशकांत भारताचा हा दरवाजा घुसखोरीवरील नियंत्रणाऐवजी सैल होत राहिला. तरीही, बांगलादेशी मुसलमानांची घुसखोरी, मुजोरी हा पश्चिम बंगालच्या दृष्टीने जणू प्रश्नच नाही, इतका तो विषय तिथल्या आजवरच्या राज्यकर्त्यांनी दुर्लक्षित ठेवला आणि आपल्या भूमिकेला मानवतावादाची लेबले लावली. अशा स्थितीत पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांच्या नेतृत्वातील सरकारने सर्वप्रथम सीमा व्यवस्थापन आणि बांगलादेशी मुसलमानांची घुसखोरी रोखण्यावर ठोस व कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला पाहिजे, ही देशाची अपेक्षा आहे. नेमका आकडा सांगता येत नसला, तरी बांगलादेशी घुसखोर मुसलमानांची संख्या फार मोठी आहे. १० वर्षांपूर्वी ती अंदाजे दोन कोटींच्या आसपास होती; आता ती निश्चितच तीन कोटींच्या वर गेली असावी. यातील मोजके लोक जरी भारतीय मतदार म्हणून निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होत असतील तर आपल्या लोकतंत्राचे पावित्र्य भंग होते, हे कुणालाही कळावे. कायद्याच्या चौकटीत राहून, एसआयआरच्या माध्यमातून व मतदार याद्यांचे शुद्धीकरण करून या प्रश्नचे गांभीर्य थोडेसे कमी करण्यात केंद्र सरकारने यश मिळविले. आता पश्चिम बंगालची पवित्र भूमी अशा घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलून पूर्णपणे शुद्ध करणे ही नव्या मुख्यमंत्र्यांची सर्वांत पहिली जबाबदारी आहे. साऱ्या देशाची डोकेदुखी बनलेल्या बांगलादेशी मुसलमानांची



घुसखोरी संपविण्यात नव्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी लागणार आहे. एरवी, असे विषय न्यायपालिकेकडे नेऊन वेगळे वातावरण निर्माण करणारे लोक आपल्याकडे कमी नाहीत.

औदार्य, मानवता वगैरे गोष्टी घुसखोरांना लागू होत नाहीत. तरीही त्या नावाखाली आपला अजेंडा रेटणारे लोक आहेतच. खरे तर राष्ट्रीय सुरक्षा हा राजकारणाचा विषय असू शकत नाही आणि त्यामुळे तो विरोधाचाही मुद्दा नाही. निवडणुकीत एकमेकांचा अनेक मुद्यांवर एकमेकांना विरोध होणारच. तो झालाही पाहिजे. पण, हा विरोध घुसखोरांना संरक्षण देण्यासाठी केला जात असेल आणि त्याला मानवता म्हटले जात असेल तर ते देखील राष्ट्रविघातकच. देशाचे हित विसरून घुसखोरीला पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी पाठबळ दिले हा पश्चिम बंगालचा इतिहास आहे. औदार्याच्या भ्रमावर तिथल्या सत्ताधाऱ्यांनी पश्चिम बंगालच्या नागरिकांशी बनवाबनवीचा खेळ केला.

या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वातील गृह खात्याने तसेच सुरक्षा दलांनी नक्षलवाद संपविण्यासाठी केलेली कामगिरी लक्षात ठेवण्याजोगी आहे. नक्षलवाद देखील पश्चिम बंगालमध्ये जन्मला आणि अनेक दशके त्याने त्या प्रदेशासह देशातील अन्य राज्यांमध्येही थैमान घातले. अमित शाह यांच्या निर्धारामुळे आणि रणनीतीमुळे नक्षलवादी चळवळीचा जवळजवळ निःपात झाला आहे.

बांगलादेशी मुसलमानांच्या घुसखोरीचा प्रश्न आणि नक्षलवादाची तुलना करता येत नसली, तरी हे दोन्ही विषय राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहेत, हे नव्या मुख्यमंत्र्यांनी लक्षात घेतले पाहिजे. घुसखोरीचा त्रास केवळ पश्चिम बंगालपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो पश्चिम बंगालला लागून असलेल्या अनेक राज्यांमध्ये आहेच. शिवाय, मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्येही बांगलादेशी मुसलमान घुसखोर आढळून आले आहेत. राजकीय इच्छाशक्ती असेल तर परिवर्तन होते आणि अनिष्ट संपविता येते हे केंद्रीय गृहमंत्र्यांनी दाखवून दिले. पश्चिम बंगालच्या नव्या मुख्यमंत्र्यांना अगदी तशीच इच्छाशक्ती दाखवावी लागेल आणि घुसखोरांना कायमचे हुसकावून लावावेच लागेल. बांगलादेशी मुस्लिम घुसखोरांना त्यांच्या देशात परत पाठविण्याच्या संदर्भात काही कायदेशीर व राजनयिक अडचणी आहेत हे खरे. त्यातील प्रमुख अडचण म्हणजे एखाद्या घुसखोर व्यक्तीला तिच्या मायदेशी परत पाठवायचे असेल तर त्या मायदेशाने ती व्यक्ती आमची नागरिक आहे, हे मान्य केले पाहिजे. बांगलादेश तसे कधीही मान्य करीत नाही. नवे सरकार येत असल्याचे दिसताच घुसखोरांना परत पाठविण्याच्या संदर्भात बांगलादेशकडून इशारे देण्यात आले आहेत. त्या इशाऱ्यांचा अर्थ भारतीयांनी आणि विशेषतः पश्चिम बंगालच्या नव्या सरकारने समजून घेतला पाहिजे. राजनैतिक संबंध महत्त्वाचेच असतात. पण, प्रश्न असा आहे की, आपल्या घरात आपण शिस्त ठेवणार की बाहेरच्यांच्या मनावर आपल्या घरातली शिस्त ठरवणार...? आपल्या समाजातील शांततेला गालबोट लावण्याची आणि लोकतंत्राचे पावित्र्य भंग करण्याची संधी आपण सतत बांगलादेशी घुसखोरांना देत राहिलो तर काय परिणाम होतात, याचा अनुभव पश्चिम बंगालने दशकानुदशके घेतला. त्यामुळे नव्या मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट संदेश द्यायला हवा की, घुसखोरी कदापि सहन केली जाणार नाही. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी घुसखोरीच्या मुद्यावर आक्रमक आणि स्पष्ट भूमिका घेतली. पश्चिम बंगालच्या नव्या नेतृत्वानेही तशीच स्पष्टता दाखवली पाहिजे. पश्चिम बंगालातील बेरोजगारी, उद्योग, पायाभूत सुविधा हे प्रश्न तातडीचे आहेत, हे अमान्य करता येत नाही. त्याच वेळी देशभरात वाढलेली भावनाही समजून घ्यायला हवी. सीमा सुरक्षित हव्यात आणि कायद्याचे राज्य हवे, असे केवळ पश्चिम बंगालच्या नागरिकांना वाटत नाही.

तसे देशभरातील भारतीय नागरिकांना वाटते. बांगलादेशातील हिंदूंचे हाल पाहिले तर त्याची तीव्रता कळते. नव्या सरकारला दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी काम करावे लागेल. एकावर लक्ष देऊन दुसरे दुर्लक्षित ठेवणे हा पर्याय नव्या मुख्यमंत्र्यांना उपलब्ध नाही. हा लढा एकट्या राज्याचा नसून साऱ्या देशाचा आहे. पण सुरुवात कुठून होणार, तर ती पश्चिम बंगालमधून. कारण तिथे समस्या सर्वाधिक तीव्र आहे. पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक परिवर्तन झाले. या ऐतिहासिक परिवर्तनाने पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी आणि त्यांच्या सरकारवर ही 'ऐतिहासिक' जबाबदारी टाकली आहे. ती त्यांनी निर्धारपूर्वक पार पाडावी यासाठी अधिकारींना शुभेच्छा! राज्याचे नेतृत्व करतानाच त्यांनी देशासाठी मोठे योगदान द्यावे आणि खऱ्या अर्थाने 'अधिकारी' व्हावे; इतिहासाचे सुवर्णपान त्याची नोंद घेण्यास आतूर आहे!

## दखल

# बंगालमध्ये नव्या युगाचा उदय

**राजनाथ सिंह**

**'हे नूतन, देखा दिक आरबार, जन्मेरो प्रोथोमो शुभोक्षोन'**

**अर्थ :** हे नवचैतन्या, तुझ्या जन्माच्या पहिल्या शुभक्षणी पुन्हा एकदा स्वतःला प्रकट कर.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी हे शब्द एक आवाहन म्हणून लिहिले होते. बंगालच्या सातत्याने नूतनीकरण होणाऱ्या चैतन्यासाठी केलेली ही एक प्रार्थना आहे. पारंपरिकपणे हे गीत त्यांच्या जयंतीदिनी गायले जाते. त्यामध्ये त्यांना मानवंदना दिली जाते आणि 'वाढदिवस' ज्या नूतनीकरणाचा आणि जागृतीचा आनंद दर्शवतो, तो साजरा केला जातो. ही भूमी केवळ बदलत नाही, तर तिचा सातत्याने पुनर्जन्म होत असतो, याची गुरुदेवांना कल्पना होती.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या १६५ व्या जयंतीच्या उण्यापुऱ्या आठवडाभर आधी पश्चिम बंगालने एक ऐतिहासिक बदल अनुभवला आहे, हा एक सुखद योगायोग आहे. ४ मे रोजी भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविला. तरीही, भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी ही निवडणूक केवळ एक राजकीय स्पर्धा नव्हती. या महान भूमीचे हरवलेले वैभव पुनर्संचयित करण्याची ही एक संधी होती, हे निवडणुकीच्या गणितांच्या पलीकडचे सांस्कृतिक आणि राष्ट्रीय आवाहन होते.

आज राजकीय वादाचा कोलाहल बाजूला सारून एका सखोल प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे- बंगाल नेमका काय आहे? आणि त्याचे वैभव पुनर्संचयित करणे म्हणजे नक्की काय? बंगालचा वर्तमान समजून घेण्यासाठी, प्रथम त्याच्या भूतकाळात उतरावे लागेल. केवळ काही दशकांच्या नव्हे, तर शतकांच्या भूतकाळात. बौद्धिक परिष्कृततेसाठी ओळखली जाण्यापूर्वी बंगाल ही एक पवित्र भूमी होती. १५ व्या शतकात नवद्वीपमध्ये गंगेच्या काठावर निमाई नावाच्या एका तरुणाने, ज्याला जग नंतर 'चैतन्य महाप्रभू' म्हणून ओळखू लागले, गायला सुरुवात केली. त्यांचे कीर्तन केवळ संगीत नव्हते, तर ती भक्तीच्या वेषातली एक समाजसुधारणेची चळवळ होती. त्यांनी अस्पृश्यांना कवेत घेतले, विद्वानांसोबत नृत्य केले आणि ईश्वराचे नाव कोणत्याही ओळखीच्या ओझ्याशिवाय सर्वांसाठी खुले आहे, अशी घोषणा केली. त्यांनी प्रज्वलित केलेला वैष्णव धर्म बंगालच्या आणि भारताच्या आत्म्याची आध्यात्मिक रचना बनला; तो आनंदी आणि सर्वसमावेशक होता.

दोन शतकांनंतर त्याच आत्म्याला 'बाऊल' परंपरेत एक लौकिक पूरक साथ मिळाली. या भटक्या संतांनी जातपात मानली नाही, त्यांच्याकडे कोणतेही शास्त्र नव्हते आणि ते 'मनेर मानुष' म्हणजेच मनातल्या माणसाचे गाणे गात असत. त्यांच्यामध्ये सर्वात तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते लालन फकीर यांचे. त्यांच्यावर कोणताही धर्म आपला दावा करू शकला नाही आणि त्यांना प्रत्येक परंपरेने आपले मानले. ते हिंदू होते की मुस्लिम हे कोणीही सांगू शकले नाही आणि तशी तसदी घेण्याची गरजही भासली नाही. ही अस्सल बंगाली समन्वयवादी प्रतिभा होती, एक अशी ओळख जी केवळ जगता येते.

गेल्या तीन शतकांमध्ये बंगालने भारताच्या नैतिक जागृतीत केवळ सहभागच नोंदविला नाही तर या जागृतीचा पाया रचला. राजा राममोहन रॉय यांनी अशा समाजाकडे पाहिले जो आपल्या प्रथांमध्ये ताठर आणि भ्रष्ट झाला होता. त्यांनी परंपरांचा त्याग करणे किंवा त्यांना आंधळेपणाने शरण जाणे यापैकी काहीही निवडले नाही. त्यांनी त्यामध्ये सुधारणा केली. सती प्रथा निर्मूलनासाठी लढा दिला आणि आत्मपरीक्षणातून समाजाचे पुनरुज्जीवन घडवण्याचा आग्रह धरला. ईशज्ञवरचंद्र विद्यासागर यांनी ती मशाल पुढे नेली आणि शिक्षणाचे रूपांतर मुक्तीच्या कृतीत केले, विशेषतः महिलांसाठी शिक्षणाला मुक्तीचे साधन बनवत त्यांनी सामाजिक परिवर्तनाची दिशा अधिक व्यापक केली.

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी देशाला पहिली महान कादंबरी दिली. त्या कादंबरीतच 'वंदे मातरम' हे गीतही लिहिलेले होते. त्यानंतर पुढे एक शतकभर स्वातंत्र्य सैनिकांच्या मुखी हे समरगीत गुंजत राहिले आणि आजही प्रत्येक भारतीयाच्या ओठी हे गीत विसावलेले आहे. बंगालने भारताला डॉ. कादंबिनी गांगुली यांच्या रूपाने पहिली महिला वैद्यकीय डॉक्टर दिली. त्यांनी महिलांना आत्मनिर्भरता आणि स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी या प्रखर राष्ट्रवादी व्यक्तिमत्त्वाने भारताच्या एकात्मतेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. बंगालच्या भूमीने असंख्य विलक्षण बुद्धिमत्तेच्या तसेच महान व्यक्तिमत्त्वांना जन्म दिला आहे. त्या सगळ्यांमध्ये स्वामी विवेकानंद हे सर्वात तेजस्वी, ज्ञानी आणि प्रेरणादायी व्यक्तित्व होते. स्वामी विवेकानंदांनी १८९३ मध्ये झालेल्या जागतिक धर्म संसदेत भाषण केले. आपल्या त्या ऐतिहासिक भाषणातून त्यांनी जगाला हिंदू धर्माच्या महानतेची ओळख करून दिली आणि धार्मिक सहिष्णुता तसेच कट्टरतावाद संपुष्टात आणायचे आवाहन केले. परंतु, ते जेव्हा मायदेशी परतले, त्यावेळी त्यांनी आपल्या स्वकीयांसमोर पचनी पडायला कठीण जातील अशी कठोर सत्येही मांडली. सामर्थ्याशिवाय असलेली आध्यात्मिकता ही केवळ भावुकता असते. भुकेलेल्या माणसाला तत्त्वज्ञान शिकवता येत नाही आणि देवीची पूजा केवळ मंदिरातच नव्हे, तर स्त्रीमध्ये, गरिबांमध्ये आणि प्रत्यक्ष राष्ट्रामध्ये केली पाहिजे, असे विचार त्यांनी मांडले. हीच तर बंगालची खरी ओळख आहे. खरे तर बंगाल सदैव असाच राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच दृष्टिकोनातून तर बंगालकडे पाहत आले आहेत. बंगालला पुन्हा भूतकाळाच्या स्थितीत नेणे हा काही त्यांचा उद्देश नाही किंवा बंगालला इतर कोणत्याही परकीय भूमीसारखी जोखणे हाही त्यांचा हेतू नाही. त्याउलट बंगालच्या नागरी संस्कृतीला निद्राधीन अवस्थेतून पुन्हा जागृत करणे आणि तिथल्या पूर्ण क्षमतेचा पूरेपूर उपयोग करून घेणे, हेच त्यांचे ध्येय आहे.

प्रदीर्घ काळापर्यंत बंगालच्या बौद्धिक आणि राजकीय वर्गातील काही घटकांनी आपल्याच सांस्कृतिक वारशाला एक लज्जास्पद बाब मानले, अशी गोष्ट जिच्यावर मात केली, जिला स्पष्टपणे नाकारले किंवा जिची जागा वसाहतवादी विचारसरणीने घेतली. याचा परिणाम म्हणजे अनेक दशकांचा खुंटलेला विकास, संस्थात्मक ऱ्हास आणि अशा लोकांचा आवाज दाबला गेला, ज्यांनी धर्माबद्दल, बंगालच्या बहुलवादी आत्म्याशी विसंगत नसणाऱ्या नव्हे तर त्याला पूर्णत्वास नेणाऱ्या संस्कृतीबद्दल बोलण्याचे धाडस केले.

पश्चिम बंगालमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाकडे केवळ एक निवडणुकीचा निकाल म्हणून पाहता कामा नये. ज्यांनी बंगालला त्याच्या सच्च्या मुळांपासून आणि मूल्यांपासून दूर केले, त्यांच्या विरोधात मिळालेला हा एक जनतेचा कौल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक ही सत्तेसाठीची लढाई कधीच नव्हती. ते एक पवित्र कार्य होते; गमावलेला गौरव परत मिळविण्यासाठी केलेला एक 'यज्ञ.' पंतप्रधान मोदींचे बेल्लूर मठाशी असलेले घनिष्ठ नाते, स्वामी विवेकानंदांबद्दलचा त्यांचा आदर, सुशासनाला 'सेवा' म्हणून संबोधणे म्हणजेच सेवेला एक उपासना मानणे, ही राजकीय विधाने नाहीत. या गोष्टी बंगालला त्याचा पूर्वीचा गौरव पुन्हा मिळविण्यासाठी आणि एका गौरवशाली व सुरक्षित भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन देतात. हे एका 'प्रधान सेवका'ने आपला 'प्रधान धर्म' पार पाडण्याचे उदाहरण आहे. बंगालचे पुनरुज्जीवन करणे म्हणजे ज्या घाटांवर चैतन्य महाप्रभूंनी गायन केले, त्या घाटांच्या काठावर जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणे. ईश्वरचंद्र विद्यासागरांनी पाहिलेल्या शाळांच्या स्वप्नाला निधी पुरविणे. शतकानुशतके शिक्षणात भारताचे नेतृत्व करणाऱ्या या भूमीत नामवंत विद्यापीठे उभारणे. पश्चिम बंगालमधील सर्व आदिवासी बांधवांना सन्मान प्रदान करणे. बंगालच्या सत्ताधारी पक्षांकडून दीर्घकाळ सावत्र वागणूक सहन करणाऱ्या डोंगराळ भागातील लोकांच्या आकांक्षांना प्रतिसाद देणे.

हे नूतन, हे नव्या अवतारा- पुन्हा एकदा स्वतःला प्रकट कर. पंतप्रधान मोदींच्या मार्गदर्शनाखाली आणि बंगालच्या प्रत्येक सुपुत्र-सुपुत्रीच्या आशीर्वादाने, बंगालमधील पहिले भाजपा सरकार आजपासून हीच प्रार्थना करून आपली 'सेवा' पार पाडेल. गेल्या अर्धशतकात काही काळ असे वाटत होते की, बंगालचे सुवर्ण दिवस संपले आहेत. मात्र आज आगामी समृद्धी आणि शांततेच्या एका चैतन्यमय नव्या जीवनाच्या आश्वासनासह त्याचा पुनर्जन्म झाला आहे.

(लेखक केंद्रीय संरक्षण मंत्री आहेत)

## रविवारची पत्रे

### कवी आणि कविता : एक विचारमंथन

कवी कोणास म्हणावे? कविता म्हणजे नेमके काय? एखाद्याची कविता पुस्तकात, वर्तमानपत्रात किंवा मासिकांत छापून आली तर त्यालाच कवी म्हणावे का? की, कवी होण्यासाठी आणखी काही निकष असतात? माझ्या मते, केवळ छापून येणे हा कविपणाचा अंतिम मापदंड नाही. ज्याच्या रचनेला सर्वसामान्यांतून मान्यता मिळते, ज्याच्या शब्दांना लोकांच्या मनात स्थान मिळते, ज्याच्या कवितेतून अनेकांच्या भावनांना शब्द मिळतात त्या व्यक्तीला कवी म्हणावे. आणि ती रचना, जी मनाला भिडते, विचार करायला भाग पाडते आणि अंतर्मनात दीर्घकाळ घुमत राहते तीच खरी कविता. कविता लिहिणे म्हणजे फक्त शब्दांची जुळवाजुळव नव्हे; ती एक आत्मसंवादाची प्रक्रिया आहे. कविता ही केवळ कागदावर उमटलेली रेघोट्यांची मांडणी नसते. ती जीवनातील अनुभवांची, जखमांची, आनंदाची आणि संघर्षाची साक्ष असते. कवितेत आशा असावी, प्रतीक्षा असावी, विचारांची परिपक्वता असावी. कविता ही मानवी भावना, विचार आणि अनुभवांना शब्दरूप देणारी एक अद्भुत कलाकृती आहे. ती नुसती शब्दांची मांडणी नसून तिच्यातील लय, ताल, अलंकार आणि भावनिक खोली यामुळे ती गद्यापेक्षा वेगळी ठरते. योग्य शब्दांची निवड, त्यांची मांडणी आणि त्यामागील भावना यांचा संगम म्हणजे कविता. कवितेत लय असते, यमक असते, विशिष्ट ताल असतो, जो वाचकाला किंवा श्रोत्याला मंत्रमुग्ध करतो. ही अनुभूती कवीच्या अंतर्मनातून येते आणि वाचकाच्या हृदयाला भिडते. ती अंतःकरणातील भावनांना मुक्त करणारी साद आहे. मराठी कविता म्हणजे मनाला भिडणारा भावनांचा आणि शब्दांचा सुंदर आविष्कार आहे. कवितेचा जन्म हा मानवी मनाच्या उत्कट भावनांतून होतो. जेव्हा मनावर एखाद्या भावनेचा तीव्र परिणाम होतो; राग, आनंद, प्रेम, सुख, दुःख, वेदना अशा भावनांना व्यक्त करण्यासाठी कवी शब्द शोधतो आणि त्या शोधातून कविता जन्माला येते. कवी जेव्हा आपल्या भावना, विचार आणि लय यांना एकत्र विणतो, तेव्हा एक सुंदर काव्यनिर्मिती घडते. ही प्रक्रिया कृत्रिम नसते. ती अंतःकरणातून सहज उमलणारी असते. चारोळी, षडाक्षरी, अष्टाक्षरी, दशाक्षरी, गझल, भावगीत, अंगाई, खंडकाव्य कवितेचे असे अनेक प्रकार आहेत. आपल्या संत परंपरेत अभंग हा एक अमूल्य ठेवा आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांसारख्या अनेक महान संतांनी रचलेली काव्ये आजही आपल्याला मार्गदर्शन करतात. घराघरांत ओवीची परंपरा अजूनही जिवंत आहे. आधुनिक काळातही अनेक दिग्गज कवींनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. केशवसुत, गोविंदाग्रज, कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर, मंगेश पाडगावकर, सुरेश भट, वसंत बापट, विंदा करंदीकर, आरती प्रभू, बा. सी. मर्ढेकर, बहिणाबाई ही यादी खूप मोठी आहे. या सर्वांनी आपल्या प्रतिभेने मराठी काव्यविश्व उजळून टाकले आहे. आपण या महान परंपरेतून प्रेरणा घ्यावी, आपल्या लेखनात प्रामाणिकपणा ठेवावा आणि आपल्या काव्यरचनेला अधिक सक्षम, अर्थपूर्ण आणि प्रभावी बनवावे. कविता हा केवळ छंद नाही, ती एक साधना आहे. एक जिद्द मनात ठेवून सातत्याने प्रयत्न करीत राहणे गरजेचे आहे. आपल्या लेखनात वेळोवेळी योग्य ते बदल करून अधिक सुंदर, अर्थपूर्ण आणि परिणामकारक काव्यनिर्मिती करावी हीच अपेक्षा.

**संजय वसंत पातुरकर**/पुणे/७३०४२६२००२

●● ●●

### 'वंदे मातरम्'चा आदर अबाधित

२० व्या शतकाच्या चौथ्या दशकात जन्मलेल्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय या बंगाली कवी, पत्रकार, साहित्यिकाने 'वंदे मातरम्' गीताची रचना केली होती. पुढे हे गीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे प्रेरणा गीत बनले. या गीताची देश सार्धशती महोत्सव साजरा करीत आहे. वंदे मातरम् या गीताचे ऐतिहासिक, राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेता केंद्र सरकारने; जन-गण-मन यास राष्ट्रगीतसारखा दर्जा देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. राष्ट्रीय गौरव अनादर अधिनियमात सुधारणा केल्यानंतर वंदे मातरम् या गीताला राष्ट्रगीत समान दर्जा मिळणार आहे. यामुळे आता वंदे मातरम् हे राष्ट्रगीत कायद्याच्या चौकटीत आलेले आहे. वर्तमान कायद्यानुसार, राष्ट्रगीत गाणाऱ्यास विनाकारण व्यत्यय आणल्यास संबंधित व्यक्तीला तीन वर्षे कैद व दंडाची तरतूद केलेली आहे. दुस-?यांदा तोच गुन्हा केल्यास एक वर्ष कैदेची तरतूद असून राष्ट्रध्वज, भारतीय संविधान आणि राष्ट्रगीतासोबतच आता वंदे मातरम्चा अनादर करणा-?यास दंड व शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

या नव्या नियमाच्या संदर्भात केंद्र शासनाने बुधवारी मार्गदर्शिका रिलीज केली असून त्यानुसार संपूर्ण सहा श्लोकांचे संस्कृत व बंगाली भाषा मिश्रित वंदे मातरम् गीत गायन अनिवार्य केले आहे. गायनाचा अवधी तीन मिनिटे दहा सेकंद एवढा आहे. जो सरकारी संस्था, समारंभ, शासकीय समारोह, शाळा, महाविद्यालय, प्रमुख राजकीय समारंभादरम्यान वंदे मातरम् गीताचे गायन करणे अथवा ध्वनिमुद्रण वाजविणे अनिवार्य केले आहे. एखाद्या कार्यक्रमात वंदे मातरम् आणि राष्ट्रगीत दोन्ही गायचे असल्यास अगोदर राष्ट्रगीत म्हटले जाईल; त्यानंतर वंदे मातरम् गीताचे गायन होईल. प्रसंगी या दोन्ही गीतांचा आदर व सन्मानार्थ सावधान मुद्रेत एकाच जागेवर उभे राहणे बंधनकारक आहे. मात्र, सिनेमा हॉलमध्ये वंदे मातरम् प्रदर्शित होत असताना, प्रेक्षकांना सन्मानार्थ उभे राहण्यापासून सूट दिलेली आहे. गतवर्षी डिसेंबर महिन्यात संसदेत वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विशेष चर्चा झाली होती. याप्रसंगी या गीताला राष्ट्रगीताप्रमाणे दर्जा देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यालाच अनुसरून पूर्ण रूप देण्यासाठी शासनाने घेतलेला निर्णयाने 'वंदे मातरम्' गीताचा गौरव अबाधित राहील. राष्ट्रीय प्रतीकांचा आदर कायम राहण्यासाठी महापुरुषांचे पुतळे, स्मारके, जन्मस्थळे, प्रतिमा, वैचारिक साहित्याचा आदर ठेवण्यासाठी उचित कायदेशीर उपाययोजना करणे अगत्याच्या ठरतात. सर्व लोकप्रतिनिधींनी महापुरुषांच्या आदरार्थ राजकीय व सामाजिक पातळीवर पुरेसे प्रयत्न करणे महत्त्वाचे ठरते; ज्याद्वारे भावी पिढींचा राष्ट्राभिमान जागृत होण्यास मदत मिळेल.

**शशिकांत तोटे**/दारव्हा, जि. यवतमाळ-९१३०८३५४५८

## तंत्रवेध

# डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्र

**डॉ. दीपक शिकारपूर**

आजच्या आधुनिक युगात माणसाचे आयुष्य केवळ भौतिक संपत्तीपुरते मर्यादित राहिलेले नाही. पूर्वी जमीन-जुमला, घर, दागिने, रोकड अशा स्वरूपातील मालमत्तेला महत्त्व होते; आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यक्तीच्या मालमत्तेचे स्वरूप बदलले आहे. आज अनेक लोकांची मौल्यवान संपत्ती ही त्यांच्या संगणकीय साधनांमध्ये, नेटवर आधारित खात्यांमध्ये, चलनरहित व्यवहारांमध्ये आणि गुप्त संकेतांच्या माध्यमातून साठवलेल्या साधनांमध्ये असते. अशा प्रकारच्या संपत्तीला 'डिजिटल मालमत्ता' म्हणतात. या डिजिटल मालमत्तेचे योग्य नियोजन आणि तिच्या उत्तराधिकाराचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. यासाठी इच्छापत्र तयार करणे हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. डिजिटल मालमत्तेसाठीचे इच्छापत्र आणि पारंपरिक कायदेशीर इच्छापत्र यामध्ये काही महत्त्वाचे फरक आढळतात. पारंपरिक इच्छापत्रामध्ये प्रामुख्याने जमीन, घर, दागिने, रोख रक्कम यासारख्या भौतिक मालमत्तेचे वितरण कसे करायचे, याचा उल्लेख असतो. या मालमत्तेचे स्वरूप स्थिर आणि स्पष्ट असल्यामुळे त्यांचे हस्तांतरण तुलनेने सोपे असते. परंतु डिजिटल मालमत्तेच्या इच्छापत्रामध्ये संपत्तीचे स्वरूप अमूर्त आणि तांत्रिक असते. यामध्ये विविध खाती, गुप्त संकेत, प्रवेश नियंत्रण आणि सुरक्षा प्रणाली यांचा समावेश असल्यामुळे त्याचे व्यवस्थापन अधिक जटिल ठरते. पारंपरिक इच्छापत्रामध्ये केवळ मालमत्तेचे वाटप नमूद करणे पुरेसे असते, तर डिजिटल इच्छापत्रामध्ये त्या मालमत्तेचा हक्क कसा मिळवायचा, कोणती माहिती जतन करायची किंवा हटवायची याबाबत सविस्तर सूचना देणे आवश्यक असते.

डिजिटल इच्छापत्रामध्ये गोपनीयतेला विशेष महत्त्व दिले जाते. कारण वैयक्तिक माहिती मोठ्या प्रमाणावर साठवलेली असते. याशिवाय, तांत्रिक बदल आणि विविध सेवांच्या नियमांमुळे डिजिटल इच्छापत्र वेळोवेळी अद्ययावत करणे गरजेचे असते. ते पारंपरिक इच्छापत्राच्या तुलनेत अधिक गतिमान स्वरूप दर्शविते. डिजिटल मालमत्तेमध्ये विविध प्रकार येतात. उदाहरणार्थ, सामाजिक माध्यमांवरील खाती, संदेश सेवा, ई-मेलसारखी पत्रव्यवहाराची साधने, चलनरहित गुंतवणूक साधने, चित्रे, लेखन, व्हिडीओ, संकेतशब्दांनी संरक्षित माहिती तसेच ऑनलाईन व्यवसायाशी संबंधित साधने. अनेकदा ही मालमत्ता आर्थिकदृष्ट्या मौल्यवान असते, तर काही वेळा भावनिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाची असते. व्यक्तीच्या निधनानंतर ही सर्व माहिती आणि साधने योग्य व्यक्तीकडे पोहोचावीत यासाठी इच्छापत्र आवश्यक ठरते.

**डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्राचे महत्त्व**

१. व्यक्तीच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबीयांना किंवा वारसांना त्या मालमत्तेची माहिती मिळविणे अत्यंत कठीण ठरू शकते. अनेक खात्यांना पासवर्ड दुहेरी सुरक्षा व्यवस्था, गुप्त संकेत इत्यादींची आवश्यकता असते. ही माहिती कोणालाही माहिती नसेल, तर त्या खात्यांमध्ये प्रवेश मिळविणे अशक्य होऊ शकते. अशा परिस्थितीत मौल्यवान माहिती कायमची हरवू शकते.

२. काही डिजिटल मालमत्तेचा आर्थिक उपयोग असतो. उदाहरणार्थ, चलनरहित गुंतवणूक, डिमॅट खाती (शेअर्स म्युच्यअल फंड्स इत्यादी) ऑनलाईन व्यवसाय, जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न, लेखन किंवा कलाकृतींचे मानधन. या साधनांचा योग्य वारसा ठरवला गेला नाही, तर त्या उत्पन्नाचा लाभ कुणालाही मिळणार नाही. त्यामुळे इच्छापत्रामध्ये या सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

३. गोपनीयता. व्यक्तीच्या आयुष्यातील वैयक्तिक माहिती मोठ्या प्रमाणावर डिजिटल स्वरूपात साठवलेली असते. त्यामध्ये खाजगी संवाद, वैयक्तिक चित्रे, दस्तावेज इत्यादींचा समावेश होतो. या माहितीचे संरक्षण करणे आणि ती कोणाला द्यायची किंवा नष्ट करायची हे ठरवणे महत्त्वाचे आहे. इच्छापत्राच्या माध्यमातून संबंधित व्यक्ती आपली गोपनीयता जपण्याची व्यवस्था करू शकते.

४. कायदेशीर गुंतागुंत टाळणे. डिजिटल मालमत्तेच्या बाबतीत स्पष्ट नियम नसल्यामुळे अनेक वेळा कुटुंबीयांमध्ये वाद निर्माण होऊ शकतात. इच्छापत्र असल्यास मालमत्तेचे वितरण स्पष्ट होते आणि वाद टाळता येतात.

**महत्त्वाच्या गोष्टींची काळजी**

१. आपल्या सर्व डिजिटल मालमत्तेची यादी तयार करणे आवश्यक आहे. यात कोणती खाती आहेत, त्यांचे स्वरूप काय आहे, त्यांचा उपयोग काय आहे याची सविस्तर माहिती लिहावी. ही यादी अद्ययावत ठेवणेही गरजेचे आहे.

२. प्रत्येक खात्यासाठी प्रवेशाची माहिती सुरक्षितपणे साठवणे आवश्यक आहे. संकेतशब्द, गुप्त प्रश्न, दुहेरी सुरक्षा व्यवस्था यांची माहिती सुरक्षित ठिकाणी ठेवावी. ही माहिती थेट इच्छापत्रामध्ये लिहिणे टाळावे. कारण इच्छापत्र सार्वजनिक होऊ शकते. त्याऐवजी स्वतंत्र सुरक्षित नोंद तयार करून ती विश्वासू व्यक्तीकडे द्यावी.

३. वारसांची निवड. प्रत्येक डिजिटल मालमत्तेसाठी योग्य व्यक्तीची निवड करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, आर्थिक मालमत्ता कुटुंबातील जबाबदार सदस्याला द्यावी तर वैयक्तिक माहितीबाबत विश्वासू व्यक्तीची निवड करावी. काही वेळा वेगवेगळ्या मालमत्तेसाठी वेगवेगळे वारस नेमणे योग्य ठरते.

४. डिजिटल कार्यवाहक नेमणे. पारंपरिक इच्छापत्रासाठी कार्यवाहक नेमला जातो त्याप्रमाणेच डिजिटल मालमत्तेसाठीही एक जबाबदार व्यक्ती नेमावी. ही व्यक्ती इच्छापत्रानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करू शकेल. तिला तांत्रिक ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. स्पष्ट सूचना देणे. कोणती मालमत्ता जतन करायची, कोणती हटवायची, कोणती हस्तांतरित करायची याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. यामुळे कार्यवाहकाला निर्णय घेणे सोपे होते.

६. कायदेशीर वैधता सुनिश्चित करणे. इच्छापत्र कायद्याने मान्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे ते योग्य पद्धतीने तयार करणे, साक्षीदारांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करणे इत्यादी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

डिजिटल मालमत्तेच्या संदर्भात काही आव्हानेही आहेत. तंत्रज्ञान सतत बदलत असल्यामुळे आजची माहिती उद्या अप्रासंगिक होऊ शकते. त्यामुळे इच्छापत्र नियमितपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे तसेच विविध सेवांच्या नियमांमध्ये फरक असतो.भावनिक दृष्टिकोनातून पाहिले तर डिजिटल मालमत्ता अनेक आठवणींचा साठा असते. छायाचित्रे, संदेश, व्हिडीओ हे सर्व कुटुंबासाठी अमूल्य ठेवा असतो. इच्छापत्राच्या माध्यमातून या आठवणी जतन करता येतात आणि पुढील पिढ्यांना देता येतात. भविष्यात डिजिटल मालमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आभासी जग, चलनरहित अर्थव्यवस्था यामुळे व्यक्तीचे आयुष्य अधिकाधिक डिजिटल होत आहे. त्यामुळे इच्छापत्रामध्ये या बाबींचा समावेश करणे अपरिहार्य ठरणार आहे. शेवटी, डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्र तयार करणे ही केवळ तांत्रिक बाब नसून ती जबाबदारीची जाणीव आहे. आयुष्यभर साठवलेल्या संपत्तीचे योग्य नियोजन करणे, कुटुंबाचे हित जपणे, गोपनीयतेचे संरक्षण करणे आणि भविष्यातील अडचणी टाळणे या सर्व गोष्टींसाठी इच्छापत्र अत्यंत उपयुक्त ठरते.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या डिजिटल मालमत्तेचा विचार करून योग्य वेळी इच्छापत्र तयार करणे आवश्यक आहे. यातून केवळ संपत्तीचे संरक्षण होत नाही तर आपल्या आठवणी, विचार आणि वारसा पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविता येतो. त्यामुळे डिजिटल युगात इच्छापत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अजून एक मुद्दा म्हणजे डिजिटल उपकरणे. डिजिटल साधनांमध्ये मोबाईल दूरध्वनी संच, संगणक, लॅपटॉप यांसारख्या उपकरणांचा समावेश होतो. या साधनांमध्ये व्यक्तीची मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक, आर्थिक आणि व्यावसायिक माहिती साठवलेली असते. छायाचित्रे, संपर्क क्रमांक, संदेश, लेखन, कागदपत्रे तसेच विविध खात्यांमध्ये प्रवेशासाठी आवश्यक गुप्त संकेत ही सर्व माहिती या उपकरणांमध्ये सुरक्षित ठेवलेली असते. अनेक वेळा या साधनांमध्ये चलनरहित व्यवहारांचे पुरावे, करसंबंधित महत्त्वाची कागदपत्रे, बँक व्यवहारांची नोंद आणि व्यावसायिक प्रकल्पांची माहितीही साठवलेली असते. त्यामुळे या उपकरणांचा केवळ भौतिक ताबा नव्हे, तर त्यातील माहितीचा योग्य वापर आणि संरक्षणही तितकेच आवश्यक ठरते. इच्छापत्रामध्ये या उपकरणांचा स्पष्ट उल्लेख करून त्यांचे हस्तांतरण कोणाला करायचे, त्यातील माहिती कोण जतन करेल किंवा कोणती माहिती नष्ट करायची याबाबत सविस्तर सूचना दिल्यास भविष्यातील गोंधळ टाळता येतो तसेच विश्वासू व्यक्तीकडे सुरक्षितरीत्या संकेतशब्दांची माहिती उपलब्ध करून दिल्यास वारसांना या साधनांचा उपयोग सुलभपणे करता येतो आणि मौल्यवान माहिती सुरक्षित राहते.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## महत्वाचे...



### लिटिल स्टार स्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल; नरेंद्र चव्हाण प्रथम

**सोलापूर, दि. ९ मे -**
कुमठे येथील लिटिल स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल या शाळेने इयत्ता दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व यशासाठी परिश्रम घेणारे वर्गशिक्षक सतीश चव्हाण, अनघा कौजलगी, शशिकला मंगरूळे, अक्षय जमादार, कावेरी वाले, नीलम्मा खेड यांचे शाळेचे विश्वस्त जयकुमार माने, प्रमुख स्वातीताई माने, मुख्याध्यापिका शुभांगी पवार, शाळा समन्वयक मलकारी कोरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. **प्रथम तीन विद्यार्थी :** नरेंद्र सतीश चव्हाण ९३.२० %, पूर्वा विरभद्र धुम्मा यांनी ७३.८० %, अभी सुरेश रत्नाकर यांनी ७२.२०%.



### अहिल्याबाई प्रशालेचा ९५ टक्के निकाल; प्रतिज्ञा गायकवाड प्रथम

**सोलापूर, दि. ९ मे-**
अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९५% लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक-सचिव हाजी बंदेनवाज शेख,मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी अभिनंदन केले. या प्रसंगी सहशिक्षक राजशेखर बमगोंडे, अल्पना जाधव, सतीश हेगडे, सना कुरेशी, गुलनाज शेख, अर्चना दीक्षित इ शिक्षक उपस्थित होते. **प्रथम तीन विद्यार्थी :** प्रतिज्ञा गायकवाड ८०%, सोनाक्षी मस्के ७८.२०, शेख सानिया मदार ७५.६०%

### डॉ. असदुल्लाह खान स्कूलमध्ये अदीबा कांबळे प्रथम

**सोलापूर, दि. ९ मे-**



दहावी बोर्ड परीक्षेत डॉ. असदुल्लाह खान इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथील अदीबा ए. कांबळे हिने ९४% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला. आयेशा आर. नदाफ हिने (९०.२०%) द्वितीय तर अफिया एम.आर. शेख हिने (८६.२०%) तृतीय स्थान मिळविले.




### राज स्कूलचा १०० टक्के निकाल; ऋतुजा जमादार प्रथम

**सोलापूर, दि. ९ मे-**
येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. १०८ पैकी ३७ विद्यार्थ्यांनी विशेष प्रविण्यासह, प्रथम श्रेणीमध्ये ३५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यांचे संस्था अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आमदार देवेंद्र कोठे, सचिव प्रथमेश कोठे, डॉ. रधिकाताई चिलका, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी अभिनंदन केले. **प्रथम तीन विद्यार्थी :** ऋतुजा संतोष जमादार (९५.४०%), अर्पिता चंद्रकांत पवार (९४.६०%), जरीन मुक्तियार चौधरी, ओमकार संतोष शेट्टी (९४%).

# बोलक्या बाहुल्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणारा सोलापूरचा साईराज मिर्जी

## दुर्मिळ होत चाललेल्या कलेला नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**
चेहऱ्यावर हास्य आणि सादरीकरणात आश्चर्याची जादू निर्माण करत प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे युवा कलाकार साईराज मिर्जी यांनी आपल्या वेगळ्या कलेमुळे रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. जादू आणि व्हेंट्रिलोक्विझम (बोलक्या बाहुल्यांची कला) यांचा सुंदर संगम साधत त्यांनी स्वतःची खास शैली विकसित केली आहे.



वेल्लोर विद्यापीठातून एम.टेक शिक्षण पूर्ण करून सुवर्णपदक पटकावलेल्या साईराज मिर्जी यांनी करिअरसोबत कलेची ओळखही जपली आहे. आपल्या वेगळ्या सादरीकरण शैलीमुळे आणि कलेवरील प्रेमामुळे त्यांनी रसिकांच्या मनात आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. लहानपणापासूनच जादू आणि रंगमंचाची आवड असलेल्या साईराज यांनी ही कला आपल्या वडिलांकडून ज्येष्ठ जादूगार गुरुराज कृष्णाजी मिर्जी यांच्याकडून आत्मसात केली. घरातूनच मिळालेल्या कलेच्या वारशामुळे त्यांनी या दोन्ही कलांमध्ये सातत्याने सराव करत प्रावीण्य मिळवले. सध्या पुण्यातील एका मल्टिनॅशनल कंपनीत कार्यरत असलेले साईराज विकेंडला पुणे, सोलापूर व परिसरात विविध शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांमध्ये आपली कला सादर करतात. नोकरीसोबत कलेची जपणूक करण्याचा त्यांचा प्रयत्न अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या जादूच्या प्रयोगांमध्ये केवळ करमणूक नसून प्रेक्षकांना काही क्षणांसाठी वेगळ्याच आनंददायी विश्वात नेण्याची ताकद आहे. विनोदी शैली, सहज सादरीकरण आणि प्रेक्षकांशी साधलेला संवाद यामुळे त्यांचे प्रत्येक सादरीकरण अधिक रंगतदार ठरते. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील प्रेक्षक त्यांच्या प्रयोगांचा आनंद घेतात. त्याचबरोबर बोलक्या बाहुल्यांचे सादरीकरण हे त्यांच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरते. बाहुल्याच्या निरागस संवादातून आणि जिवंत अभिनयातून प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध होतात.

### ओठ न हलवता बाहुल्याद्वारे संवाद साधण्याची कला

ओठ न हलवता बाहुल्याद्वारे संवाद साधण्याच्या या अनोख्या कलेने अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. विशेषतः लहान मुलांमध्ये या कलेबद्दल मोठे आकर्षण दिसून येते. आजच्या काळात दुर्मिळ होत चाललेल्या या कलेला नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी साईराज सातत्याने प्रयत्नशील आहेत. लोकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे आणि कलेचे जतन करणे, हेच खरे समाधान, असे कलाकार साईराज मिर्जी सांगितले.



## नेहरूनगर शासकीय मैदानावर जॉगर्स ग्रुपतर्फे स्वच्छता मोहीम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे -**
नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर जॉगर्स ग्रुपच्या वतीने नुकतीच विशेष स्वच्छता मोहीम उत्साहात पार पडली. स्वच्छ मैदान - निरोगी आरोग्य हा मोलाचा संदेश देत राबवलेल्या या मोहिमेत जॉगर्स ग्रुपचे सदस्य, विराट व स्वामी समर्थ अॅकॅडमीचे खेळाडूनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संपूर्ण मैदान परिसर चकाचक केला.

या मोहिमेचे नेतृत्व जॉगर्स ग्रुपचे अध्यक्ष दिलीप कदम यांनी केले. यावेळी यशवंत पाथरूट, सूर्यकांत लिंगडे, रवि राठोड, संतोष कदम, अजितकुमार सांगवे, चंद्रकांत पुकाळे , संजय चौगुले, झाकणे, संतोष परीट, प्रमोद भवाळ, निलेश वरवडकर, मनिष गडदे , कौशल देशपांडे, ड. सुनील सुतार, लालसंगे, भरत धनशेट्टी आणि विजय शबादे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

या स्वच्छता अभियानात विराट अॅकॅडमी व स्वामी समर्थ अॅकॅडमीचे सर्व खेळाडू आणि जॉगर्स ग्रुपच्या सदस्यांनी श्रमदान केले. मोहिमेत सहभागी झालेल्या स्वयंसेवकांचा उत्साह वाढवण्यासाठी एलआयसीचे श्री. होटकर तसेच यशवंत पाथरूट यांच्या वतीने केळी वाटप करण्यात आले. समाजासाठी, आरोग्यासाठी आणि स्वच्छतेसाठी असे उपक्रम सातत्याने सुरू राहावेत, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

## कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आदर्श विचारातून राज्यातील जनतेची प्रगती झाली

### रयत शिक्षण संकुलात कर्मवीरांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

### उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**
कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यामुळे मुला-मुलींना मोफत शिक्षण मिळाले. वंचित, उपेक्षित, पददलित समाजातील विद्यार्थ्यांनी कमवा व शिका तत्त्व प्रणाली आत्मसात केली. त्यामुळे युवकांची स्वावलंबी पिढी निर्माण झाली. कर्मवीरांच्या विचारांचा हाच आदर्श राज्यातील जनतेने घेतला. त्यामुळे प्रगतीची दिशा दिसली, असे मत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी व्यक्त केले.

#### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

रावजी सखाराम हायस्कूल प्रशालेचा निकाल ८६.४८% लागला असून प्रशालेतील प्रथम यश राजू नवघरे, द्वितीय दिव्या अनिल कोने व तृतीय मुस्कान जाकीर अत्तार यांचा सत्कार मा. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या ६७ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर रयत शिक्षण संकुलाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी उद्योजक



केतन भाई शहा होते. यावेळी नगरसेवक बिजूअण्णा प्रधाने, समाधान आवळे, मंदाकिनी तोडकरी, ज्ञानेश्वर मॅकल, लक्ष्मी उद्योग समूहाच्या माधुरी पाटील, प्रा अमर देशमुख, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, संशोधक नितीन अणवेकर, वसंत नागणे, प्रा महादेव बागल, ड राजन दीक्षित, माजी मुख्याध्यापक संजय जोशी, काशीबाई पुजारी, भीमराव पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश वडवराव यांनी केले, सूत्रसंचलन गजानन गोरे यांनी केले तर आभार आण्णा दिक्षित यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अझहर शेख, अमोल अंधारे, देवदत्त पाटील, साजेदा बागवान, वंदना डांगे, प्रतिभा भोसले, योगेश तेली, वनिता होटकर, मीनाक्षी बिराजदार, अंजली परचंडे, महावीर आळंदकर, सुनीता पाटील यांनी प्रयत्न केले.

## जैनवाडी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ मे -**
जैनवाडी ता.पंढरपूर येथे विविध स्पर्धा परीक्षा, कंपनीत निवड, दहावी- बारावीतील गुणवंत विद्यार्थी आदींचा सत्कार करण्यात आला.



मनोज जमदाडे यांची एमपीएससी परीक्षेतून विक्रीकर सहाय्यक आयुक्त (वर्ग १) पदी निवड झाल्याबद्दल सत्कार केला. शुभम शिंदे याची अमेरिकेत इंजिनीयरपदी निवड झाल्याबद्दल सत्कार केला. प्रणाली जमदाडे, दिक्षा कुंभार, अश्विनी जमदाडे, सुरज कोळेकर यांची पुणे येथील विविध कंपन्यांमध्ये इंजिनियरपदी निवड झाल्याबद्दल सत्कार झाला. स्वस्तिक खाणे याने नवोदय विद्यालयाच्या परीक्षेत यश मिळविल्याबद्दल त्याचा सत्कार झाला. बारावीत हर्षवर्धन गोफणे याने ७७.३३ टक्के गुण, ओंकार जमदाडे याने ७२.३३ टक्के गुण, हर्ष खरातने ९५ परसेंटाइल गुण मिळवले. त्याबद्दल सर्वांचा सत्कार झाला. सीबीएसई बोर्डाच्या दहावी परीक्षेत विश्वराज पवार याने ८० टक्के गुण मिळवले तर अथर्व सतीश होनमाने याने ७७ टक्के गुण मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

कला शाखेतून पायल धोत्रे, सिद्धी दानोळे, चैत्राली दानोळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. शहाजी गोफणे, पांडुरंग जमदाडे, सविता जमदाडे, अश्विनी जमदाडे, राजकुमार जमदाडे, निळकंठ जमदाडे, मंजुषा जमदाडे यांनी सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष दीपक पवार यांनी दहा वर्षापासून अशा प्रकारच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करतो. याचा मुख्य उद्देश असा की या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांकडून प्रेरणा घेऊन गावातील इतर मुलांनीसुद्धा अशाच प्रकारचे यश संपादन करावे हा असल्याचे सांगितले. याप्रसंगी सरपंच शोभा गोफणे, हणमंत सोनवले, मधुरा पवार, कल्पना माने, विलास गोफणे, कल्पना शिंगटे, तात्या चौगुले, मोहन माने, नागनाथ खरात, प्रा.गणेश जमदाडे, बंडू लिंगडे, महादेव लिंगडे, अभिमान गोफणे, महादेव जमदाडे, नेताजी गोफणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार जमदाडे यांनी केले. आभार मल्हारी गोफणे यांनी मानले.

### श्रीशैल गंगदे यांचे निधन

**सोलापूर, दि. ९ मे-**



यातनाळ (ता. दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद शाळेचे माजी मुख्याध्यापक श्रीशैल शेट्टप्पा गंगदे गुरुजी ( वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. व्यंकय्या गुत्तेदार वाचनालयाचे ग्रंथपाल चंद्रकांत गंगदे यांचे ते वडील होते.



## श्री सिद्धेश्वर स्कूलचा निकाल १०० टक्के; प्रगती तिपरादी प्रथम

**सोलापूर, दि. ९ मे-**
माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी १००% टक्के निकालाची गौरव परंपरा राखली आहे.

श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, शिक्षण संकुल विश्वस्त आर. एस. पाटील, शिक्षण समिती सदस्य विलास कारभारी, श्री. नाडगौडा, श्री माशाळ, श्री मैंदर्गीकर, श्री येळीकर, श्री पटणे, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापक योगेश राऊत, सुपरवायझर नीता तमशेट्टी, ज्येष्ठ शिक्षिका रेणुका अरोरा, सुधा उमदी वैशाली नाडगीर, रजनी महाजन, निलावती खरात, श्रुती कुलकर्णी, विजयालक्ष्मी नष्टे, श्रुती मंगरूळकर, आदिती अक्कलकोटकर, ज्योती कनकुरे, रेणुका बुट्टे यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. **प्रथम तीन विद्यार्थी :** तिपरादी प्रगती अविनाश ९४.८०%, गुमडेल इशिता प्रशांत ९४.४०%, बिराजदार श्रेया धर्मराज ९४.४०%, मुटकिर निखिल मोतीलाल ९३.८०%.



## राजराजेश्वरी प्रशालेचा निकाल ८५.७१ टक्के; रोहित बसूदे प्रथम

**सोलापूर दि ९ मे-**
विनायक नगर येथील येथील राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेचा दहावीचा निकाल ८५.७१ टक्के इतका लागला.

१० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणीत, ३६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २३ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

या विद्यार्थ्यांना विश्वनाथ तंबाके, संगीता नरगिडे,भाग्यश्री महाजन, मारुती कांबळे, मंजिरी धुमशेट्टी, चंद्रशेखर पाटील,रोहित हत्तरगी आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार, सचिव रविशंकर कुंभार,मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार आदींनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी :** रोहित राजू बसूदे (९१.६०%), अंकिता श्रीनिवास कुरापाटी (८६.६०%), श्रावणी मल्लेशम कुडक्याल (८६.२०%).

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**गोदाम विकास कार्य**
DRM (W)'s, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक: 13-2026-SrDEN. कामाचे नाव: उस्मानाबाद मालधक्का येथे विकासाची कामे. कामाचा अंदाजित खर्च:१४,०४,५६,३७५.२१/- बयाणा रक्कम: २८,०९,१००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ (बारा) महिने. देखभाल कालावधी: २४ (चोवीस) महिने. निविदा अर्जाचे शुल्क: काहीही नाही. www.ireps.gov.in वेबसाईटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: २७.०५.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत. www.treps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: २७.०५.२०२६ रोजी १५:३० नंतर. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in टीप: संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदा वेबसाईटवर www.ireps.gov.in जारी केलेले कोणतेही बदल/सुधारणा पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाईटला भेट द्यावी.
**मं. रे. व्य. (कार्य)**
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा 24

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**लूप लाइनचे कार्य**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाईन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2026/13 कामाचे नाव: जेथे फेव्हरेबल क्रॉसओव्हर उपलब्ध आहे अशा ठिकाणी, लूप लाईनचे कॉमन लूप लाईनमध्ये रूपांतर करण्याच्या संदर्भातील कामाचा विद्युत भाग. ठिकाणे: १. सावळगी २. कुलाळी ३. दुधनी ४. बोरोटी ५. मलिकपेठ ६. आंगर ७. वडाव ८. भालवणी ९. जिंती रोड १०. भिगवण. अंदाजित खर्च: १,९१,७३,५५१.९०/- बयाणा रक्कम : ३,८३,५००.००/- पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने ऑफरची वैधता: ६० दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: ०४.०६.२०२६ रोजी १५:०० वाजता.
**वरि. मं. वि. अ. (क. वि.)**
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा 20

Shikshan Prasarak Mandali
**Prin. K. P. Mangalvedhekar Institute of Management Career Development & Research**
156-B, Railway lines, Dufferin Chowk, Solapur, Maharashtra- 413001

**NOTICE INVITING TENDER**
Applications are invited from eligible vendors/contractors for Operating the College Canteen for 3 Years. Submit applications in sealed envelopes with:
1. Technical Profile: FDA license, shop act registration, past experience
2. Financial Quote: Monthly rental offered
3. Proposed Menu: Items with subsidized student rates
Applications must reach the Institute Office within 10 days of publication.
**Sureshbabu Mankani**
Secretary-CDC

**जाहीर प्रसिद्धीकरण**
प्रति,
**श्री. प्रकाश शिवाजी डोंगरे**
रा. अक्कलकोट ता. अक्कलकोट -- अर्जदार
विरुद्ध
जन्म मृत्यू नोंदणी कार्यालय,
नगर परिषद, अक्कलकोट ता. अक्कलकोट -- सामनेवाला
ज्याअर्थी, यातील प्रकाश शिवाजी डोंगरे रा. अक्कलकोट ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करून त्यांचा मुलगा श्रीनिवास प्रकाश डोंगरे यांचा जन्म दि. २८/०५/२०२० रोजी मौजे अक्कलकोट ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतु माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद श्रीनिवास प्रकाश डोंगरे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म - मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसीलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २२/१२/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.
हे आज दि. ०६/०५/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिद्ध केले असे.
शिक्का
**सही /-**
**विनायक मगर**
**तहसीलदार अक्कलकोट**

**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.**
**रजि. ऑफिस : माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर**
website : www.saswadmalisugar.in
**CIN- U15424PN1932PLC001904**
याद्वारे नोटीस देण्यात येते की, भागधारकांची असाधारण सभा कंपनी कायदा २०१३ व रूल्स व मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने (''MCA'') त्यांच्या ८ व १३ एप्रिल २०२० व दि. ५ मे २०२०, ८ डिसेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२१ तसेच मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या दि. ५ मे २०२२, २८ डिसेंबर २०२२, २५ सप्टेंबर २०२३, १९ सप्टेंबर २०२४ व २२ सप्टेंबर २०२५ च्या (एकत्रितपणे ''MCA'' सक्र्युलर संदर्भित) सक्र्युलर अन्वये व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC)/ अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OVAM) ने घेण्यात येणार आहे.
कंपनीच्या भागधारकांची असाधारण सभा बुधवार दि. ३ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता नोटीसीत नमूद केलेल्या विषयांसाठी बोलाविण्यात आली आहे. भागधारकांना असाधारण सभेत सेंट्रल डिपॉझीटरी सर्व्हिसेस लि. (CDSL) हे देणार असलेल्या सुविधेनुसार VC/OAVM च्या माध्यमातून कामकाजात सहभागी होता येईल. VC/OAVM च्या माध्यमातून सभेस उपस्थित असलेल्या भागधारकांची कोरमसाठी गणना केली जाईल.
ज्या भागधारकांचे इ-मेल कंपनीकडे रजिस्टर केले आहेत त्यांना मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या वर नमूद सक्र्युलरनुसार कंपनीच्या भागधारकांच्या असाधारण सभेची नोटीस इ-मेलने पाठविण्यात येईल. तसेच नोटीस कंपनीच्या www.saswadmalisugar.in या वेबसाईट वर उपलब्ध केली जाईल.
ज्या भागधारकांनी कंपनीकडे अथवा त्याच्या डिपॉझीटरी पार्टिसिपंटकडे इ-मेल रजिस्टर केले नाहीत त्यांनी त्यांचे नाव व फोलिओ नंबर, डिमॅट अकाऊंट नंबरसह सदरचे इ-मेल कंपनीच्या saswadmali@yahoo.com व डिपॉझीटरी पार्टिसिपंटच्या मेलवर पाठवावेत. जेणे करून त्यांना नोटीस पाठविता येईल.
नोटीसीत नमूद केलेल्या विषयावर रिमोट इ-व्होटींगने भागधारकांना मतदान करता येईल. ज्या भागधारकांनी रिमोट इ व्होटींगने मतदान केले नाही त्यांना सभा सुरू असताना इ-व्होटींगची सुविधा देण्यात येईल. असाधारण सभेच्या नोटीसीतील विषयांवर मतदान करण्याबाबतची नियमावली नोटीसीसोबत जोडण्यात येणार आहे. तसेच सभेमध्ये कसे सहभागी व्हावे व मतदान करण्याबाबतच्या सुचना भागधारकांनी वाचाव्यात.
माळीनगर
ता. ०९.०५.२०२६
**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. करिता**
**राजेंद्र गो. गिरमे**
**चेअरमन**

# सोलापूर जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी ७.२७ कोटींचा निधी

## ३७ शाळांना क्रीडांगण विकासासाठी व ५१ संस्थांना व्यायामशाळा विकासासाठी अनुदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ मे-**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सोलापूर जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीला बळ देण्यासाठी ७ कोटी २७ लाख रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये शहर जिल्ह्यातील ३७ शाळांना क्रीडांगण विकासासाठी आणि ५१ संस्थांना व्यायामशाळा उभारणीसाठी प्रशासकीय मान्यता दिल्याची माहिती जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी दिली.

या निधीचा लाभ सोलापूर शहरासह जिल्ह्यातील बार्शी, करमाळा, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, माळशिरस, सांगोला, पंढरपूर, मोहोळ आणि मंगळवेढा या सर्व तालुक्यांतील निवडक शाळा व ग्रामपंचायतींना मिळणार आहे.

क्रीडांगण विकास योजनेंतर्गत शहर व जिल्ह्यातील ११० प्रस्ताव दाखल झाले होते. पैकी ३७ संस्थांना २ कोटी ५१ लाख रुपयांचे अनुदान मिळाले आहे. या योजनेअंतर्गत प्रामुख्याने क्रीडांगण सपाटीकरण, धावणमार्ग आणि कुंपण घालण्यासाठी प्रत्येकी ३ ते ७ लाख रुपये मंजूर झाले आहेत.



**तालुकावाईज निधी मंजूर संस्था**

**बार्शी :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), श्री शिवाजी महाविद्यालय, आनंदराव पाटील विद्यालय (पालवंडी), कर्मवीर विद्यालय (चारे), वखारिया विद्यालय (उपळे-दु), संत ज्ञानेश्वर विद्यालय (भातंबरे) आणि श्री हनुमान विद्यामंदिर (कवठे).

**करमाळा :** भारत हायस्कूल (जेऊर), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, त्रिमूर्ती विद्यालय (टाकळी-रा), मच्छिंद्र नुस्ते विद्यालय (कवितगाव), लालबहादूर शास्त्री विद्यालय (सालसे), शारदाताई पवार विद्यालय आणि कमलादेवी कन्या विद्यालय.

**दक्षिण सोलापूर :** पंचाक्षरी विद्यामंदिर (विंचूर), गणेश रामचंद्र चितळे प्रशाला (बरुर), मंद्रुपमधील जि.प. शाळा (इंदिरा नगर व हनुमान नगर) आणि श्री शंकरलिंग हायस्कूल (वळसंग).

**शहर व उत्तर सोलापूर :** जि.प. शाळा (हिरज), संगमेश्वर कॉलेज, रितेश थोबडे वस्ती प्रशाला आणि नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल.

**सांगोला :** प्राथमिक आश्रम शाळा (घेरडी), मांजरी हायस्कूल, यशवंत हायस्कूल (शिरभावी) आणि विद्यामंदिर हायस्कूल (वाकी).

**अक्कलकोट :** इस्लाह ब्रिगेड हायस्कूल (करजगी), आनंद चैतन्य प्रशाला (हन्नूर) आणि सौ. सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालय.

**पंढरपूर :** भैरवनाथ विद्यालय (अडीव), वसंतराव काळे प्रशाला (वाडीकुरोली) आणि विद्याविकास मंदिर (उंबरे).

**माळशिरस :** जि.प. शाळा (बाभळगाव), मोहोळ : मा.रा.जनी पाटील विद्यालय

**माढा :** सावित्रीबाई फुले प्रशाला व संजयमामा शिंदे विद्यामंदिर.

### व्यायामशाळा बांधकामासाठी ७ वरून १४ लाखांची तरतूद

व्यायामशाळा विकासासाठी २०१ प्रस्ताव दाखल झाले होते. यंदा ७ वरून १४ लाखांची मर्यादा वाढविण्यात आली आहे. यात जिल्ह्यातील १६ संस्थांचा समावेश आहे

व्यायामशाळा विकास निधी अंतर्गत ४ कोटी ७६ लाख रुपयांची तरतूद असून, त्यापैकी १५ संस्थांना व्यायामशाळा बांधकामासाठी प्रत्येकी १४ लाख रुपये मंजूर झाले आहेत. तसेच २८ खुल्या व्यायामशाळा व ८ बंदिस्त व्यायाम शाळांना प्रत्येकी सात लाख रुपयांचे साहित्य मिळणार आहे. यामध्ये पंढरपूरमधील ग्रामपंचायत मुंढेवाडी, कोर्टी व पेहे येथील विद्यालय, मंगळवेढ्यातील मरवडे व बठाण, माळशिरसमधील खुडूस, कोंडभावी व फोंडशिरस, माढ्यातील टेंभुर्णी, पिंपळनेर व पडसाळी, करमाळ्यातील बिटरगाव, उत्तर सोलापूरमधील श्री सिद्धिविनायक प्रशाला आणि बार्शीतील छत्रपती विद्यालय (ज्योतीबाची वाडी) यांचा समावेश आहे. सोलापूर शहरातील स्वामी विवेकानंद प्रशाला आणि चंद्रभागा यलगुलवार प्रशालेसाठीही १४ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. याशिवाय ३६ ग्राम पंचायतींना खुल्या व्यायामशाळा आणि साहित्यासाठी प्रत्येकी ७ लाख रुपये देण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने तावशी, दहिटणे, शिरवळवाडी, गुळवंची, नरोटेवाडी, हनुमंतगांव, अनकढाळ, घेरडी, कमलापूर, श्रीपतपिंपरी, भगतवाडी, उंदरगाव, रेड्डे, भालेवाडी, केम, वटवटे, कामती खुर्द, वेळापूर आणि इस्लामपूर या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या निधीमुळे जिल्ह्यातील शालेय क्रीडांगणे आणि ग्रामीण भागातील आरोग्याच्या सोयीसुविधांमध्ये मोठी सुधारणा होणार आहे.

#### जुळे सोलापूरातील तीन प्रभागात खुली व्यायाम शाळा

जुळे सोलापूर भागातील विविध कॉलनी परिसर (प्र. क्र. २३, २४, २६) मॉडेल कॉलनी, प्रल्हाद नगर, जय जलाराम नगर, मंत्री चंडक इस्टेट आणि अण्णासाहेब पाटील प्रशालेलाही या योजनेचा लाभ मिळाला आहे.

# आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत शरणार्थी व गायकवाड यांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

मुंबई, पुणे, अहमदाबाद व सांगली येथे आयोजित विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धांमध्ये फिडे मास्टर विरेश शरणार्थी व आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले. विविध बुद्धिबळ स्पर्धांमध्ये विरेशने नेत्रदीपक खेळ करत एकूण रु. १ लाख ५३ हजारांची तर मानसनेही सातत्यपूर्ण व चमकदार खेळाच्या जोरावर रु. १ लाख २९ हजारांची रोख पारितोषिके व आकर्षक चषक आपल्या नावावर केले.

विरेश व मानसला आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक सुमुख गायकवाड, उदय वगरे तसेच भारतीय बुद्धिबळ महासंघाचे मुख्य प्रशिक्षक ग्रॅण्डमास्टर अभिजित कुंटे, चोला चेस यांचे मार्गदर्शन लाभत आहे. त्यांचे सोलापुर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील व सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी अभिनंदन केले.

### विविध स्पर्धेतील कामगिरी



**वीरेश :** मुंबई : रमाबाई रानडे फिडे क्लासिकल रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा (विजेतेपद, रु. ५० हजार). अहमदाबाद : १७ वर्षांखालील राष्ट्रीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धा (पाचवा, रु. ३८ हजार). रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा(द्वितीय, रु. ३० हजार). आरसीपीपी ब्लिट्झ रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा (विजेतेपद, रु. २० हजार).



**मानस :** पुणे : चेस मॉन्क सीझन-१ स्पर्धा (विजेतेपद, रु. ७० हजार), ब्लिट्झ व रॅपिड स्पर्धा (सहावा, रु. ६ हजार), ब्लिट्झ स्पर्धा (उपविजेतेपद, रु. १० हजार). सांगली : सुरज आंतरराष्ट्रीय गुणांकन रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा ( तृतीय, १० हजार), लाटे रॅपिड आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धा ( विजेतेपद, रु. १२ हजार). अहमदाबाद : रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा ( पाचवा, रु. २१ हजार)

# सोलापूरच्या महिला संघाचा 'डीएआरसी'वर दणदणीत विजय

## साक्षी वाघमोडे, आर्या उमापची शानदार खेळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे -**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या संघाने आपल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर डी.ए.आर.सी. संघाचा १० गडी राखून पराभव केला. सलामीवीरांच्या अभेद्य भागीदारीमुळे सोलापूरने विजयाचे लक्ष्य एकही गडी न गमावता सहज गाठले.

या सामन्यात प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या डी.ए.आर.सी. संघाकडून ईशा घुले हिने एका बाजूने खिंड लढवत ६० चेंडूत १२ चौकारांच्या मदतीने ७५ धावांची शानदार खेळी केली. मात्र, इतर फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारण्यात यश आले नाही, त्यामुळे निर्धारित २० षटकांत डी.ए.आर.सी. संघाला ४ बाद १०३ धावांपर्यंत मजल मारता आली. सोलापूरकडून गोलंदाजी करताना अमृता गव्हाणे हिने ४ षटकांत १७ धावा देत १ बळी घेतला.



साक्षी वाघमोडे



आर्या उमाप

१०४ धावांचे लक्ष्य समोर ठेवून मैदानात उतरलेल्या सोलापूरच्या सलामीवीरांनी डी.ए.आर.सी.च्या गोलंदाजांचा समाचार घेतला.

आर्या उमाप हिने ५६ चेंडूत ७ चौकारांसह नाबाद ५४ धावांची अर्धशतकी खेळी साकारली, तर साक्षी वाघमोडेने ४९ चेंडूत ४ चौकारांसह नाबाद ४१ धावा करत तिला उत्तम साथ दिली. या दोघींनी १७.२ षटकांत विजयावर शिक्कामोर्तब केले. उत्कृष्ट फलंदाजीचे प्रदर्शन करणाऱ्या साक्षी वाघमोडे हिला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

**संक्षिप्त धावफलक: डी.ए.आर.सी. :** २० षटकांत १०३/४ (ईशा घुले ७५; अमृता गव्हाणे १/१७) **पराभूत विरुद्ध सोलापूर:** १७.२ षटकांत बिन बाद १०४ (आर्या उमाप ५४*, साक्षी वाघमोडे ४१).



# बेनापुरचे नाथा पवार व काटीचे गौतम शिंदे कुस्ती बरोबरीत

## श्री महालक्ष्मी यात्रेनिमित्त बचेरीतील कुस्ती स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि. ९ मे-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथे श्री महालक्ष्मी देवी यात्रे निमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम, कुस्ती मैदान व मनोरंजनाचे कार्यक्रम पार पडले.

यात्रेनिमित्त महालक्ष्मी देवी यात्रा व कुस्ती कमिटीच्या वतीने कुस्त्याचे मैदान महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष मल्ल सम्राट रावसाहेब आप्पा मगर यांचे मार्गदर्शनाखाली कुस्तीचे मैदान झाले. यात शेवटची कुस्ती बेनापुरचे पैलवान नाथा पवार व काटीचे पैलवान गौतम शिंदे यांच्यातील कुस्ती बरोबरीत सुटली. कुस्ती आखाड्याचे समालोचन ख्यातनाम समलोचक श्री पवार यांनी केले.

कुस्ती आखाड्यात महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब नगर निमगाव, माळशिरस पंचायत समितीचे सभापती दत्ता मगर, सदस्य शिवराज पुकळे, शहाजी महाडिक शेट, पैलवान मोहन मदने, पैलवान रामभाऊ गोरड, बंटु उर्फ संतोष गाढवे, प्रा सदाशिव शिंदे, नारायण शिंदे, अधिकराव माने, शांतीलाल शिंदे, विकास सुळे, विशेष कार्यकारी अधिकारी गणेश देशमुख, यात्रा कमिटीचे सदस्य रवि पडळकर, दत्तात्रय ढवळे, दशरथ ढवळे, सुदाम शिंदे, रामभाऊ शिकारे, धनाजी शिकारे, बिराबाई शिंदे व ग्रामस्थांनी केले.



# जिल्हा क्रीडा संकुलातील कामे मंद गतीने; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

जिल्हा क्रीडा संकुलातील कामे मंद गतीने चालू असल्याचे निवदेन असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर यांच्यावतीने जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांना देण्यात आले. जिल्हा क्रीडा संकुलातील बॅडमिंटन इनडोअर हॉल नुतनीकरण, ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक, वसतीगृह दुरुस्ती, अंतर्गत रस्ते व इतर विकासकामे मंद गतीने सुरू असल्याने त्यास गती देण्याच्या सूचना जिल्हा क्रीडाधिकारी यांनी द्याव्यात. ही कामे दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यामुळे जिल्ह्यातील खेळाडूंना सरावासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होत नसून त्यांच्या क्रीडा प्रगतीवर परिणाम होत असल्याच निवेदनात नमूद आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांनी विषयाचा आढावा घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी जिल्हाप्रमुख अभिजीत गायकवाड, देवदत्त सावंत, विश्वजीत गायकवाड आदी उपस्थित होते.

# धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांची अनोखी वाटचाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मे-**



पाहिली ते दहावीपर्यंत एकच शाळा, एकच वर्ग, एकसारखे कला, एकसारखे क्रीडाक्षेत्र व एकसारखे गुण मिळवणाऱ्या व योगायोगाने जन्म तारीखही एकच असलेल्या बहीण भावाची अनोखी कहाणी. क्रीडा क्षेत्रात सातत्याने विविध उपक्रम राबवत अनेक रेकॉर्ड आपल्या नावे करत क्रीडाक्षेत्राबरोबर कोणत्याही शिकवणीशिवाय स्व-अभ्यास करून, ३० ते ४०% शाळेत हजर राहून इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत साईश्वरने ७४.४५% व श्रद्धा हिने ७३.२०% टक्के गुण प्राप्त करून मोठे यश संपादन केले.

## कविवर्य माधव पवार

# माझे साहित्यिक गुरूवर्य, मार्गदर्शक व आधारस्तंभ हरपला



*जानेवारी २००२ ते जुलै २०२० पर्यंत मी छंद म्हणून केलेल्या ४० कविता घेऊन कवियित्री रेणुका बुधारम यांना भेटलो.त्यांनी मला अजून १५-२० कविता करण्यास सांगितले.त्यावेळी कोरोना काळात रेडिओ एफएम,पुणे यांनी सुचविलेल्या विषयावर मी कविता केल्या.यानंतर जुलै २०२१ मध्ये ५५ कविता घेऊन कवियित्री रेणुका बुधारम यांना भेटलो.त्यांना कविता तपासण्यास विनंती केलो. त्यांनी कविवर्य माधव पवार व साहित्यिक राजेंद्र भोसले यांची शिफारस केली. प्रथमत: मी कविवर्य माधव पवार यांना भेटण्यास त्यांच्या मोदी येथील निवासस्थानी संध्याकाळी फोन करून गेलो.त्यांचा हसरा चेहरा बघून मन प्रसन्न झाले.थोडीफार ओळख देऊन मी माझ्या कविता दादांना दाखविले.दादांनी तू कविता करतो,ही चांगली गोष्ट आहे,पण सुधारणा होणे गरजेचे आहे, असे सांगितले.त्यादिवशी त्यांची प्रकृतीची चौकशी केली असता त्यांनी माझा हात घेऊन डायलिसिस झालेल्या हातावर लावला मला एक प्रकारचा जबरदस्त विजेचा धक्का लागल्यासारखा झाला.यावरून ते मला म्हणाले, नरेंद्र मी मृत्यूला सोबत घेऊन जगतोय, असे सांगितले.मी त्यांना सांगितले की, माझ्या कविता आठवण राहण्यासाठी हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मानस आहे.तरी माझ्या कविता कृपया आपण तपासून द्यावात, अशी विनंती केली. त्यांनी राजेंद्र भोसले यांना सुद्धा तपासण्यास देण्यास सांगितले. यानंतर मी राजेंद्र भोसले सरांना भेटून त्यांना कविता तपासण्यास दिल्या.अशाप्रकारे माधव दादांचा संपर्क सुरू झाला.*

यानंतर माधव दादा आणि भोसले सर यांना चार - पाच वेळा भेटून माझा राजीव काव्यमालाकविता संग्रह तयार केलो.१५ सप्टेंबर २०२१ रोजी गणेशोत्सव -अभियंता दिन व काव्यसंग्रह प्रकाशन असा त्रिवेणी संगम साधून माधव दादांच्या अध्यक्षतेखाली व राजेंद्र भोसले यांच्या प्रमुख पाहुणे उपस्थित पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला.ह्या काव्यसंग्रहाच्या १००० प्रती पद्मशाली शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मित्र व नातेवाईक यांना भेट म्हणून दिल्या. यानंतर माझी इच्छा पूर्ण झाली ,आपण काही अभ्यासू कवी नाही,आपण इथेच थांबू या असे ठरविले.कवितासंग्रह प्रकाशनानंतर एक आठवडयाने दादांना व राजेंद्र भोसले यांना आभार व्यक्त करण्यासाठी गेलो असता मला पुनश्च कविता करण्यास प्रेरणा, प्रोत्साहन व पाठबळ दिले. दोघांच्या पाठराखणामुळे पुनश्च कविता करण्याची ऊर्जा मिळाली.दादांच्या आणि भोसले सरांच्या परिसस्पर्शामुळे माझ्या पहिल्या काव्यसंग्रहास स्वरांजली न्यूज चॅनेल २०२३ उद्योन्मुख साहित्यिक पुरस्कार मिळाला.यानंतर व्याकरण दृष्ट्या प्रयत्न करत गेलो.याला दादांचे व भोसले सरांचे वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.दुसरा काव्यसंग्रह या जन्मावर शिवप्रज्ञा प्रकाशनामार्फत दादांच्या अध्यक्षतेखाली, राजेंद्र भोसले प्रमुख उपस्थितीत व पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या शुभ हस्ते १० डिसेंबर २०२३ रोजी निर्मलकुमार फडकुले सभागृहात प्रकाशित झाला. सदरच्या काव्यसंग्रहाला कालिदास चवडेकर यांची प्रस्तावना,माधव दादांचे मलपृष्ठ लिखाण,वंदना कुलकर्णी ताई यांनी या पुस्तकाचे समीक्षण केले.यानंतर दादांचा माझा स्नेह वाढत गेला.मी त्यांना साहित्यिक गुरु मानत होतो,ते मला मित्र मानत होते.त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात मला न चुकता घेऊन जाऊन माझे सादरीकरण सुधारून घेतले.या दुसऱ्या काव्यसंग्रहाला दादांच्या आणि भोसले सरांचा परिसस्पर्शामुळे राज्यस्तरीय महामृत्युंजय वाडमय पुरस्कार २०२४ चा उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला. यावर्षी तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम सोलापूर यांनी त्यांच्या संचालक मंडळात प्रसिद्धी प्रमुख संचालक म्हणून निवड केली.आक्टोंबर २०२५ पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, सोलापूर सुवर्ण महोत्सवी समिती सदस्य पदी माझी निवड झाली.फेब्रुवारी २०२६ काव्य प्रेमी शिक्षक मंच, सोलापूर शहर उपाध्यक्ष पदी निवड झाली.मार्च २०२६ माझं कवितेचं गाव,जकातवाडी,सातारा या संस्थेच्या सोलापूर जिल्ह्या उपाध्यक्ष पदी निवड झाली.तसेच मी, कवी-लेखक दत्तात्रय इंगळे व गझलकार राम प्रभू माने तिघांनी मिळून माधव दादा व भोसले सरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नवोदित कवी संमेलने यशस्वीरित्या पार पाडले.माझा या जन्मावर हा दुसरा काव्यसंग्रह महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय निवड समितीने आक्टोंबर २०२५ मध्ये मान्यता दिली.यामुळे माझा आनंद गगनात मावेनासा झाला. यामुळे सोलापूरच्या साहित्यिक क्षेत्रात प्रसिद्धीच्या झोतात आलो.याला सर्व वर्तमान पत्राचे संपादक, पत्रकार, न्यूज चॅनेल प्रमुख यांचे मोलाचे योगदान आहे, त्यांनी मला एक कवी - लेखक म्हणून समाजात ओळख करून दिली. एक सर्वसाधारण प्राध्यापकाला साहित्य क्षेत्रात नावलौकिक करण्याचा विडा माधव दादांनी आणि भोसले सरांनी उचलला, याबद्दल मी दोघांचा आजन्म ऋणी राहीन.माधवदादांना मी खाजगीत भेटत असताना एक खंत नेहमी व्यक्त करायचे , नरेंद्र माझे मरण एखाद्या कविसंमेलनात व्हावा,किंवा तडकाफडकी मरण यावे किंवा सगळे झोपेत असताना मला मरण यावे, असे मला नेहमी म्हणायचे.यापैकी आपण सगळे झोपेत असताना दादांना देवाज्ञा झाली अन् त्यांची ईच्छा पूर्ण झाली.माधव दादा पवार माझे साहित्यिक गुरूवर्य, मार्गदर्शक व आधारस्तंभ हरपले. ईश्वर त्यांच्या कुटुंबियांना यातून सावरण्याची शक्ती देवो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.तसेच माधव दादा पवार यांच्या आत्म्यास चिरशांती मिळो,ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**- प्रा. नरेंद्र गुंडेली, सोलापूर**
**- पद्मकवी, लेखक**
मो.९८२३६४८७६५

### कविवर्य माधव पवार यांच्या शोकसभेचे आज आयोजन

जुना वालचंद कॉलेज रोड, अशोक चौक येथील श्रीकृष्ण मंदीर येथील तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम येथे रविवार दि.१० मे रोजी सायंकाळी ६ वाजता कविवर्य माधव पवार यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व कवी, साहित्यिक व नागरिक या शोकसभेस उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथालयमचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम आणि सचिव तिप्पणा गणेरी यांनी केले आहे.



## महत्त्वाचे

### गोल्फपटू पुखराज गिलने पटकावले पहिले विजेतेपद

**क्वालालम्पूर** : पहिल्या फेरीच्या समाप्तीपासूनच आघाडीवर असलेल्या पुखराज सिंग गिलने येथे झालेल्या एका अत्यंत चुरशीच्या थ्री-वे प्ले-ऑफनंतर, आरएसएद्वारे सादर करण्यात आलेले एडीटी गोल्फ प्लेयर्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.



गिलने शेवटच्या दोन होल्समध्ये दोन-शॉटची पिछाडी भरून काढली आणि त्यानंतर सौजानाच्या पाम कोर्सवर झालेल्या अतिरिक्त होल्समध्ये आपला विजय निश्चित केला. आयजीपीएलमध्ये हॉनर होम्स गुरुग्राम संघाकडून खेळणाऱ्या गिलने (७२) एकूण १३-अंडरचा स्कोअर नोंदवला; हाच स्कोअर थानविन ली (६८) आणि शॉन रामोस (६८) यांनीही नोंदवला होता. सौजाना गोल्फ अँड कंट्री क्लबमध्ये हे विजेतेपद पकावताना दोन अतिरिक्त होल्स खेळावे लागले. पुखराज गिलला १९,२५० डॉलर्सचा धनादेश प्रदान करण्यात आला. या विजयामुळे गिल एडीटी ऑर्डर ऑफ मेरिटमध्ये स्थान मिळवण्याच्या शर्यतीत एका भक्कम स्थितीत पोहोचला आहे. यानंतर तो माझागन बीच गोल्फ रिसॉर्ट येथे होणाऱ्या आयजीपीएल मोरोक्को रायझिंग स्टार्स स्पर्धेत खेळेल. ■

# साई, शुभमनची अर्धशतके

### गुजरात टायटन्स ४ बाद २२९

◆ **जयपूर, ९ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात येथील सवाई मानसिंह स्टेडियमवर गुजरात टायटन्स विरुद्धच्या आयपीएल सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सच्या सलामीवीर साई सुदर्शन (५५) व कर्णधार शुभमन गिलने (८४) तडाखेबंद फलंदाजी करत ११८ धावांची सलामी भागीदारी केली. या दोघांच्या झंझावाती खेळीच्या जोरावर गुजरात टायटन्सने २० षटकांत ४ बाद २२९ धावांची नोंद केली. त्यामुळे राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी २३० धावांचे लक्ष्य राहिले.

**पराग बाहेर, हेटमायरला संधी**

राजस्थान रॉयल्स संघाचा कर्णधार रियान पराग दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर झाला असून त्याच्या जागी शिमरॉन हेटमायरचा संघात समावेश करण्यात आला. नियमित कर्णधार रियान परागच्या अनुपस्थितीत यशस्वी जयस्वाल यजमान संघाचे नेतृत्व केली. जयस्वालने नाणेफेक जिंकून गुजरातविरुद्ध प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला







प्रथम फलंदाजी करताना साई सुदर्शन व कर्णधार शुभमन गिलने चौफेर फलंदाजी केले. विकेट मिळत नसल्याचे बघून राजस्थानच्या गोलंदाजांवर काहीसे दडपण आले.

**गिलच्या पायाला दुखापत**

नवव्या षटकाच्या अखेरीस शुभमन गिलच्या डाव्या पायात काहीतरी लचकल्यासारखे झाले. एक धाव पूर्ण केल्यानंतर तो लंगडतच दुसऱ्या टोकाकडे गेला. फिजिओने मैदानात येऊन त्याच्या पायावर मॅजिक स्प्रे फवारला. तरीही तो पुढे खेळतच राहिला. दरम्यान, गिल व साई सुदर्शन या दोघांनीही आपले अर्धशतके साजरे केले. १९ वर्षीय युवा फिरकी गोलंदाज यश राज पुंजाला ही जमलेली सलामी जोडी फोडण्यात यश आले. यश राजने सुदर्शनला जोफ्रा आर्चरकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. साई सुदर्शनने ३६ चेंडूंत ५५ धावांची अर्धशतकी खेळी केली, यात त्याने ६ चौकार व २ षट्कार ठोकले आणि त्याने गिलसोबत पहिल्या गड्यासाठी ६५ चेंडूंत ११८ धावांची भागीदारी केली. त्यानंतर शुभमन गिलने जोस बटलरसोबत दुसऱ्या गड्यासाठी ३२ धावांची भागीदारी केली, त्याचवेळी बटलर रवींद्र जडेजाच्या गोलंदाजीला बळी पडला. बटलरने १० चेंडूंत १३ धावांची भर घातली. पुढे बटलरने वॉशिंग्टन सुंदरसोबत तिसऱ्या गड्यासाठी ३५ धावांची भागीदारी करून संघाला १८५ धावांवर पोहोचवले. मध्यम गती गोलंदाज ब्रिजेश शर्मने गिलला तुषार देशपांडेकडून झेलबाद केले. शुभमन गिलने ४४ चेंडूंत ९ चौकार व ३ षट्कारांसह ८४ धावांची खेळी केली. पुढे वॉशिंग्टन सुंदरने जेसन होल्डर (७) व राहुल तेवतियाच्या (नाबाद १४) गुजरात टायटन्सला २० षटकांत ४ बाद २२९ धावांचा टप्पा गाठून दिला. वॉशिंग्टन सुंदरने २० चेंडूंत २ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ३७ धावांचे योगदान दिले. राजस्थान रॉयल्सकडून ब्रिजेश शर्मने २ बळी, तर यश राज पुंजा व रवींद्र जडेजाने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

### भारतीय मुलींची अंतिम फेरीत दिमाखदार धडक

◆ **ताश्कंद, ९ मे**

२०२६ च्या आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत १५ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील गटाच्या उपांत्य फेरीत भारताच्या १५ वर्षांखालील मुलींनी अत्यंत प्रभावी कामगिरी केली आणि सामन्यांमध्ये आपले वर्चस्व गाजविले. नऊ भारतीय बॉक्सर्सनी अंतिम फेरीत स्थान निश्चित केले आहे.

३०-३३ किलो वजनी गटात, अक्षिताने कझाकस्तानच्या अयाझान मारातविरुद्ध दणदणीत विजय नोंदविला. ३५ किलो गटात जियाला चुरशीच्या सामन्यात किर्गिस्तानच्या मलिका मोल्डोगाझिएवाकडून १-४ ने पराभव पत्करावा लागला. अन्झी (३७ किलो) हिने उझबेकिस्तानच्या सरविनोझ रिस्कुलोवावर ५-० असा निर्विवाद विजय मिळवत भारताची विजयी मालिका कायम राखली; तर सोनिया (४० किलो) हिनेही कझाकस्तानच्या डायना मेंडिगारायेवाविरुद्ध ५-० असा एकतर्फी विजय मिळवला. ४३ किलो वजनी गटात तन्वीने कझाकस्तानच्या सेझिम नुरलुबेकविरुद्ध विजय निश्चित केला. त्यानंतर, हंसिका अत्री (४६ किलो) हिनेही कोरियाच्या युहुई चेओनविरुद्ध पहिल्याच फेरीत प्रभावी विजय मिळविला. ४९ किलो गटात, खुशी राणा हिला उझबेकिस्तानच्या () झेबिनिसो अब्दुल्लायेवाकडून ०-५ ने पराभव पत्करावा लागला. ◀(वृत्तसंस्था)

# विनेश फोगटला कारणे दाखवा नोटीस

### २६ जूनपर्यंत अपात्र घोषित केले

◆ **नवी दिल्ली, ९ मे**

भारतीय कुस्ती महासंघाने (डबल्यूएफआय) शनिवारी दिग्गज कुस्तीपटू विनेश फोगटला एक कारणे-दाखवा नोटीस बजावली. तिच्यावर बेशिस्त वर्तन आणि उत्तेजक-विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. तसेच, यूडब्ल्यूडब्ल्यूच्या उत्तेजक-विरोधी नियमांनुसार निवृत्तीतून परतणाऱ्या खेळाडूंसाठी आवश्यक असलेला अनिवार्य सहा महिन्यांचा नोटीस कालावधी पूर्ण करण्यात अपयश आल्यामुळे, तिला २६ जून २०२६ पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अपात्र घोषित करण्यात आले आहे.

याचा अर्थ असा की, दोन वेळा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेत्या ठरलेल्या विनेशला आपल्या पुनरागमनासाठी आता आणखी वाट पाहावी लागेल. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतून अपात्र ठरल्यानंतर २०२४ मध्ये कुस्तीतून निवृत्ती घेतलेल्या विनेशने, स्पर्धेतील पुनरागमनासाठी रविवारी गोंडा येथे सुरू होणाऱ्या राष्ट्रीय खुल्या रँकिंग स्पर्धेचे लक्ष्य ठेवले होते.

विनेशच्या वर्तनामुळे पॅरिसमध्ये 'भारतीय कुस्तीच्या प्रतिष्ठेला



कायमस्वरूपी हानी' पोहोचली आहे. तसेच, तिने यूडब्ल्यूडब्ल्यूच्या घटनेतील तरतुदी तसेच आंतरराष्ट्रीय कुस्ती नियम आणि उत्तेजक-विरोधी नियमांचे उल्लंघन केले आहे, असा आरोप डब्ल्यूएफआयने १५ पानांच्या या नोटीसमध्ये केला आहे.

महासंघाने विनेशकडून अनेक आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. यामध्ये वजन न जुळल्यामुळे २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्याचा मुद्दा; उत्तेजक-विरोधी नियमांनुसार वेअरअबाउट्स माहिती देण्यात आलेले कथित अपयश; आणि मार्च २०२४ मध्ये तत्कालीन -नियुक्त तदर्थ समितीने आयोजित केलेल्या निवड चाचण्यांदरम्यान दोन वेगवेगळ्या वजन गटांमध्ये स्पर्धा केल्याचा आरोप, आदींचा समावेश आहे.

या वर्षी २६ जूनपर्यंत कोणत्याही देशांतर्गत स्पर्धेत सहभागी होण्यास विनेश अपात्र आहे; यामध्ये गोंडा येथील राष्ट्रीय खुल्या रँकिंग स्पर्धेचाही समावेश आहे, असे कुस्ती महासंघाने विशेषत्वाने नमूद केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### तेजिंदरपाल सिंग तूरला गोळाफेकीचे विजेतेपद

**संगरूर** : पंजाबच्या ३१ वर्षीय अनुभवी गोळाफेकपटू तेजिंदरपाल सिंग तूरने शनिवारी पंजाबमधील संगरूर येथे पार पडलेल्या इंडियन ॲथ्लेटिक्स सिरीजच्या पाचव्या टप्प्यातील पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत वर्चस्व गाजविले. त्याने १९.९७ मीटर इतकी सर्वोत्तम फेक केली. पुरुषांच्या गोळाफेकीतील आशियाई क्रीडा स्पर्धेचा विजेता, तेजिंदरपाल सिंग तूर, या महिन्याच्या अखेरीस रांची येथे होणाऱ्या आगामी प्रमुख देशांतर्गत स्पर्धेसाठी कसून सराव करत आहे. या हंगामातील माझे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये माझ्या कामगिरीचा सर्वोच्च बिंदू गाठणे हे आहे, असे राष्ट्रीय विक्रमाची नोंद असलेल्या या खेळाडूने सांगितले. तूरची या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी २१.०३ मीटर इतकी नोंदवली गेली होती. ही कामगिरी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला इंडियन ॲथ्लेटिक्स सिरीजच्या दिल्ली टप्प्यात साध्य झाली होती.

### सिएरावर मात करून गॉफ अंतिम १६ मध्ये

**रोम** : कोको गॉफने सुस्त सुरुवातीनंतर आणि तिसऱ्या सेटमधील आव्हानानंतर जोरदार मुसंडी मारीत अर्जेंटिनाच्या सोलाना सिएराला ५-७, ६-०, ६-४ असे पराभूत केले आणि शनिवारी रोम येथे सुरू असलेल्या इटालियन ओपन २०२६ स्पर्धेत अंतिम १६ मध्ये आपले स्थान निश्चित केले. फोरो इटालिकोच्या क्ले कोर्टवर झालेल्या दोन तास आणि १० मिनिटे चाललेल्या तणावपूर्ण तिसऱ्या फेरीच्या सामन्यात, जागतिक क्रमवारीत ७२ व्या क्रमांकावर असलेल्या खेळाडूने तिसऱ्या मानांकित अमेरिकन खेळाडूला कडवी झुंज दिली. पहिला सेट गमावल्यानंतर, गॉफने दुसऱ्या सेटमध्ये सिएराला एकही गेम जिंकू न देता जोरदार प्रत्युत्तर दिले आणि त्यानंतर निर्णायक सेटमध्ये एक रोमांचक पुनरागमन करून रोममधील आपली मोहीम जिवंत ठेवली. गॉफने पहिल्या सेटमध्ये २-० अशी आघाडी घेत चांगली सुरुवात केली होती, परंतु सिएराने जोरदार पुनरागमन केल्यामुळे तिला सातत्य राखण्यासाठी संघर्ष करावा लागला. अर्जेंटिनाच्या खेळाडूने ११व्या गेममध्ये एक महत्त्वपूर्ण ब्रेक मिळवला आणि नंतर स्वतःची सर्व्हिस राखून पहिला सेट ७-५ ने जिंकला, मात्र त्यानंतर गॉफने उत्स्फूर्त खेळ करत बाजी मारली. ■

# लखनौचे सलग विजयांवर लक्ष केंद्रित

◆ **चेन्नई, ९ मे**

आत्मविश्वास वाढवणाऱ्या विजयाच्या जोरावर लखनौ सुपर जायण्ट्स संघ आयपीएल २०२६ मधील आपल्या ११व्या सामन्यात रविवारी एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर पाचवेळच्या विजेत्या चेन्नई सुपर किंग्सशी दोन हात करणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३.३० वाजता सुरू होईल.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या आपल गत सामन्यातील विजयाने सलामीवीर मिचेल मार्शला पुन्हा एकदा आपल्या सर्वोत्तम व आक्रमक लयीत परतण्यास मदत झाली. त्याने ५६ चेंडूंत १११ धावांची शानदार खेळी करत सामनावीर पुरस्कार पटकावला आणि लखनौ सुपर जायण्ट्ससाठी सर्वात जलद शतक ठोकण्याचा विक्रम आपल्या नावी केला.

गोलंदाजी विभागात प्रिन्स यादवने आपली उत्कृष्ट कामगिरीची मालिका कायम ठेवली. त्याने पुन्हा एकदा अप्रतिम गोलंदाजी करत आपल्या चार षटकांत ३३ धावांत ३ बळी




ऋषभ पंत — ऋतुराज गायकवाड

घेतले, यात दुसऱ्या षटकात विराट कोहलीला बाद करणाऱ्या एका जबरदस्त चेंडूचाही समावेश होता.

आमच्यासाठी हा नक्कीच एक चांगला सामना होता. संपूर्ण संघासाठी या विजयाचे खूप महत्त्व आहे.

आम्ही अनेक गोष्टींचा प्रयोग करून पाहत आहोत. आम्हाला कधी नशिबाची साथ मिळाली, तर कधी नाही; पण हा विजय मिळविल्यामुळे मला खरोखरच आनंद झाला आहे.

शाहबाजऐवजी राठीला संधी देण्याचा निर्णय घेणे थोडे कठीण होते. शेफर्डविरुद्ध गोलंदाजी करण्यासाठी राठी हा नक्कीच योग्य पर्याय होता, असे ऋषभ पंतने सांगितले.

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील हा लखनौ संघ सलग दुसरा विजय मिळवून प्ले-ऑफ्समधील स्थानासाठीची आपली दावेदारी कायम राखण्याच्या उद्देशाने सज्ज झाला आहे.

दोन्ही संघांमधील आतापर्यंतच्या सामन्यांचा इतिहास पाहता, लखनौ सुपर जायण्ट्सचे पारडे जड आहे, कारण चेन्नईविरुद्ध खेळल्या गेलेल्या सहा सामन्यांपैकी ३ सामन्यांत लखनौने विजय मिळविला आहे. २०२३ च्या हंगामात एकाना स्टेडियमवर झालेला सामना अनिर्णित राहिला होता.

सध्याच्या स्थितीनुसार, चेन्नई सुपर किंग्सने आपल्या १० सामन्यांपैकी प्रत्येकी पाच सामने जिंकले आणि गमावले आहेत, त्यामुळे गुणतालिकेत ते सहाव्या स्थानावर आहेत.

दुसरीकडे, लखनौ सुपर जायण्ट्सने खेळलेल्या १० सामन्यांपैकी तीन सामन्यांत विजय मिळवला आहे आणि आगामी सामन्यात विजय मिळवून गुणतालिकेत वरचे स्थान गाठण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. थोडक्यात सांगायचे तर, रविवारी चेन्नईमध्ये आपली छाप पाडण्याची वेळ आता लखनौ संघावर आली आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**चेन्नई सुपर किंग्स वि. लखनौ सुपर जायण्ट्स**
**स्थळ** : एम.ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
वेळ : दुपारी ३.३० वाजतापासून

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ** : शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियम, रायपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# बंगळुरूला फलंदाजांकडून सर्वोत्तम कामगिरीची अपेक्षा

◆ **रायपूर, ९ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि मुंबई इंडियन्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. सलग दोन सामन्यांमधील पराभवाची मालिका खंडित करण्यासाठी व आपल्या मोहिमेला पुन्हा रुळावर आणण्यासाठीआरसीबी संघाला, विशेषतः

अव्वल फळीतील फलंदाजांना आपली शक्ती व कौशल्य पणाला लावावे लागणार आहे. आरसीबीने हंगामाच्या सुरुवातीलाच दमदार कामगिरी करीत झोकात सुरुवात केली होती; त्यांनी आपले पहिले चार सामने जिंकले होते आणि प्ले-ऑफमधील प्रवेश ही केवळ एक औपचारिकताच उरली आहे असे वाटत होते. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. गतविजेत्या संघाने आपल्या मागील पाच सामन्यांपैकी तीन सामने गमावले आहेत, ज्यामुळे ते स्पर्धेच्या मध्यावर




रजत पाटीदार — हार्दिक पांड्या

थोड्याशा संकटात सापडले आहेत.

सध्या गुणतालिकेत तिसऱ्या क्रमांकावर असलेला आणि १० सामन्यांतून १२ गुण मिळवलेला बंगळुरू संघ बाद फेरीत प्रवेश करण्याच्या दृष्टीने अजूनही भक्कम स्थितीत आहे. परंतु, स्पर्धेच्या निर्णायक टप्प्याकडे वाटचाल करत असताना आपल्या कामगिरीचा जोर थोडासा कमी झाला आहे, याची जाणीव बंगळुरूच्या या संघाला नक्कीच असेल. आरसीबीचे गुण राजस्थान रॉयल्स व गुजरात टायटन्स यांच्या गुणांशी (१२ गुण) बरोबरीत आहेत; आणि शनिवारी जयपूरमध्ये होणाऱ्या सामन्यानंतर राजस्थान किंवा गुजरात यापैकी एखादा संघ त्यांच्या पुढे निघून जाईल, त्यामुळे बंगळुरूचा संघ गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर घसरण्याची शक्यता आहे. गुणतालिकेतील परिस्थितीच थोडी चिंताजनक आहे, पण त्या बाह्य घटकाशिवाय आरसीबीला आपल्या फलंदाजी गटाला पुन्हा लयीत आणण्याची गरज आहे.

गुजरात टायटन्सविरुद्ध अहमदाबादच्या थोड्याशा चिकट खेळपट्टीवर, आरसीबीचे फलंदाज १५५ धावांच्या पुढे जाऊ शकले नाहीत व लखनौ सुपर जायंट्सविरुद्धचा ९ धावांनी झालेला डकवर्थ-लुईस-स्टर्न नियमानुसारचा पराभवसुद्धा दिसतो तितका चुरशीचा नव्हता. विजय मिळविण्यासाठी आरसीबीला शेवटच्या षटकात १९ धावांची गरज होती, पण ते त्या आकड्याच्या जवळपासही पोहोचू शकले नाहीत. आता, बंगळुरूच्या फलंदाजांसमोर मुंबईचे आणखी प्रभावी गोलंदाजी आक्रमण आहे, यात जसप्रीत बुमराह, कॉर्बिन बॉश, ए. एम. गझनफर व विल जॅक्सचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

### पॉण्टिंग, अय्यरमुळे मानसिकतेत बदल : सूर्यांश

**नवी दिल्ली** : मुख्य प्रशिक्षक रिकी पॉण्टिंग आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांनी माझ्या मानसिकतेत बदल केले, त्यामुळे मी चालू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात दमदार कामगिरी करू शकलो, असे पंजाब किंग्जचा अष्टपैलू खेळाडू सूर्यांश शेडगे म्हणाला. अय्यर आणि पॉण्टिंग यांच्याशी नियमितपणे होणाऱ्या संभाषणांमुळे मला तयारीवर लक्ष केंद्रित करण्यास, वर्तमानात जगण्यास आणि आपल्या अंतप्रेरणेवर विश्वास ठेवण्यास मदत झाली. हेच धडे मला संघाच्या अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाल्यावर व मिळालेल्या संधींचा पुरेपूर फायदा उठवण्यास सक्षम ठरले, असे या मुंबईकर अष्टपैलू खेळाडूने सांगितले. मी फलंदाजी चांगली करत आहे आणि तू इतर गोष्टींचा अतिविचार करू नको असे श्रेयस भाईने मला सांगितले होते. ■

# ब्लिट्झ स्पर्धेच्या मध्यावर गुकेश पाचव्या स्थानावर

### सुपर रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ

◆ **वॉर्सा, ९ मे**

जागतिक विजेता डी. गुकेशला ब्लिट्झ विभागाच्या सुरुवातीला काहीशा डळमळीत कामगिरीचा सामना करावा लागला; परंतु, येथील सुपर रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धेच्या नवव्या फेरीत पोलंडच्या जान-क्रिस्टोफ दुदावर मिळवलेल्या दणदणीत विजयासह त्याने आपली स्थिती सुधारली.

रॅपिड विभाग १८ पैकी ९ गुणांसह पूर्ण केल्यानंतर गुकेशने ब्लिट्झ विभागाच्या सुरुवातीच्या नऊ फेऱ्यांमधून आणखी चार गुण मिळविले. यामुळे, ब्लिट्झ स्पर्धेच्या मध्यावर (अर्ध्या टप्प्यावर) त्याची एकूण गुणसंख्या २७ पैकी १३ वर पोहोचली आहे.

ब्लिट्झ स्पर्धेच्या पहिल्या दिवशी अत्यंत साधारण कामगिरी करूनही अमेरिकेचा हॅन्स मोके निमन गुणतालिकेत अव्वल स्थानी कायम राहिला आहे. या अमेरिकन खेळाडूने ९ पैकी ३.५ गुण मिळवत आपली एकूण गुणसंख्या १६.५ वर नेली आहे आणि आता तो त्याचाच देशबांधव वेस्ली सो याच्यापेक्षा अर्ध्या गुणाने आघाडीवर आहे. तिसरा अमेरिकन खेळाडू फॅबियानो कारुआना हा



स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्हसह प्रत्येकी १५ गुणांसह संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहे, तर गुकेश त्यांच्यापेक्षा दोन गुण कमी मिळवत त्यानंतरच्या स्थानावर आहे.

फ्रान्सचे खेळाडू फिरौझा अलीरेझा आणि मॅक्सिम वाशियर-लाग्राव्ह हे दुदासह प्रत्येकी १२.५ गुणांसह संयुक्तपणे सहाव्या स्थानावर आहेत; तर पुढील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा दावेदार असलेला उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्ह १२ गुणांसह नवव्या स्थानावर आहे. पोलंडच्या रादोस्लाव्ह वोज्ताशेक याने १० गुण मिळवत दहा खेळाडूंचा हा गट पूर्ण केला. ◀(वृत्तसंस्था)

# साहिल जाधवला पहिले विश्वचषक पदक

◆ **शांघाय, ९ मे**

विद्यमान जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेचा विजेता साहिल जाधव याने जागतिक स्तरावरील आपल्या केवळ दुसऱ्याच सहभागात पहिले-वहिले तिरंदाजी विश्वचषक पदक पटकावले. शनिवारी येथे पार पडलेल्या दुसऱ्या टप्प्यातील विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत कम्पाऊंड पुरुष गटात त्याने कांस्यपदकाची कमाई केली.



महाराष्ट्राचा २५ वर्षीय तिरंदाज साहिल जाधव याने कांस्यपदकासाठीच्या लढतीत (प्ले-ऑफ) डेन्मार्कचा अनुभवी खेळाडू-तथा-प्रशिक्षक मार्टिन डॅम्सबो याचा १४७-१४४ अशा गुणांनी पराभव केला. या विजयासह त्याने या स्पर्धेतील भारताचे पहिले पदक निश्चित केले. कम्पाऊंड गटातील भारताचे हे अखेरचे पदक ठरले; कारण या गटातील त्याचे इतर सहकारी खेळाडू पदकाच्या फेऱ्यांपर्यंत पोहोचू शकले नाहीत. कम्पाऊंड सांघिक स्पर्धांमध्ये पारंपारिकरित्या एक बलाढ्य शक्ती मानल्या जाणाऱ्या भारतासाठी ही स्पर्धा निराशाजनक ठरली, कारण त्यांचे सर्व संघ स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यातच बाद झाले. आता रविवारच्या समारोपाच्या दिवशी, रिकर्व्ह गटात आणखी दोन पदकांची भर घालण्याकडे भारताचे लक्ष असेल. महिलांचा संघ सुवर्णपदकासाठी लढेल, तर सिमरनजीत कौर आपल्या मोहिमेची सुरुवात थेट उपांत्य फेरीतून करेल; तिला तिचे पहिलेवहिले विश्वचषक पदक निश्चित करण्यासाठी केवळ एका विजयाची आवश्यकता आहे. गत महिन्यात मेक्सिकोच्या प्युएब्ला येथे विश्वचषक स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या जाधवसाठी शांघायमधील ही स्पर्धा अत्यंत यशस्वी आणि निर्णायक ठरली. ◀(वृत्तसंस्था)

### रामित टंडन, सेंथिलकुमार विश्व स्क्वॅश स्पर्धेच्या बाहेर

**गिझा** : इजिप्तमधील गिझा येथे शनिवारी पार पडलेल्या जागतिक स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष गटाच्या पहिल्याच फेरीत भारताच्या रामित टंडन आणि वेलवन सेंथिलकुमारला पराभवाचा सामना करावा लागला आणि ते स्पर्धेबाहेर झाले. पहिल्या फेरीत वीर चोत्राणीने आपल्याच देशाचा अभय सिंगचा चुरशीच्या लढतीत पराभव केल्यानंतर, दुसऱ्या दिवशी जागतिक क्रमवारीत ४० व्या क्रमांकावर असलेल्या टंडनला इजिप्तच्या आणि २१ व्या क्रमांकावर असलेल्या करीम अल तोर्कीकडून ६-११, ११-७, ६-११, ०-११ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला. ■

# जयस्वाल, शेफाली 'नाडा'च्या कचाट्यात

### डोप चाचणी चुकविली

◆ **नवी दिल्ली, ९ मे**

भारतीय क्रिकेटपटू यशस्वी जयस्वाल आणि शफाली वर्मा या दोघांना गत वर्षी नियोजित डोप चाचण्यांसाठी उपलब्ध न राहिल्यामुळे राष्ट्रीय उत्तेजक-विरोधी संस्थेने (नाडा) नोटिसा बजावल्या आहेत. यामुळे त्यांच्याकडून ठिकाणाची माहिती देण्याबाबतची पहिली चूक घडली आहे.

नाडाच्या नोंदणीकृत चाचणी गटाचा भाग असलेल्या या दोन्ही




यशस्वी जयस्वाल — शेफाली वर्मा

खेळाडूंनी, चुकलेल्या चाचण्यांमागील कारणांचे स्पष्टीकरण दिले नाही, परिणामी त्यांना या नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत, अशी माहिती विश्वसनीय सूत्राने दिली.

संबंधित खेळाडूंना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत आणि त्याबाबत बीसीसीआय तसेच आयसीसीलाही कळविण्यात आले आहे, असे एका उच्चपदस्थ सूत्राने सांगितले. मात्र, या प्रक्रियेची गोपनीयता राखण्याचे कारण देत नाडाने यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

होय, चुकलेल्या चाचण्यांविषयी आम्हाला नाडाकडून सूचना प्राप्त झाली आहे. हे नेमके कसे घडले, याविषयी आम्ही त्यांच्याशी चर्चा करू आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक ती पावले उचलू, असे सूत्राने सांगितले.

क्रिकेटचा पुन्हा ऑलिम्पिकमध्ये समावेश झाला आहे. त्यामुळे सर्व काही सुरळीत पार पडावे यासाठी आम्हाला सर्व नियमावलींचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे, असे बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले. २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# राजकारण व अधिकाऱ्यांच्या दबावतंत्राचा शेतकऱ्यांना फटका

## मंद्रुप येथील शेंडगे वस्तीच्या रस्त्याला स्थगिती



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.९ मे -**

ठेकेदारांना कार्यारंभ आदेश देऊन एका महिन्यानंतर दुसऱ्या ठेकेदारांनी तक्रार केल्यामुळे अनेक दिवसांपासून वादात सापडलेल्या शेंडगे वस्ती रस्त्याचे काम बंद ठेवण्याचे आदेश बांधकाम उपअभियंत्यांनी दिले आहेत. त्यामुळे मंद्रूपमधील शेंडगे वस्तीच्या शेतकऱ्यांना पुन्हा राजकीय गटबाजी व ठेकेदारांच्या वादाचा फटका बसला आहे.

राजकारणापेक्षा आम्हाला हक्काचा रस्ता करून द्या, अशी विनंती शेतकरी करीत आहेत. अनेक वर्षांपासून शेंडगे वस्तीच्या रस्त्याचा विषय प्रलंबित आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आमदारांची भेट घेऊन निधीची मागणी केली. त्यानंतर जनसुविधांतर्गत लोकसेवा शाळेपासून शेंडगे वस्तीपर्यंत २० लाख रूपयांचा निधी मंजूर झाला. ठेका मिळवण्यासाठी भुरीकवठे येथील आशीर्वाद मजूर संस्था व माळकवठे येथील अमोगसिध्द मजूर संस्था यांच्यात स्पर्धा होती. ६ एप्रिलला माळकवठे येथील मजूर संस्थेला कार्यारंभ आदेश दिला. त्यांनी कामास सुरूवात केली.

मात्र भुरीकवठे येथील संस्थेने रस्त्याच्या कामाबद्दल तक्रार केल्यानंतर दक्षिणच्या गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी सुनावणी घेऊन ठेकेदारांमधील वाद मिटविण्याचे आदेश दिले. ठेकेदारांच्या वादात विकास निधी परत जाऊ नये, याची दक्षता घेण्याची सूचना केली. त्यानुसार दक्षिण पंचायत समिती बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी ठेकेदारांमधील वाद मिटेपर्यंत काम बंद ठेवण्याचे आदेश दिले.

एकीकडे दक्षिणच्या बांधकाम विभागाकडून कार्यारंभ मिळाल्यानंतर सहा महिन्यात काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तर दुसरीकडे तक्रारीमुळे एक महिना काम सुरू झाले नाही. शिवाय महिन्यानंतर पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे ठेकेदाराला मुदतवाढ मिळणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे. दक्षिण पंचायत समितीकडे मंद्रूपमधील निकृष्ट कामाबद्दल अनेक तक्रारी असताना 'अर्थ'पूर्ण चर्चामुळे ती विकासकामे थांबविण्याचे आदेश देण्यात आले नाही. त्यामुळे कोट्यावधी रूपये पाण्यात गेली आहेत. याकडे अधिकारी गांभीर्याने न पाहता स्थानिक राजकारण व गटबाजीत हस्तक्षेप करीत शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या रस्त्याला जाणिवपूर्वक स्थगिती देऊन प्रशासनही राजकारण करीत असल्याची चर्चा सुरू आहे.

### २० लाख रुपये निधी परत जाण्याची शक्यता



शेंडगे वस्तीच्या रस्त्याच्या कामाचे कार्यारंभ दिले. मात्र भुरीकवठे येथील मजूर संस्थेच्या तक्रारीमुळे रस्त्याचे काम बंदचे आदेश दिले आहेत. दोन्ही ठेकेदारांनी तक्रार मिटवून घेतल्यानंतरच काम करण्याची सूचना दिली आहे. अन्यथा २० लाख रूपये निधी परत जाण्याची शक्यता आहे, असे दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांच्या त्रासाचा विचार करावा

शेंडगे वस्तीच्या रस्त्याचा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शेतकऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे २० लाख निधी मिळाला, मात्र ठेकेदारांमधील वाद व अधिकाऱ्यांच्या दबावतंत्रामुळे रस्त्याचे काम बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. महिन्यानंतर पावसाळा सुरु होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होणार आहे. म्हणून अधिकाऱ्यांनी राजकारण न करता रस्ता करण्याचे आदेश द्यावेत, असे रेवणसिध्द शिंगडगाव या शेतकऱ्यांने सांगितले.



# खोट्या 'एमआरपी'द्वारे ग्राहकांची प्रचंड लूट

**● ग्राहक पंचायतीचे देशव्यापी आंदोलन ●**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे-**

वस्तुंवर छापलेल्या अवाजवी एमआरपी किंमतीद्वारे सुरू असलेली ग्राहकांची लूट थांबवा यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने देशव्यापी आंदोलन सुरु केल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

ग्राहकांना योग्य दरात वस्तू व सेवा मिळाव्यात म्हणून वस्तुची किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापण्याचे शासनाने बंधनकारक केले. मात्र याचा गैरफायदा घेत अवाजवी एमआरपी छापून ग्राहकांची लूट चालू आहे. ग्राहकांची लूट थांबवण्यासाठी मागील दोन वर्षापासून ग्राहक पंचायत विविध पातळीवर प्रयत्न करीत आहे. शासनाकडून अद्यापही योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचे पंचायतीने ठरविले आहे. त्याचाच एक भाग म्हणून १ मे ते २० मे दरम्यान देशभरातील ग्राहकांकडून अवाजवी एमआरपी विरुद्ध पंतप्रधान, अर्थमंत्री, वाणिज्य मंत्री, उद्योग मंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांना लाखो ईमेल पाठविण्यात येत आहेत.

दैनंदिन गरजेच्या वस्तू, विशेषतः पॅकिंग केलेल्या वस्तू, कापड, इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिक वस्तू. रेडीमेड पादत्राणे, औषधे इ. वस्तूवर २०० ते ३०० टक्के अवाजवी एमआरपी छापत आहेत.अवाजवी एमआरपी हा ग्राहकाचे खिसे रिकामे करण्याचा एक कायदेशीर मार्ग झाला आहे. यामुळे ग्राहकाची सहनशीलता संपली आहे. ही बाब लक्षात घेऊन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने पंतप्रधान कार्यालय आणि अर्थमंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री, वाणिज्य मंत्री यांना सध्याचा एमआरपी कायदा रद्द करण्यासाठी आणि उत्पादन खर्चावरील नफा २०-३० टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी कायदा करण्याबाबत निवेदन पाठवणार आहे. त्याच्या प्रती ११ मे रोजी राज्यातील सर्व तहसीलदार, प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### 'जंतरमंतर'वर २५ मे रोजी आंदोलन

सोमवार, दि.२५ मे रोजी नवी दिल्ली येथील जंतरमंतरवर सत्याग्रह आंदोलनासाठी देशभरातून कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. आंदोलनात https://tinyurl.com/StopMRPLoot या लिंकद्वारे ईमेल करून जास्तीत जास्त ग्राहकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, प्रांत सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा कोषाध्यक्ष ललिता वांगडे, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, सहसचिव दीपक भंडारकवठेकर यांनी केले आहे.

# अज्ञात पिकअपने कट मारल्याने कारची एसटी बसला जोरदार धडक

**● एकाच कुटुंबातील तिघे जखमी ● लहान मुलगा थोडक्यात बचावला**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.९ मे-**




बार्शी-कुर्डूवाडी रोडवरील खांडवी परिसरात शुक्रवारी पहाटे भीषण अपघात झाला. अज्ञात पिकअप चालकाने मारलेल्या कटमुळे कार अनियंत्रित होऊन समोरुन येणाऱ्या एसटी बसला धडकली. या अपघातात एकाच कुटुंबातील तिघेजण जखमी झाले असून, सुदैवाने एक लहान मुलगा थोडक्यात बचावला आहे.

पुणे येथील ढोले वस्ती (कुरळी) परिसरात राहणारे हॉटेल व्यावसायिक विनोद शशिकांत शिंदे (वय-३७) हे आपल्या कुटुंबासह कारने (क्र. १४/०९६२) पुण्याहून मूळ गावी कोथळा (ता.कळंब, जि.धाराशिव) येथे जात होते. शुक्रवार, दि. ८ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्यांची कार बार्शी-कुर्डूवाडी रोडवरील खांडवी परिसरातील लकी हॉटेलजवळ आली. समोरुन बार्शी-कोल्हापूर एसटी बस (क्र.१४/५०६२) येत होती. बसला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका अज्ञात पिकअप चालकाने शिंदे यांच्या कारच्या चालक बाजूच्या टायरला जोरदार कट मारला. या धडकेमुळे कारच्या पुढील टायरमधील हवा निघून टायर फुटले आणि चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेली कार थेट समोरुन येणाऱ्या एसटी बसवर जाऊन आदळली. अपघातानंतर एसटी बसचे चालक, वाहक आणि प्रवाशांनी तात्काळ मदतकार्य सुरु करत कारमधील जखमींना बाहेर काढले. शिंदे यांच्या कारच्या मागून येणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांच्या दुसऱ्या वाहनातील लोकांनी जखमींना तातडीने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले. या अपघातात विनोद शशिकांत शिंदे (वय-३७) यांचा उजवा पाय मोडून गंभीर दुखापत झाली आहे. कोमल विनोद शिंदे (वय-३२) आणि भक्ती विनोद शिंदे (वय-१२) यांना किरकोळ मार लागला आहे. कैवल्य हा मुलगा या अपघातातून सुखरुप बचावला. जखमींवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली. अपघात घडवून पिकअप चालक घटनास्थळावरुन फरार झाला असून, याप्रकरणी विनोद शिंदे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# बार्शीत हिट अँड रनची घटना; उत्तर प्रदेशातील युवकाचा मृत्यू

**बार्शी दि.९ मे-**

बार्शी शहरातील गाडेगांव रोड परिसरात एका अज्ञात वाहनाच्या धडकेत उत्तर प्रदेशातील २१ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अपघातानंतर संबंधित वाहन चालकाने जखमी युवकाला कोणतीही मदत न करता घटनास्थळावरुन पलायन केल्याने हिट अँड रनची ही घटना चर्चेचा विषय ठरत आहे.

नरीज रामकसिन गौतम (वय २२, मूळ रा. जौरासा, ता. हैदरगड, जि. बाराबंकी, उत्तर प्रदेश) हे आपल्या चुलत भावासह बार्शी येथे वास्तव्यास असून मूर्ती कारागीर म्हणून काम करतात. गेल्या नऊ महिन्यांपासून ते गाडेगाव रोड परिसरातील अँपल हॉटेलच्या मागे राहून उत्तरेश्वर भगवान कांबळे यांच्याकडे मूर्ती बनविण्याचे काम करुन उदरनिर्वाह करत होते. गुरुवार दि. ८ मे रोजी रात्री ९.३० च्या सुमारास नरीज यांचा चुलत भाऊ सुरज रामकिशोर गौतम हा मालकांची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. २५ २७५६) घेऊन किराणा सामान आणण्यासाठी गाडेगाव रोड परिसरात गेला होता. मालक उत्तरेश्वर कांबळे यांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने फोन उचलून प्यासा हॉटेलजवळ अपघात झाल्याची माहिती दिली. यानंतर नरीज गौतम व उत्तरेश्वर कांबळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या सुरजला खाजगी रुग्णवाहिकेतून बार्शी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करुन रात्री १०.३५ वाजता त्याला मृत घोषित केले. नातेवाईकांनी परिसरातील लोकांकडे चौकशी केली असता, सुरजच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याचे समोर आले. अपघातानंतर वाहन चालकाने जखमीला वैद्यकीय मदत न करता तसेच पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरुन पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

**मदत न करता अज्ञात वाहन चालक फरार**



# चंद्रभागेत उडी मारुन आत्महत्या करु पाहणाऱ्या वृध्दाचा जीव वाचवला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे-**

चंद्रभागेच्या पात्रात उडी मारून आत्महत्या करु पाहणाऱ्या एका वृध्दाचा जीव कोळी तरुणांनी वाचवला. रघुनाथ कोरडे (वय-७६, रा.हिंगणी, ता.तेलारा,जि.अकोला) असे त्या वृध्दाचे नाव आहे.

आयुष्याचा कंटाळा आल्याने विठ्ठलास जीव समर्पित करण्याच्या भावनेनं आत्महत्या करत असल्याचे त्या वृध्दाने सांगितले.विठ्ठल अधटराव, महेश परचंडे, सुहास साळुंखे, साहिल माने, संकेत कोरे, गणेश कोळी यांनी सदर वृध्दाचा जीव वाचवला. आपत्कालीन व्यवस्थापनसाठी रेस्क्यू टीम नेमून त्यात कोळी समाजातील तरुणांना समाविष्ट करण्यात यावी, अशी मागणी महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केली.

# 'नागनाथ'चे माजी विद्यार्थी ३४ वर्षांनी आले एकत्र

**अक्कलकोट दि ९ मे-**

तालुक्यातील नागनाथ प्रशाला कुरनूर येथील १९९१-९२ च्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल ३४ वर्षांनी स्नेह मेळावा पार पडला.

माजी विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक व निवृत्त शिक्षकांचे स्वागत केले. देवी सरस्वती प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक महादेव माने यांनी केले. मुख्याहरिदास जाजनुरे, शरणप्पा ढोणसाले, परशुराम बेडगे, मदार शेख, सुरेश माने, स्वामी सुरवसे, किसन कांबळे, शहाजी गायकवाड आदी निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला. निवृत्त शिक्षकांनी मार्गदर्शन केले. आबा कुरनूरकर, कार्तिक पाटील, उस्मान मुजावर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.दुपारी विद्यार्थी व शिक्षकांनी स्नेहभोजन केले. यावेळी राजेंद्र मोरे, मेजर रामचंद्र शिंदे, भास्कर मोरे, मधुकर बनसोडे, विठ्ठल सपकाळ, महादेव पाटील, बाबासाहेब शिंदे, गणेश पाटील, हेमंत पवार, पोपट गायकवाड, तानाजी मोरे, मीनाक्षी मोरे, अनुराधा शिंदे, चिमु इंडे, बेबा साखरे, हिरालाल मुजावर, विकास येवते, गोविंद पाटील, राजकुमार पाटील, रफिक शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन दिगंबर जगताप तर कार्तिक पाटील यांनी आभार मानले.



# 'खेडभाळवणी'तील मेळाव्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे-**

एकता महिला मंचतर्फे पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथे विशेष मार्गदर्शन मेळावा, सन्मान सोहळा आणि महिला स्पर्धांचा सोहळा अत्यंत उत्साहात झाला. पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक रेखा घनवट, निर्भया पथकाच्या प्रमुख सुप्रिया यादव यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्रभाकर क्षीरसागर, शाहीद सय्यद, सुमित टकले, अनुराधा हडपद, मीनाक्षी साळुंखे, प्रियंका दामोदरे, सुरेखा साळुंखे, भामा चंदनशिवे आदी उपस्थित होते. प्रियंका दामोदरे यांनी सूत्रसंचालन, मीनाक्षी साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. भामा चंदनशिवे यांनी आभार मानले.

प्रत्येक स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे मलबार गोल्ड अँड डायमंड सोलापूर यांच्यातर्फे काढलेला 'लकी ड्रॉ'. यामध्ये तीन भाग्यवान महिला विजेत्यांना मलबार गोल्डतर्फे विशेष आकर्षक भेटवस्तू दिल्या.

# खरीप पिकविम्यापोटी शेतकऱ्यांना ४१.४५ कोटींचे वाटप

**▶▶ ४२ हजार ७९७ शेतकऱ्यांना लाभ**
**▶▶ उत्पन्नावर आधारित नुकसान भरपाई**

**तभा वृत्तसेवा । विकास चाटी**
**सोलापूर, दि.९ मे-**

खरीप हंगाम २०२५ मध्ये नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त ४१ कोटी ४५ लाख ९१ हजार ४४३ रुपयांची मदत करण्यात आले. तब्बल ४२ हजार ७९७ शेतकऱ्यांना हा लाभ मिळाला आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले.

मुगाची सर्व भरपाई माढा तालुक्यातील २४८१ शेतकऱ्यांना मिळाली आहे. भुईमुगाचे पैसे बार्शी तालुक्यातील ६२२ शेतकऱ्यांना मिळून १ कोटी ८८ लाख ५१ हजार ६९७ रुपये मिळाले. मक्याचे सर्व पैसे माळशिरस तालुक्यातील १ हजार ४५७ शेतकऱ्यांना मिळाले. कांद्याचे पैसे पाच तालुक्यातील २० हजार ५६९ शेतकऱ्यांना मिळाले आहेत.

| एकूण नुकसानभरपाई | |
|---|---|
| कांदा | २९ कोटी ६६ लाख ११ हजार ८६८ |
| बाजरी | ५४ लाख ३० हजार १२४ |
| मुग | १ कोटी ३८ लाख १६ हजार ७५९ |
| भुईमुग | १ कोटी ९२ लाख १९ हजार ७५६ रुपये |
| तुर | ५ कोटी १७ लाख ४० हजार ९८९ |
| मका | २१ लाख ६७ हजार ४८० |
| सोयाबीन | २ कोटी ७७ लाख ७१ हजार ९४७ |

त्यात माढा तालुक्यातील ६४२७ शेतकऱ्यांना ९२ लाख ८१ हजार १४१ रुपये, माळशिरस तालुक्यातील १३०७ शेतकऱ्यांना ७१ लाख ६६ हजार ५६७ रुपये, मंगळवेढा तालुक्यातील ५६९४ शेतकऱ्यांना १७ कोटी ३४ लाख २५ हजार ६१३ रुपये, उत्तर सोलापूर तालुक्यातील २९०३ शेतकऱ्यांना ३ कोटी ३३ लाख ६ हजार १५८ रुपये, दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४२३८ शेतकऱ्यांना ७ कोटी ३४ लाख ३२ हजार ३८९ रुपये मिळाले.

बाजरीचे पैसे करमाळा आणि माढा तालक्यातील शेतकऱ्यांना मिळाले. त्यात करमाळा तालुक्यातील ६३२ शेतकऱ्यांना २५ लाख ९४ हजार ६०५ रुपये तर माढा तालुक्यातील २५० शेतकऱ्यांना २८ लाख ३५ हजार ५१९ रुपये मिळाले. तुरीचे पैसे माढा, मंगळवेढा, मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाले. माढा तालुक्यातील ४८४५ शेतकऱ्यांना ४ कोटी ४६ लाख ५७ हजार ९७० रुपयांची भरपाई मिळाली. मंगळवेढा तालुक्यातील ५७३९ शेतकऱ्यांना ६४ लाख ५ हजार ४८४ रुपयांची भरपाई मिळाली आहे. मोहोळ तालुक्यातील ५०८ शेतकऱ्यांना ६ लाख ७७ हजार ५३५ रुपयांची नुकसान भरपाई मिळाली.

विविध पिकांसाठी मिळालेल्या नुकसान भरपाईत अक्कलकोट तालुक्यातील ११६ शेतकऱ्यांना ३ लाख ६८ हजार ५९ रुपये, बार्शी तालुक्यातील ६२२ शेतकऱ्यांना १ कोटी ८८ लाख ५१ हजार ६९७ रुपये, करमाळा तालुक्यातील ६३२ शेतकऱ्यांना ५ लाख ९४ हजार ६०५ रुपये, माढा तालुक्यातील १४ हजार ३ शेतकऱ्यांना ५ कोटी ९१ हजार ३८९ रुपये, माळशिरस तालुक्यातील २७६४ शेतकऱ्यांना ७१ लाख ६६ हजार ५६७ रुपये, मंगळवेढा तालुक्यातील ११ हजार ४३३ शेतकऱ्यांना १७ कोटी ९८ लाख ३१ हजार ९७ रुपये, मोहोळ तालुक्यातील ६०८६ शेतकऱ्यांना २ कोटी ८४ लाख ४९ हजार ४८२ रुपये, उत्तर सोलापूर २९०३ शेतकऱ्यांना ३ कोटी ३३ लाख ६ हजार १५८ रुपये, दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४२३८ शेतकऱ्यांना ७ कोटी ३४ लाख ३२ हजार ३८९ रुपयांची नुकसान भरपाई मिळाली आहे.

**पंढरपूर, सांगोला तालुक्यातील एकाही शेतकऱ्याला नाही लाभ**
**खरीप पिकविम्याचा सर्वाधिक लाभ माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाला. याउलट पंढरपूर व सांगोला तालुक्यातील एकाही शेतकऱ्याला लाभ मिळालेला नाही.**



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नसरापूर येथील घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ मे -**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे चार वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचार व हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्यपाल यांना उपविभागीय कार्यालय कळंबमार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात आरोपींवर फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा तसेच फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

महिला व बालकांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत तीव्र चिंता व्यक्त करत अशा गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाल्यास समाजात कायद्याचा धाक निर्माण होईल, असे संघटनेने म्हटले आहे.

महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी शासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे सांगितले.

तसेच गंभीर प्रकरणांमध्ये जलदगतीने न्याय देण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी सम्राट गायकवाड, इम्रान काझी, अभय गायकवाड, मुल्ला मोहसीन, इरफान शेख, मुबीन बशीर मणियार, आकाश पवार, अलिम आत्तार, अक्षय सातव, फरमान सय्यद, समीर सय्यद आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### तुळजाभवानी मंदिरात पारंपरिक नगारा मिरवणूक उत्साहात

**तुळजापूर, दि.९ मे -**

श्री तुळजाभवानी मंदिरात पारंपरिक नगारा मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. या मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत भक्तिमय वातावरण अनुभवले. मंदिरात नर व मादी असे दोन नगारे असून त्यापैकी एखादा नगारा निकामी झाल्यास शुभ मुहूर्तावर नवीन नगारा तयार करण्यात येतो. विधीवत पूजनानंतर हा नगारा बैलगाडीत ठेवून मिरवणुकीने मंदिरात आणला जातो. विशेष म्हणजे, या गाडीला बैलाऐवजी भक्त स्वतः ओढतात. मंदिर परिसरात प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर नगाऱ्याची स्थापना करून पूजा, नैवेद्य व आरती करण्यात आली. यावेळी महंत तुकोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने, सहाय्यक धार्मिक व्यवस्थापक रामेश्वर वाले, अनुप ढमाले, नगरसेविका प्रियांका गंगणे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

### गायत्री पाटील हिचे दहावी परिक्षेत सुयश

**उमरगा, दि.९ मे -**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. उमरगा तालुक्यातील डॉ.के.डी. शेंडगे इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी गायत्री महादेव पाटील हिने ५०० पैकी ४९२ गुण मिळवत, संगीत विषयाचे ८ गुण जोडून एकूण ५०० पैकी ५०० गुण प्राप्त केले. या उल्लेखनीय यशामुळे तिने जिल्ह्यात अव्वल येण्याचा मान पटकावला आहे. गायत्री हीचे या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. गायत्रीला पुढे डॉक्टर बनून आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे असून, ती सध्या निट परीक्षेची तयारी करत आहे.



### उमरग्यात मटका जुगारावर छापा

**धाराशिव, दि.९ मे -**

जुगार विरोधी कारवाईदरम्यान उमरगा पोलिसांनी अण्णाभाऊ साठे चौक परिसरात छापा टाकून मटका जुगार साहित्य व रोकड जप्त केली आहे. दि. ८ मे रोजी पोलिसांनी टपरीवर छापा टाकला असता फारुक महेबुब सय्यद (वय ५१, रा. हुसेनबशा गल्ली, उमरगा) हा कल्याण मटका जुगाराचे साहित्य व ८५० रुपयांची रोकड स्वतःच्या ताब्यात बाळगताना आढळून आला.

# जातीवाचक वक्तव्याच्या निषेधार्थ परंडा शहर बंद; कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ मे -**

परंडा नगर परिषद कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक जगदीश सोंडगे यांनी कथितरित्या जातीवाचक अपशब्द वापरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याच्या निषेधार्थ शनिवारी परंडा शहर बंद ठेवण्यात आले.

या बंदला व्यापारी, मुस्लिम समाज आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शहरातील मंडई पेठ, टिपू सुलतान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महाराणा प्रताप चौक, महात्मा फुले चौक यांसह संपूर्ण शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते.

समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देऊन संबंधित कर्मचारी जगदीश सोंडगे यांना तात्काळ निलंबित करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच योग्य कारवाई न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

निवेदनानुसार, २६ एप्रिल रोजी शहरात कचरा घंटागाडी न आल्याबाबत नागरिक व पत्रकार मुजावर यांनी मोबाईलवरून विचारणा केली असता संबंधित कर्मचाऱ्याने अश्लील व जातीवाचक भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या असून शहरातील सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. या प्रकरणी यापूर्वी जिल्हाधिकारी, तहसीलदार, नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही कठोर कारवाई न झाल्याने मुस्लिम समाजात नाराजी पसरली आहे.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित राहून शहर बंद आंदोलनात सहभागी झाले.

## उमरगा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरास' प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ मे -**

शहरातील तहसीलदार कार्यालय परिसरात उमरगा महसूल मंडळाच्या वतीने दि. ८ मे रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अभियानाचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात संजय गांधी योजना लाभ मंजुरी आदेश, शिधापत्रिका, डिजिटल ७/१२ व ८-अ उतारे, विविध दाखले व प्रमाणपत्रे, जन्म नोंद आदेश, रमाई आवास घरकुल योजनेचे धनादेश तसेच आयुष्यमान कार्ड आदी योजनांचा लाभ वितरित करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत नागरिकांनी शासकीय सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, जिल्हा परिषद सदस्य शहाजी पाटील, नगरसेवक विशाल कानेकर, अभिजीत मोरे, शफी चौधरी, सचिन जाधव, रत्नकांत सगर, शरद पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळ अधिकारी सुहास जेवळीकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्राम महसूल अधिकारी शिवराज खुर्दे यांनी मानले.

## ताडगाव येथे घरा समोरून बोकड चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**

कळंब तालुक्यातील ताडगाव येथे घरासमोर बांधलेले बोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.



याबाबत घनश्याम राम हरी जाधवर (वय ३८, रा. ताडगाव ता. कळंब जि. धाराशिव) यांनी शिराढोण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, दि. ८ मे २०२६ रोजी सकाळी ६ ते ६.४५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घरासमोर असलेले अंदाजे २० हजार रुपये किमतीचे बोकड चोरून नेले.

या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.९ मे -**



तहसील कार्यालयामार्फत वितरित करण्यात येणाऱ्या विविध दाखले व प्रमाणपत्रांसाठी नागरिकांची होणारी गर्दी टाळून एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.




क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या आदेशानुसार हे शिबिर प्रांत अधिकारी संतोष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व तहसीलदार जयवंत पाटील यांच्या प्रयत्नातून पार पडले.

उद्घाटनप्रसंगी भाजपचे राज्य परिषद सदस्य बाळासाहेब क्षिरसागर यांनी नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी नगराध्यक्ष संयोगिता गाढवे, नायब तहसीलदार प्रविण जाधव, उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे, नगरसेवक सुरज गाढवे, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना लागणारी विविध प्रमाणपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी तालुक्यात चार ठिकाणी शिबिरे घेण्यात आली.

शिबिरात सातबारा, वारस नोंदी, तुकडेबंदी, ई-मोजणी, आयुष्मान भारत योजना, शिधापत्रिका, आधार नोंदणी, पीएम किसान योजना आदी विविध विभागांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. महसूल विभागासह इतर शासकीय योजनांची माहिती व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## उमरगा बसस्थानकात बॅग कापून २.३५ लाखांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**

बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने व्यापाऱ्याच्या बॅगेतील २ लाख ३५ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महताब उस्मान शेख (वय ३५, रा. सुगाव, ता. चाकूर, जि. लातूर) हे लातूर येथील अशोका इंटरप्रायजेस कंपनीचे उमरगा परिसरातील किराणा दुकानदारांकडून शेंगदाणा विक्रीची सुमारे ३ लाख रुपयांची रक्कम जमा करून बॅगेत ठेवली होती.

दि. ८ मे रोजी उमरगा बसस्थानकातून लातूरला जाणाऱ्या बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांची बॅग कापून त्यातील २ लाख ३५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली.

## अणदूर येथे १३ ते २० मेदरम्यान धार्मिक व सांस्कृतिक महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.९ मे -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे श्री नीलकंठेश्वर संस्थान हिरेमठ सदभक्त मंडळाच्या वतीने १३ ते २० मे दरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री नीलकंठेश्वर संस्थान मठाचे मठाधिपती श्री प्रभूलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या जन्म शतमानोत्सवानिमित्त तसेच वैराग्यमूर्ती श्री श. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पटाभिषेक रौप्य महोत्सव व जन्मदिन सुवर्ण सोहळ्यानिमित्त हा भव्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.



शिक्षण महर्षी कै.सी.ना. आलुरे गुरुजी सभा मंडप, जवाहर महाविद्यालय अणदूर येथे होणाऱ्या या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण राहणार असून मार्गदर्शक म्हणून श्रीम.नी.प्र. गंगाधर महास्वामीजी (जेवळी) उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाची सुरुवात १३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता शिवकथेने होणार आहे. उद्घाटन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते होणार असून आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

१४ मे रोजी शिवकथा, १५ मे रोजी भव्य अड्डु पालखी महोत्सव व शिवकथा, १६ ते १८ मे दरम्यान शिवकथा, तर १९ मे रोजी अड्डु पालखी मिरवणूक व शिवकथा आयोजित करण्यात आली आहे. २० मे रोजी सकाळी हरिद्रा लेपन, अभ्यंगस्नान व विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांच्या सौजन्याने सोलापूर येथील 'देवांश सुरमयी ऑर्केस्ट्रा'चा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

या महोत्सवात विविध मठाधीश, महास्वामीजी, खासदार, आमदार व मान्यवर उपस्थित राहणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लोहारा शहरात महिलांसाठी सुलभ शौचालय उभारण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.९ मे -**

तालुक्याचे ठिकाण असलेल्या लोहारा शहरात दररोज ग्रामीण भागातून महिलांची मोठ्या प्रमाणात वर्दळ होत असते. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर हा शहराचा मुख्य भाग असून येथे बाजारपेठ व दळणवळणाची साधने उपलब्ध आहेत. मात्र, या परिसरात महिलांसाठी एकही सुसज्ज सुलभ शौचालय नसल्याने महिलांची मोठी गैरसोय होत असल्याची बाब समोर आली आहे.




या संदर्भात नगरसेवक तथा सार्वजनिक बांधकाम सभापती विजयकुमार ढगे यांनी जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांना निवेदन देऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील जिल्हा परिषदेची मोकळी जागा सुलभ शौचालय उभारणीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नगरपंचायत कार्यालयाकडे शौचालय उभारणीसाठी निधी उपलब्ध असला तरी जागेअभावी हे काम रखडले आहे. जिल्हा परिषदेकडील मोकळी जागा सामाजिक हितासाठी उपलब्ध करून दिल्यास महिलांची अनेक वर्षांपासूनची गैरसोय दूर होण्यास मदत होईल. महिलांच्या आरोग्य, सुरक्षा व सन्मानाच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असल्याने संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

## परंड्यात अवैध मद्यसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**

अवैध विक्रीसाठी ठेवलेला देशी-विदेशी मद्यसाठा जप्त केला असून एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.८ मे रोजी बाणगंगा साखर कारखान्याच्या वजनकाटा समोर बाबासाहेब जर्नाधन खोगरे (वय ६०) यांच्याकडून अंदाजे ८१० रुपये किमतीच्या देशी-विदेशी दारूच्या १८ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. संबंधित व्यक्ती हा मद्यसाठा अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगत असल्याचे पोलिसांना आढळून आले.

## येडेश्वरी मंदिर परिसरातून महिलेचे सोन्याचे गंठण चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**

येडेश्वरी देवी मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे.



याबाबत सुरेखा प्रशांत जाधव (वय ४८, रा. बुधवार पेठ, रमाबाई आंबेडकर नगर, अम्रपाली चौक, सोलापूर) यांनी येरमाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, दि. ८ मे २०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास त्या येडेश्वरी देवी मंदिर, येरमाळा येथील कल्लोळ परिसरात दर्शनासाठी आल्या असता अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे अंदाजे १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण चोरून नेले.

या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## मात्रेवाडी गाव पुन्हा बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच जोडण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.९ मे -**

भूम तालुक्यातील मात्रेवाडी गाव पूर्वी बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेला संलग्न होते. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांची सहमती न घेता हे गाव आयसीआयसीआय भूम शाखेला जोडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या निर्णयामुळे शेतकरी व नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने गाव पुन्हा बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच जोडण्यात यावे, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या ठरावाद्वारे करण्यात आली आहे.

ठरावात नमूद करण्यात आले आहे की, गावातील अनेक शेतकऱ्यांची पीक कर्जे बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेत सुरू आहेत. तसेच गावापासून ईट येथील शाखेचे अंतर अवघे ८ किलोमीटर असून भूम येथील आयसीआयसीआय बँकेचे अंतर सुमारे १५ किलोमीटर आहे. त्यामुळे व्यवहारासाठी नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे. मात्रेवाडी गावाची प्रमुख बाजारपेठ ईट येथे असून गावातील नागरिकांचे दैनंदिन दळणवळणही ईटशीच आहे. गावातील बहुतांश नागरिकांची बँक खाती बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेत आहेत.

भूम येथील आयसीआयसीआय बँकेत अत्यल्प नागरिकांची खाती असून शेतकऱ्यांची खाती जवळपास नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## उमरगा येथे राष्ट्रीय लोकअदालतीत १.३९ कोटी रुपयांच्या तडजोडी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ मे -**

उमरगा न्यायालय व विधीज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि.९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून विविध प्रकारच्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर तडजोडी करण्यात आल्या.



लोकअदालतीसाठी चार पॅनेलची स्थापना करण्यात आली होती. भूसंपादन, राष्ट्रीय महामार्ग, एन.आय. ॲक्ट १३८, मोटार अपघात, दिवाणी, फौजदारी, गुन्हा कबुली व कौटुंबिक हिंसाचाराची अशी एकूण १२७८ प्रकरणे ठेवण्यात आली होती.

त्यापैकी १०५ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

निकाली निघालेल्या प्रकरणांमध्ये मोटार अपघाताच्या ५ प्रकरणांत ३७ लाख २५ हजार रुपये, एन.आय. ॲक्ट १३८ अंतर्गत १४ प्रकरणांत ६१ लाख ३० हजार ८७ रुपये, तसेच अन्य प्रकरणांसह एकूण ९८ लाख ८५ हजार १८७ रुपयांच्या तडजोडी करण्यात आल्या.

दावापूर्व प्रकरणांमध्ये विविध बँका, मायक्रो फायनान्स संस्था, नगर परिषद, पंचायत समिती व महावितरणची एकूण २७७६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी अनेक प्रकरणे निकाली निघून ४० लाख २० हजार ९८३ रुपयांची वसुली करण्यात आली.

या राष्ट्रीय लोकअदालतीसाठी एम. आर. देशपांडे, जी.एम. कोल्हापुरे, जी.पी. बनकर तसेच के. एन. निवडंगे यांनी विविध पॅनेलवर काम पाहिले.

लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी विधीज्ञ मंडळाचे सदस्य, पंच सदस्य, न्यायालयीन कर्मचारी तसेच तालुका विधी सेवा समितीच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



# संक्षिप्त...

## शिरूर अनंतपाळ तालुक्याचा निकाल ८६.८० टक्के....

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ दि. ९ मे :** लातूर १० वी बोर्डाचा निकाल दि ८ मे राजी दुपारी लागला असून गत वर्षी च्या तुलनेत दहावी च्या निलाचा टक्का घसरला असून तालुक्यातील दोन शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून . दहावीच्या झालेल्या परिक्षांमुळे यंदाच्या निकालाची विद्यार्थी व पालक उत्सुकतेने वाट पाहत होते. अखेर शुक्रवारी दुपारी एक वाजता दहावीचा निकाल ऑनलाईन जाहिर झाला आहे. यंदा दहावी च्या निकालाचा टक्का घसरला असून शिरूर अनंतपाळ तालुक्याचा एकूण निकाल ८६ . ८० टक्के लागला आहे.

तालुक्यातील २१ माध्यमिक विद्यालयातून दहावी बोर्डाच्या परीक्षेत तालुक्यातुन ८ ४४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते .त्यापैकी ७१७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात अनेक शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून यशाची परंपरा कायम ठेवली आहे.उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पालक व मित्रपरिवारातून कौतुक केले जात आहे.

यात श्री रामराव पाटील विद्यालय दैठणा व पंढरी विद्यालय हिप्पळगाव या दोन विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला असून त्याच्या पाठोपाठ नृसिंह विद्यालय अंकुलगा राणी - ९३.३३ टक्के ,संत भगवान विद्यालय धामणगाव ९१. ८९ टक्के , शहरातील श्री अनंतपाळ नूतन विद्यालय - ९१ . ३९ टक्के , जिल्हा परिषद हायस्कूल येरोळ ९० टक्के ' लागला आहे .मन्मथ स्वामी विद्यालय शिरूर अनंतपाळ ७८. ५७ टक्के , जिल्हा परिषद हायस्कूल साकोळ ८४. ७२ टक्के , श्री लिंबाजी विद्यालय उजेड ८७. २७ टक्के , लोक जागृती विद्यालय रापका ८६. २७ टक्के , श्री प्रेमनाथ विद्यालय थेरगाव ८३.३३ टक्के , संस्कार वर्धिनी पार्वतीबाई वंगे विद्यालय आनंदवाडी ८५.७१ टक्के , प्रियदर्शनी कन्या विद्यालय साकोळ ८२.७५ टक्के ,श्रीराम विद्यालय तळेगाव (बोरी ) ७८.२६ टक्के ,जिजामाता कन्या विद्यालय येरोळ ८०.९५ टक्के , श्री रघुवीर विद्यालय चामरगा ८६.४८ टक्के , जय भवानी विद्यालय हालकी ८९.१३ टक्के ,साने गुरुजी माध्यमिक विद्यालय कांबळगा ८४.३७ टक्के , श्री साईनाथ विद्यालय बाकली ८६.३६ टक्के , राजीव गांधी विद्यालय सय्यद अंकुलगा ६५ टक्के वीर सावरकर आदिवासी आश्रम शाळा ५७. १४ टक्के असा निकाल लागला आहे .

या निकालातून अनेक विद्यार्थ्यांनी बाजी मारत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत शाळेसह आई वडिलांचा नावलौकिक केला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणमहर्षी प्रभाकरराव कुलकर्णी,जे. जी.सगरे,,काशीनाथराव देवंगरे,पी.एन.पोसाने, ,महावरकर सर, प्रकाश जाधव,बी.जी. शेलार, शिवाजीराव मादलापुरे,तानाजी मुडे,प्रदिप जाधव, यांसह शिक्षण प्रेमींनी अभिनंदन केले आहे.

## जय भारत विद्यालयाचा १० वी बोर्ड परीक्षेचा निकाल ९६.४६%.



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. ९ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, निलंगा तालुक्यातील जय भारत विद्यालय, दापका या शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.४६ टक्के लागला असून, विद्यालयातून प्रथम कु. ज्योती सुनील खरजुले (९७.२०%), द्वितीय कु. प्रांजल परमेश्र्वर कटाळे (९६.८०%), तृतीय कु. सुमेधा दयानंद कांबळे (९६.००%) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेचा उच्चांक प्रस्थापित केला आहे.

या वर्षी विद्यालयातून एकूण २२६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी २१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ९० % पेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विध्यार्थांची संख्या ३० असून, ९८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. तसेच ७६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## गोविंदराव पाटील विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेत ९३ % निकाल

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. ९ मे :** तालुक्यातील औराद शहाजनी येथील शरदचंद्र पवार प्रतिष्ठान द्वारा संचलित गोविंदराव पाटील विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९३.२% लागला आहे. दहावी मार्च २०२६ च्या बोर्ड परीक्षेत विद्यालयातील
परीक्षेला बसलेल्या ४२ पैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.
त्यातील विशेष प्राविण्यासह ०७ , प्रथम श्रेणीत १९ , द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी व तृतीय श्रेणीत चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. असे एकूण ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील प्राप्ती मोहन पांचाळ ८४.००% गुण घेऊन प्रथम, लक्ष्मी यशवंत शिंदे ८३.४०% गुण घेऊन द्वितीय, तर प्रदुम्न जाधव ७९.२०% गुण घेऊन तृतीय आले आहेत.
सर्व यशस्वी विध्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष पंडितराव धुमाळ , सचिव सौ प्रतिभाताई धुमाळ, कोषाध्यक्ष डॉ आदित्य पंडितराव धुमाळ, सदस्य पांडुरंग पाटील, समन्वयक अतुल शिंदे सर , मुख्याध्यापक हणमंत जाधव, योजना शेळके मॅडम, कार्तिकी स्वामी मॅडम, सिद्धार्थ कांबळे सर , हणमंत भंडारे सर, भीमराव पोस्ते सर सर्वांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिराच्या नुतनीकरणाला सुरुवात....

## निळकंठेश्वर मंदिर श्रद्धा, संस्कृती व अध्यात्मिक परंपरेचे केंद्र : अरविंद पाटील निलंगेकर

**तभा वृत्तसेवा**



**निलंगा दि. ९ मे :** निलंग्याचे ग्रामदैवत व लाखो शिवभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र निळकंठेश्र्वर मंदिराच्या नूतनीकरण व भव्य मंदिर उभारणीच्या कामाला वेग आला असून गुरुवार दि. ८ मे रोजी मंदिराच्या प्रत्यक्ष थर लावण्याच्या कार्याचा शुभारंभ भाजप युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले.
यावेळी नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे, तालुका अध्यक्ष कुमोद लोभे, शहराध्यक्ष रवी फुलारी, नगर परिषदेतील भाजपचे गटनेते जेष्ठ नगरसेवक ड विरभद्र स्वामी, मंदिराचे ट्रस्टी अशोक शेटकार, व्यवस्थापक गोपीनाथ सालेवार आदी उपस्थित होते.
भाजपा प्रदेश सचिव तथा युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या हस्ते या पवित्र कार्याचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.
पंढरपूरच्या श्री क्षेत्र विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या धर्तीवर ग्रामदैवत निळकंठेश्र्वर मंदिराचा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या वतीने जीर्णोद्धार करण्यात येत असून या मंदिराच्या बांधकाम स्थळाची अरविंद पाटील निलंगेकर यांनी सविस्तर पाहणी केली. यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते..
यावेळी बोलताना युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर म्हणाले की, श्री निळकंठेश्र्वर मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून, निलंगा शहराच्या श्रद्धा, संस्कृती आणि अध्यात्मिक परंपरेचे केंद्रबिंदू आहे. या मंदिराच्या भव्य उभारणीमुळे भविष्यात निलंगा शहर धार्मिक आणि सांस्कृतिक नकाशावर अधिक ठळकपणे ओळखले जाईल. मंदिराचे सुरू असलेले काम पाहून मनाला मोठा आनंद होत असून, हे कार्य अत्यंत गुणवत्तापूर्ण आणि वेगाने सुरू आहे. निळकंठेश्र्वराच्या कृपेने हे पवित्र कार्य कोणत्याही अडथळ्याशिवाय लवकरच पूर्णत्वास जाईल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.या मंदिरामुळे निलंगा शहराच्या धार्मिक वैभवात भर पडणार असून, भाविकांसाठी हे एक प्रेरणादायी आणि आध्यात्मिक केंद्र ठरणार आहे. सर्व शिवभक्तांच्या सहकार्याने आणि जनतेच्या आशीर्वादाने हे स्वप्नवत कार्य पूर्णत्वास जाईल.
या प्रसंगी लातूरचे नगरसेवक मुकेश , नगरसेवक हरिभाऊ सगरे, ईश्र्वर पाटील, धर्मप्रकाश निंबाळकर, सुधाताई वाघमारे, सचिन गायकवाड, गणेश पेठकर,, दत्ता मोहळकर, सुमित इनानी, तम्मा माडीबोणे, शरद पेठकर, जि. प. सदस्य तानाजी बिरादार व चंद्रकांत होरे, किशोर लंगोटे, पिंटू पाटील, पिंटू पांचाळ, गौरव आर्य, भगवान बाहेती, सुधीर पाटील, रवी कांबळे, राहुल कांबळे आणि रजनीताई सूर्यवंशी यांच्यासह अनेक पदाधिकारी, शिवभक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
मंदिराच्या उभारणीच्या कामामुळे निलंगा शहरात भक्तीचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात हे मंदिर धार्मिक पर्यटनाचे आकर्षण ठरणार असल्याची भावना उपस्थित शिवभक्तांनी व्यक्त केली.

## आलमल्यातील ब्ल्यू बर्डची वाटचाल दुसऱ्या हॅटट्रिककडे

### सलग पाचव्या वर्षी १००% निकाल




तभा वृत्तसेवा

औसा दि. ९ मे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी चा निकाल जाहिर झाला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्र्वेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुल शाळेचा निकाल सलग पाचव्या वर्षी १००% टक्के लागला असून निकालाची परंपरा कायम राखली आहे.

शाळेतील चैतन्य प्रल्हाद लटुरे ९५.६० टक्के गुण घेऊन सर्वप्रथम आला आहे. असिन हबीब देशमुख ९०.२० टक्के गुण घेऊन द्वितीय तर ८९.६० टक्के गुण घेऊन गौरवी शिवानंद मनगुळे तृतीय आली आहे. या शाळेतील १४ विद्यार्थी ८० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत तर २३ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उतीर्ण झालेले आहेत.

या यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक तानाजी जाधव व सौरभ वडे, मंजूरपाशा शेख, सोहेल शेख, यास्मीन फाजल, फिरदोस सय्यद, हबीब सय्यद, विशाल चव्हाण, नितू भंडारी, ममता बोकडे, परमेश्र्वर चिलखे, विनोद पांडुळे, रश्मी दुधनकर, सुप्रिया जाधव, पायल सुर्यवंशी, गीता चौहान, श्रीदेवी कवठे इत्यादी शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन केलेल्या वर्गशिक्षक व सहशिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरणजी धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्या स्वाती कापसे, विश्र्वेश्र्वरय्या इन्स्टीटयुट ऑफ इंजिनिअरींग अड टेक्नॉलॉजी चे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्र्वेश्र्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी.फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विश्र्वेश्र्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर व सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्रात आढावा बैठक




**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. ९ मे :** तालुक्यातील अंधोरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे ७ मे रोजी जिल्हा परिषद सदस्या तथा जन आरोग्य समितीच्या अध्यक्षा शितलताई खोमणे आणि जिल्हा परिषद सदस्य तथा जन आरोग्य समितीचे सहअध्यक्ष गुंडरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय आरोग्यसदस्यांनी कार्यक्रमांच्या संदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीस प्रदीप खोमणे व इतर मान्यवर सदस्य तसेच अहमदपूरचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जाधव गणेश बापूराव यांची विशेष उपस्थिती होती. बैठकीदरम्यान मान्यवरांनी सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन आरोग्य केंद्र परिसराच्या स्वच्छतेची प्रत्यक्ष पाहणी केली व कर्मचाऱ्यांना कामाबाबत योग्य मार्गदर्शन केले. आरोग्य केंद्राच्या कामकाजात सुधारणा करण्याच्या दृष्टीने जन आरोग्य समितीची पुढील बैठक आगामी १० दिवसांच्या आत आयोजित करण्याबाबत यावेळी सूचित करण्यात आले. या बैठकीसाठी आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या या सविस्तर मार्गदर्शनामुळे आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.

## श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९५:४० टक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** जिल्हयातील औसा येथील श्री मुक्तेश्वर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५:४० टक्के लागला असून यात विशेष प्राविण्य१२८, प्रथम श्रेणीत८६, द्वितीय श्रेणीत४४ उत्तीर्ण श्रेणीत१२ असे एकूण२७० विद्यार्थी पास झाले आहेत.

१८ विद्यार्थी ९५ टक्के, ३९ विद्यार्थी ९० टक्क्यापेक्षा जास्त या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक जलसकरे,माशाळकर ,वर्मा एन जी माळी, काका कांबळे, बानकर मॅडम, चिंचनसुरे मॅडम ,यलपडवार मॅडम,सचिन मिटकरी, दिपक क्षीरसागर, दिपक साकुळे, हरीश के.टी कांबळे,,संस्थेचे अध्यक्ष शिवलिंगप्पा औटी, सचिव राचट्टे, विजयकुमार मिटकरी, रविशंकर राचट्टे नागेश इळेकर, श्रीशैल्य रेवशेट्टे यांच्यासह शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# निलंग्यातील समाधान शिबिरात तक्रारीचे तातडीने निराकरण



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. ९ मे :** छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत निलंगा शहरात आयोजित करण्यात आलेले समाधान शिबीरत आलेल्या तक्रारींचे प्रशासनाकडून तातडीने निराकरण करण्यात आले. या समाधान शिबिरात १८६ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवित प्रशासनाने गावपातळीवरच नागरिकांच्या विविध अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केल्याने नागरिकांत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

निलंगा येथे शुक्रवार दि.८ मे रोजी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सांस्कृतिक सभागृह (टाऊन हॉल) येथे तहसील कार्यालयाच्या वतीने समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलंगा नगर परिषदेच्या स्वच्छता सभापती सुधाताई वाघमारे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, अप्पर तहसीलदार शिवाजी कदम, नायब तहसीलदार प्रवीण आळंदकर, कुलदीप देशमुख, यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, नगरसेवक व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या समाधान शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे १५ पेक्षा अधिक स्टॉल उभारण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, सातबारा उतारा, आठ अ उतारा, रेशन कार्ड दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे व वगळणे, मतदार यादीतील दुरुस्ती, आधार कार्ड दुरुस्ती, आरोग्य सेवा, पंचायत समितीमार्फत देण्यात येणाऱ्या योजना, श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शेतरस्ते व पानंद रस्ते खुलीकरण आदी सेवा थेट उपलब्ध करून देण्यात आल्या..

शिबिरामध्ये १३ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली. सातबारा दुरुस्ती संदर्भातील एक अर्ज स्वीकारण्यात आला असून ६६ सातबारा उतारे व ६६ आठ अ उताऱ्यांचे वाटप करण्यात आले. याशिवाय ५४ विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत दोन अर्ज निकाली काढण्यात आले. भूसंपादनाशी संबंधित कमी-जास्त पत्रकांच्या चार प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली, तर आकृती संदर्भातील तीन प्रकरणे अंमलात आणण्यात आली. 'जिवंत सातबारा' मोहिमेअंतर्गत नागरिकांना अद्ययावत अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले. भोगवटदार वर्ग दोन जमिनी वर्ग एक करण्यासंदर्भातील दोन प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली. तसेच पानंद रस्त्यासाठी प्रशासकीय मान्यतेचा एक आदेशही निर्गमित करण्यात आला.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे शालांत परीक्षेत अभूतपूर्व यश

## तब्बल दहा विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण मिळवून घडवला गुणवत्तेचा नवा इतिहास

**तभा वृत्तसेवा**



**उदगीर दि. ९ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून उदगीर येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाने यंदाही आपल्या उज्ज्वल परंपरेला साजेसा दैदिप्यमान निकाल नोंदविला आहे. विद्यालयाचा एकूण निकाल तब्बल ९८.३१ टक्के लागला असून विद्यार्थ्यांच्या यशाने संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.
विशेष म्हणजे विद्यालयातील दहा विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण प्राप्त करून विद्यालयाच्या गुणवत्तेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांच्या बळावर विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे.
शंभर टक्के गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये - पियुष लाडवते, सुरभी नाईक, शिवम बेद्रे, श्रेयस आमगे, श्र्वेता बिरादार, अंकिता शिंगाडे, मृदुला शास्त्री, ऐश्र्वर्या चिद्रे, साक्षी जानतीने आणि निखिलेश पाटील - यांचा समावेश असून या विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या लौकिकात भर घातली आहे.
तसेच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या तब्बल ८४ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेची परंपरा कायम राखत विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे.
या यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य अविनाश तळणीकर, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासूणे, शालेय समिती अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, दहावी विभाग प्रमुख संतोष गजलवार, सहप्रमुख दिलीप पाटील, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे, सहप्रमुख निलेश मांडवकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.
विद्यालयाच्या या उज्ज्वल यशामुळे गुणवत्ता, संस्कार आणि सातत्यपूर्ण प्रयत्न या त्रिसूत्रीची पुन्हा एकदा प्रचिती आली असून लाल बहादूर शास्त्री विद्यालयाने शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

# म. फुले विद्यालय शालांत प्रमाणपत्र परीक्षा गौरवास्पद यश

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. ९ मे :** महात्मा फुले विद्यालय अहमदपूर ने शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाचा निकाल ९८% लागला आहे. शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी एकूण ४०३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी १६५ विद्यार्थी विशेष प्राविण्यास, १३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ९३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर १४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत अशी एकूण ३९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या निकालाची विशेष बाब म्हणजे विद्यालयातील ०२ विद्यार्थी हे १००% गुण घेऊन विद्यालयाचे नाव उज्वल केले आहेत. ९५ टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे २० विद्यार्थी तर ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे एकूण ५४ विद्यार्थी आहेत.
आवले स्वप्निल मालिका व डांगे विनीत विष्णुपंत हे दोन विद्यार्थी १०० टक्के गुण घेऊन विद्यालयात सर्वप्रथम आले आहेत.
तिडोळे सौरभ वसंतराव ९८.४०% गुण घेऊन सर्व द्वितीय आला आहे तर फड भक्ती नवनाथ व रेडेवाड शुभांगी राजकुमार यांनी ९८.२०% गुण घेऊन सर्व तृतीय आले आहेत.
विद्यालयातील ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थी खालील प्रमाणे...
आवले स्वप्निल मालिका - १००%,डांगे विनीत विष्णुपंत १००%, तिडोळे सौरव वसंतराव ९८.४०, फड भक्ती नवनाथ ९८.२०, रेडेवाड शुभांगी राजकुमार ९८.२०% ,चोंडे किशन मारुती ९८%, तळेकर यश प्रदीप ९८%, तिडके पृथ्वीराज परमेश्र्वर ९८% ,मातकर सिद्धी सुरेश ९७.८०% ,कदम श्रवण शिवाजी ९७.६० %,केंद्र अजित बळीराम ९७.४०, पाटील तेजस्वी लक्ष्मीकांत ९७.४०,खसे आदित्य अनिल ९७. २०.%, पवार राज उद्धवराव ९७. २०.%, मुंडे राधिका विष्णू ९७.%, पाटील वीरसिंह लक्ष्मीकांत ९६. ८०%, गुट्टे बालाजी अशोक ९६.६०%, राठोड अंजली गजाधर ९६.४०%, देवकते अभिषेक सतीस ९५.४०%, केंद्रे स्वराली दिनकर-९४.८० %, सोळुंके दिग्विजय भगवानराव ९४.८०%, जाधव मानसी पांडुरंग ९४. ८०%, मुंडे मनीषा दत्तात्रेय ९४.६०%,जायभाये अंजली पुंडलिक ९४. ६०%, सांगोळे ऋतुराज पांडुरंग ९४.६०%, नाइकवाडे दिव्या दीपक ९४.४०%, फुलमंटे सार्थक विष्णुकांत ९३.८०%, केसगिरे प्रतीक्षा रोहिदास ९३. ६०%, पवार शरद संजय ९३. ४०%, बयास केशव गणेश ९३.२०%, राठोड सेजल कैलास ९३.२०% लोभे श्रावणी प्रदीप ९३ %, पिलगुंडे गणेश माधवराव ९२.६०%, सावरगावे स्वराज परमेश्र्वर ९२. ६०%, परांडे यशस्वी तुकाराम ९२.२० %, सुरनर मानसी बिजू ९२ %, वानखेडे युवराज पुंडलिक ९१.८०%, सोळुंके वेदिका विशाल ९१.६०%, ढोबळे श्रावणी सतीश ९१.६०%, कल्याणकर दिनेश गंगाधर ९१.६०%, श्रीरामे सागर बाबू ९१.४०% , हाके हरीओम नरसिंग ९१. २०%, देवकते विश्र्वास गजानन ९१.२०%, केंद्र दिपाली दिनकर ९०.८०%, हंगरगे श्रद्धा कैलास ९०.८०%, चव्हाण मयुरी संतोष -९०.८०%,सोनटक्के शिवलिंग विश्र्वनाथ-९०.४०%, कासले प्रणाली व्यंकट - ९०.%, ढाकणे कृष्णा दामोदर -९०%, चव्हाण पृथ्वीराज सचिन -९०%, सोळुंके अथर्व रमेश -९०%, नामपल्ले अथर्व पवन -९०%, शिंदे छगन पांडुरंग ९०%.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, सचिव पी. टी. शिंदे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील, कोषाध्यक्ष श्री गुंडेराव पाटील व सर्व किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री एस आर जाधव, उप मुख्याध्यापक श्री बिरादार बी व्ही, पर्यवेक्षक श्री यादव टी बी, परीक्षा विभाग प्रमुख श्री माने पी एस सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ट्रॅक्टरवरून पडून युवकाचा मृत्यू; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**
बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रॅक्टरवरून पडून एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश लहुजी गुंड (रा. कनगरा, ता. धाराशिव) हे ट्रॅक्टर क्र. एमएच २५ बीए २७५९ व ट्रॉलीमधून कडबा भरून महादेववाडी शिवारातून जात होते. त्यावेळी त्यांच्यासोबत चिम्या (वय २५) व फिर्यादी पदमाकर व्यंकट सुरवसे हे होते.

आरोपी उमेश गुंड यांनी ट्रॅक्टर हायगईने व निष्काळजीपणे चालवल्याने चिम्या हे ट्रॅक्टरवरून खाली पडून गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी पदमाकर सुरवसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



## तुळजाभवानी मंदिरात भाविकांची गर्दी; जयघोषाने दुमदुमले तुळजापूर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**
उन्हाळी सुट्ट्या, लग्नसराईचा हंगाम तसेच शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांमुळे श्री तुळजाभवानी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. राज्यासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातून हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरात दाखल झाले असून मंदिर परिसर जय भवानी, जय शिवाजी च्या जयघोषाने दुमदुमून गेला आहे.

शुक्रवारी पहाटेपासूनच दर्शनासाठी मोठ्या रांगा लागण्यास सुरुवात झाली होती. सकाळी नऊ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत भाविकांचा ओघ कायम होता. मंदिरातील सर्व दर्शन रांगा भाविकांनी खचाखच भरून गेल्या होत्या. अनेक भक्तांनी कुटुंबासह देवीचे दर्शन घेत नवस फेडले. उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबांनी धार्मिक पर्यटनासाठी तुळजापूरला पसंती दिली आहे. तसेच लग्नसराईमुळे नवविवाहित जोडपी व विवाहासाठी आलेले पाहुणेही दर्शनासाठी मोठ्या संख्येने येत असल्याने शहरातील रस्ते, बाजारपेठा आणि वाहनतळ दिवसभर गजबजून गेले होते.

भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी मंदिर प्रशासनाने विशेष उपाययोजना केल्या आहेत. म हाद्वार मार्गावर मोठ्या प्रमाणात सावलीसाठी शेड उभारण्यात आले असून ठिकठिकाणी पाण्याचे फवारे मारून वातावरण थंड ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.



शनिवार व रविवारच्या पार्श्वभूम ीवर पुढील दोन दिवसांत गर्दीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासन, पोलीस व स्वयंसेवकांकडून सुरक्षा, पिण्याचे पाणी व दर्शन रांगांचे नियोजन करण्यात आले आहे.

मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून तुळजापूर नगरी देवीभक्तांनी फुलून गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### डॉ. आंबेडकर इंग्लिश मेडीयम स्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**नळदुर्ग, दि.९ मे -**
नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कुलने सलग सहाव्या वर्षी दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.



यावर्षी शाळेतील सर्व २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थिनी राधा संतोष घोडके हिने ९७.४० टक्के गुण मिळवत नळदुर्ग केंद्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. विशेष म्हणजे उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थ्यांनी ९१ ते ९७ टक्क्यांदरम्यान गुण मिळविले असून त्यामध्ये ६ विद्यार्थिनींचा समावेश आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आईच्या मार्गदर्शनाखाली जिद्द आणि चिकाटीच्या बळावर राधा घोडके हिने हे यश संपादन केल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. शाळेचे अध्यक्ष नगरसेवक मारुती खारवे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचा गुणवत्तेचा आलेख सातत्याने उंचावत असून मुख्याध्यापिका व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



### महाराष्ट्र विद्यालयाचा दहावीचा निकाल ९२.५९ टक्के

**धाराशिव, दि.९ मे -**
मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत महाराष्ट्र विद्यालयाने ९२.५९ टक्के निकालाची नोंद करत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयातील सर्व विद्यार्थी अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. पृथ्वीराज श्रीकांत शिंदे यांनी ८७.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सागर शाहुराज माने यांनी ८७.२० टक्के गुणांसह द्वितीय, तर रेणुका किशोर माडजे यांनी ८६ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच प्राची अनंत माझे (८३.८०), सौदागर बालाजी ढेरे (८१), वैष्णवी ज्ञानेश्वर नावडे (८०.८०) व आर्य लक्ष्मण लोहार (८०) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदन होत असून शिक्षकांच्या मार्गदर्शनाचेही कौतुक केले जात आहे.

### आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ८६.७४ टक्के

**धाराशिव, दि.९ मे -**
शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ८६.७४ टक्के लागला असून ८३ विद्यार्थ्यांपैकी ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये २० विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता श्रेणी, १८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर २३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी प्राप्त केली आहे. विद्यालयातील रीजा अख्तर मुल्ला हिने ९६.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. ज्ञानेश्वर दत्तू सगर यांनी ९५.४० टक्के, मुग्धा सुधीर रामदासी हिने ९३.२० टक्के, अथर्व निशिकांत वाघोलीकर यांनी ९२.६० टक्के तर रुद्र आनंद गलांडे यांनी ९१.६० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. विषयवार गुणवत्तेमध्ये मराठी व हिंदी विषयात इखरा शेख हिला ९५ गुण मिळाले. संस्कृत विषयात ज्ञानेश्वर सगर, रीजा मुल्ला व अथर्व वाघोलीकर यांनी प्रत्येकी ९८ गुण मिळविले. इंग्रजी विषयात रीजा मुल्ला हिला ९५, गणितात अथर्व वाघोलीकर यांना ९७, विज्ञान विषयात रीजा मुल्ला हिला ९७ तर इतिहास-भूगोल विषयात ज्ञानेश्वर सगर यांना ९८ गुण प्राप्त झाले.

### पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, ईटचा दहावी निकाल ९७.१८ टक्के

**भूम, दि.९ मे -**
पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, ईट ता. भूम जि. धाराशिव या शाळेने यंदाच्या दहावी बोर्ड परीक्षेत ९७.१८ टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेतील १४३ विद्यार्थ्यांपैकी १३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. समृद्धी समाधान डोके हिने ९१.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. अंतरा लक्ष्मीकांत वालेकर हिने ८९.६० टक्के गुणांसह द्वितीय तर संस्कृती दत्तात्रय वेदपाठक हिने ८९ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. निकालात ६९ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य, ४० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, २३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ६ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणी मिळवली. या यशासाठी मुख्याध्यापक जयराम कचरे यांच्यासह दत्ता भालेराव, पांडुरंग कवडे, अश्विनी चेडे, लक्ष्मीकांत चव्हाण, मुकुंद हाडुळे, सहदेव हुंबे, सपकाळ, भालेराव, मोरे, पवार आदि शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

### वाहनधारकांकडून ३.३३ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.९ मे -**
धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने ८ मे रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध एकूण ३४८ कारवाया करण्यात आल्या. या कारवायांमधून ३ लाख ३३ हजार ५५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयाचा निकाल ९६.८१ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ मे -**
श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा येथील सन २०२६ च्या एसएससी परीक्षेचा निकाल ९६.८१ टक्के लागला असून विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

यंदा ३१४ विद्यार्थ्यांपैकी ३०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे ५१ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक, तर १७ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच सेमी इंग्रजी माध्यम शाखेचा निकाल शंभर टक्के लागला.

संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन दांडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन व मुख्याध्यापक नेताजी गायकवाड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## कौडगावच्या पाडुळे बंधूंचे पोलीस दलात यश; भाजपा कार्यालयात सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ मे -**
कौडगाव ता. परंडा येथील शेतकरी कुटुंबातील दोन सख्ख्या भावांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पोलीस दलात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महारुद्र दत्तात्रय पाडुळे आणि रत्नाकर महारुद्र पाडुळे या दोघा भावांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड मिळवली आहे.

ऊसतोड व वाहतुकीचे काम करत शिक्षण पूर्ण केलेल्या या पाडुळे बंधूंनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. तसेच श्री. कृष्णा भरत ठवरे यांचीही रत्नागिरी येथे पोलीस शिपाई म्हणून निवड झाली आहे. या यशाबद्दल भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी भाजपा संपर्क कार्यालय, परंडा येथे पाडुळे बंधू व ठवरे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, परंडा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, कौडगावचे सरपंच तथा भाजपा ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष तुकाराम हजारे, भाजपा नेते जयदेव बप्पा गोफणे, श्रीमंत शेळके, हभप. बालाजी महाराज बोराडे, साहेबराव पाडुळे, श्रीकृष्ण शिंदे, पांडुरंग मुसळे, आप्पासाहेब मदने, संतोष भिसे, सागर ठवरे, प्रदीप पाडुळे, शिवाजी देवकर, अनिकेत कुलकर्णी, अमोल तरटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोकमंगल फाउंडेशनचा आज सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मे -**
सामाजिक बांधिलकी जपत विवाह संस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने ४८ व्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे यंदाचे २१ वे वर्ष असून हा सोहळा रविवार, दि.१० मे रोजी दुपारी १२.२३ वाजता छाया दीप मंगल कार्यालय येथे संपन्न होणार आहे.

या विवाह सोहळ्यात विविध धर्म व समाजातील नवदाम्पत्यांचा सहभाग होणार असून कार्यक्रमास सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रोहन देशमुख यांच्यासह संस्थेचे संचालक मंडळही उपस्थित राहणार आहे. सहभागी नवदाम्पत्यांसाठी सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या २० वर्षांपासून लोकमंगल फाउंडेशन समाजातील सर्व स्तरातील कुटुंबांसाठी हा उपक्रम राबवत असून अनेक नवदाम्पत्यांचे संसार या माध्यम ातून सुरू झाले आहेत. लेका एवढी लेकची भारी, हाच संदेश घरोघरी; आठवा फेरा घेऊ या, स्त्री जन्माचे स्वागत करू या, असा सामाजिक संदेशही या सोहळ्यातून दिला जाणार आहे. नागरिकांनी उपस्थित राहून नवदाम्पत्यांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## लोकसेवा हायस्कूलची गौरी रोटे ईट केंद्रात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.९ मे -**
लोकसेवा हायस्कूल, गिरवली येथील विद्यार्थिनी गौरी गणेश रोटे हिने दहावी परीक्षेत ९२.८० टक्के गुण मिळवत ईट केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान पटकावला आहे.



डोकेवाडीसारख्या ग्रामीण भागातील गौरीने दररोज दोन किलोमीटर पायी प्रवास करून नियमित शिक्षण घेत जिद्द व चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. कोणतेही मोठे क्लासेस न लावता तिने स्वतःची गुणवत्ता सिद्ध केली आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले असून पुढील शिक्षण गिरवली येथील हायस्कूलमध्ये सुरू होते.

गौरीचे वडील गणेश रोटे हे ईट येथे टेलर व्यवसाय करतात. व्यवसाय सांभाळत त्यांनी मुलीच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देत नियमित अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून मार्गदर्शन केले.

याच शाळेतील प्रतीक्षा अनिल डोके हिने ९०.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर सोंत्रे पृथ्वीराज पोपट यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व्यंकटअण्णा मोटे, मुख्याध्यापक हरिदास डोके, दस्तगिर पठाण तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## श्री श्री गुरुकुल अणदूरचा सलग आठव्या वर्षी १०० टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.९ मे -**
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता दहावी राज्य मंडळ परीक्षेत श्री श्री गुरुकुल, अणदूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत सलग आठव्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत श्रावणी संजय हंगरगे हिने ९७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रसाद अरविंद लकडे याने ९४.६० टक्के गुणांसह द्वितीय, तर साची हेमंत हांडगे हिने ९४ टक्के गुण मिळवत



तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यंदा ३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले, तर १० विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्क्यांच्या दरम्यान गुण प्राप्त केले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, सचिव डॉ. नागनाथ कुंभार, संचालिका डॉ. रुपाली कानडे, प्राचार्य लक्ष्मण नरे तसेच मुख्याध्यापक शिवराज भुजबळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वर बंडगर, रामेश्वर सावंत, पुष्पा लामतुरे, भाग्यश्री गोरे व विशाल महाबोले या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## खामसवाडीतील दहावीच्या निकालात मुलींचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.९ मे -**
कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद शाळा व जगदंबा म ाध्यमिक शाळेच्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात मुलींनीच प्रथम येण्याचा मान पटकावला आहे.

जिल्हा परिषद प्रशालेतील ७५ विद्यार्थ्यांपैकी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ३४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. या शाळेत सृष्टी विष्णू वनवे हिने ९६.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सानिका बापू कदम हिने ९३.२० टक्के गुणांसह द्वितीय, तर राहुल शिवाजी बंडगर याने ९१.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

जगदंबा माध्यमिक शाळेतील २० विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. रेवती बालाजी माने हिने ९०.४० टक्के, वैष्णवी निशिकांत महाजन हिने ८८.२० टक्के, तर अर्चना अर्जुन मगर हिने ८७ टक्के गुण मिळवत विशेष प्राविण्य संपादन केले.

दोन्ही शाळांतील विद्यार्थिनींच्या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक, शालेय समिती, पालक व गावकऱ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उमरग्यात मटका जुगारावर पोलिसांचा छापा

**धाराशिव, दि.९ मे -** जुगार विरोधी मोहिमेदरम्यान उमरगा पोलिसांनी अण्णाभाऊ साठे चौक परिसरात छापा टाकून मटका जुगार प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दि.८ मे रोजी उमरगा पोलिसांनी अण्णाभाऊ साठे चौकातील एका टपरीवर कारवाई केली. यावेळी फारुक महेबुब सय्यद (वय ५१, रा. हुसेनबशा गल्ली, उमरगा) हा कल्याण मटका जुगाराचे साहित्य व ८५० रुपयांची रोकड स्वतःच्या ताब्यात बाळगताना आढळून आला.

## जवाहर विद्यालय, अणदूरचा दहावीचा निकाल ९२.७६ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.९ मे -**
तुळजापूर तालुक्यातील जवाहर विद्यालय, अणदूर येथील इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. यंदा मुलींनी विशेष चमकदार कामगिरी करत बाजी मारली.

भक्ती रामेश्वर कबाडे आणि संस्कृती खंडू घोडके या दोघींनी १०० टक्के गुण मिळवत संयुक्त प्रथम क्रमांक पटकावला. प्रतिक्षा दत्तात्रय धरणे हिने ९८.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर कुमारी शुभांगी शिवानंद लंगडे हिने ९६.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

विद्यालयातील एकूण ३८७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ३५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी



९२.७६ इतकी लागली आहे. यामध्ये १२० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, १०२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ११३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर २४ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणी मिळवली.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव तथा अणदूर विद्यानगरीचे सरपंच रामचंद्र आलुरे, संस्थेचे मार्गदर्शक ॲड. लक्ष्मीकांत पाटील, ॲड. नागनाथ कानडे तसेच मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## कल्याणसागर माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.३८ टक्के



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ मे -**
परंडा येथील कल्याणसागर समूहाच्या कल्याणसागर माध्यमिक विद्यालयाने यंदाही उज्वल यशाची परंपरा कायम राखत मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेत ९८.३८ टक्के निकालाची नोंद केली आहे.

विशेष प्राविण्यासह ३२.७८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीत ३६.०६ टक्के, द्वितीय श्रेणीत २४.५९ टक्के तर पास श्रेणीत ६.५५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष यश संपादन केले आहे.

प्रांजली सचिन हगवणे हिने ९८.८० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम व तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला.

अर्णव अमोल पाटील याने ९७.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर मधुरा धनाजी मुळीक हिने ९७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये फिजा अरिफ बागवान (९३.६०), समीक्षा अशोक भिसे (९१.६०), रोहिणी पांडुरंग मुळीक (८९.६०), रोहित प्रदीप गवारे (८९.६०), सानिया असलम नदाफ (८९.२०), श्रद्धा सचिन नरुटे (८६.८०), प्रगती नरहरी गटकूळ (८४.२०), आयुष शिवकांत कोकाटे (८३.८०) व तजीम फारूख मोमीन (८२.६०) यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, सचिव प्रज्ञा कुलकर्णी, मार्गदर्शक विकास कुलकर्णी, मुख्याध्यापक किरण गरड तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ■ रंजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते आफान शेख यांचा सत्कार ■

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** लातूर तालुक्यातील कव्हा गावचा भूमिपुत्र व शहरातील कृपासदन इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी आफान रफियोद्दिन शेख याने इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेमध्ये १०० टक्के गुण घेऊन दैदिप्यमान यश मिळविलेले आहे. त्याबद्दल जेएसपीएम शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक रंजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पालक रफियोद्दिन शेख, महादेव पिटले, सौरभ राठोड आदी उपस्थित होते. यावेळी गुणवत्तेबद्दल बोलताना आफान शेख म्हणाला, माझी मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि वडिलांचे सहकार्य यामुळे हे उल्लेखनिय यश मिळाले असून भविष्यामध्ये गुणवत्तेच्या आधारे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करणार असल्याचा विश्वास त्याने बोलताना व्यक्त केला.

रंजित कव्हेकर यांनी यावेळी आफान चे कौतुक करून भविष्यात ती निश्र्चित आपले स्वप्न पूर्ण करेल,असा विश्र्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी जिद्दीने आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून चालल्यास ते आफानच्या या यशाबद्दल त्याचे शहर व परिसरातून कौतुक होत आहे.



## विविध वृत्त...

### आपण समस्त लातूरकरांच्या वतीने आज लातुरात सार्वजनिक श्रद्धांजली सभा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ मे :** लातूरच्या सार्वजनिक जीवनातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व, 'लातूर पॅटर्न'चे आधारस्तंभ आणि माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन वाहण्यासाठी रविवार, दि. १० मे २०२६ रोजी आपण समस्त लातूरकरांच्या वतीने 'सार्वजनिक श्रद्धांजली सभेचे' आयोजन करण्यात आले आहे

अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी असलेले डॉ. गोपाळराव पाटील यांनी हे लातूरचे पहिले बालरोगतज्ज्ञ म्हणून त्यांनी वैद्यकीय सेवेचा श्रीगणेशा केला. केवळ एक डॉक्टर म्हणूनच नव्हे, तर एक आपुलकीचा माणूस म्हणून त्यांनी हजारो कुटुंबांना आधार दिला. आज संपूर्ण देशात छएएढ आणि गएए परीक्षेत राजर्षी शाहू महाविद्यालयाचे विद्यार्थी जे यश संपादन करत आहेत, त्या यशाचा पाया डॉ. गोपाळराव पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे रचला गेला. त्यांनी सुरू केलेला 'शाहू पॅटर्न' पुढे जगप्रसिद्ध 'लातूर पॅटर्न' म्हणून ओळखला गेला. लातूरला शिक्षणाची पंढरी बनवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

भारतीय जनता पक्षाचा विचार जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवून पक्ष संघटना मजबूत करण्यात त्यांनी आयुष्य वेचले. त्यांच्या या निस्वार्थ कार्याची पावती म्हणून त्यांना 'राज्यसभेचे खासदार' म्हणून कार्य करण्याची संधी लाभली.'लॉयन्स क्लब'च्या माध्यमातून त्यांनी सेवाकार्याचा जो ठसा उमटवला, तो आजही सामाजिक कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहे. अजातशत्रू नेतृत्व आणि नि:स्पृह समाजसेवक अशी त्यांची ओळख कायम राहील. अशा या बहुआयामी नेतृत्वाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी रविवार, दि. १० मे रोजी सकाळी ९ वाजता दयानंद महाविद्यालय सभागृहात सार्वजनिक श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आपण समस्त लातूरकरांच्या वतीने करण्यात आले आहे.

### राजमाता जिजामाता विद्यालयाचा ८५ टक्के निकाल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यात राजमाता जिजामाता विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयाचा निकाल ८५ टक्के लागला आहे.

अक्षरा गुलाबराव राऊत ही विद्यार्थिनी ९५.२० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम, रोहिणी बालाजी कांबळे ९३.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर प्रताप दादाराव किर्जत ८९ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. विद्यालयातील ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. तर गणित विषयात रोहिणी बालाजी कांबळे या विद्यार्थिनीला ९७ गुण प्राप्त झाले आहेत. या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, मुख्याध्यापक संगमेश्वर केंद्रे, संस्था सदस्य उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, करिश्मा केंद्रे, पर्यवेक्षक एस. एम. गुरमे, समन्वयक राजीव मुंढे, पांडुरंग कुलकर्णी, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

### तुळजाभवानी विद्यालयाचा ८० टक्के निकाल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला आहे. यात तुळजाभवानी माध्यमिक विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयाचा निकाल ८० टक्के लागला आहे.

राहिल रियाज बागवान याने ७८.२० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम, आदिती बालाजी राठोड हिने ७२.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर पूनम भरत भंडारवाड हिने ७२ टक्के गुण मिळवून विद्यालयातून तृतीय आली आहे.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, प्राचार्य डी. एन. केंद्रे, सहसचिव मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, व्ही. व्ही. लोहारे, शिवकुमार चिकले आदिंनी कौतुक केले आहे.

### वाले इंग्लिश स्कुलचा एस. एस. सी. परीक्षेत १००% निकाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** नुकत्याच जाहीर झालेल्या इ.१०वी च्या निकालात वाले इंग्लिश स्कुलचे ८६ विद्यार्थी बसले होते व ते सर्व उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. ३१ विद्यार्थ्यांना ९०% च्या पुढे गुण असून देशमुख सिध्दिराज १००% गुण घेऊन प्रथम आला. तर काळे कादंबरी किरण ९९.८०% गुणांसह द्वितीय आणि शेख माझ ९९.६०% गुण घेत तृतीय आला, देशमुख वेदांतिका ९८.६०% गुणांसह चौथी तर निटूरे हिमांशू ९८.००% गुणांसह पाचव्या स्थानी आला. ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह (७५% - ९०%) उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव मकरंद सावे, कोषाध्यक्ष शांतीकुमार कुचेरिया, सदस्य शिवशंकर बिडवे, झकीखान कायमखानी, संदीप सावे, सौ. ममता सावे, प्राचार्य भोगडे सर, उपप्राचार्य बाकलीकर सर, पर्यवेक्षिका सौ. धाराशिवकर मॅडम, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंदाने अभिनंदन केले.

## हाय रे दुर्दैव.. ! अतिक्रमण हटावचा फार्स चालणार तयारी किती काळ.. ?

### लातूर शहरातील गंज गोलाईतील अतिक्रमण कायस्वरूपी हटणार तरी केव्हा ?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ मे :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने जणू ठराविक काही महिन्यांच्या अंतरानंतर शहराचा आत्मा समजल्या जाणाऱ्या गंज गोलाईमधील अतिक्रमण हटविण्याचा फार्स केला जातो. पुढे जसजसे अतिक्रमण काढले जाते, तसतसे ते पुन्हा टप्प्याटप्प्याने बसविले जाते हा आजपर्यंतचा लातूरकरांचा अनुभव आहे. मागच्या चार दिवसापूर्वीही अतिक्रमण हटाव चा फार्स असाच केला गेला. आता पुन्हा एकदा गोलाईला टप्प्याटप्प्याने पूर्ववत अतिक्रमणाचा विळखा पडल्याचे पाहावयास मिळणार आहे. त्यामुळे सुजाण लातूरकरांतून हे अतिक्रमण कायमस्वरूपी कधी हटविण्यात येणार आहे ? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात असल्याचे ऐकायला मिळत आहे. अतिक्रमण नेहमीसाठी हटवायचे असेल तरच मनपा प्रशासनाने यापुढे प्रयत्न करावेत,अशा प्रकारचा फार्स करू नये, अशा भावनाही नागरीकातून व्यक्त होताना दिसत आहेत.



लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी मानसी मीना या आयएएस अधिकारी तर उपायुक्त पदी वसुधा फड कार्यरत आहेत. आयुक्तांची लातुरात नव्याने नियुक्ती झाली असली तरी वसुधा फड यांनी यापूर्वीही लातूर शहर मनपात कर्तव्य बजावले आहे. त्यांना लातूरच्या कार्यपद्धतीचा चांगला अनुभवही आहे. एक कुशल प्रशासकीय महिला अधिकारी असा त्यांचा लौकिकही राहिला आहे. लातूरमध्ये काम केल्यामुळे येथील गोलाईतील अतिक्रमण कायमस्वरूपी काढण्यासाठी प्रत्यक्षात काय केले पाहिजे, याचाही त्यांना अभ्यास आहे. चार दिवसापूर्वी त्यांनी जेव्हा गंज गोलाईतील अतिक्रमण हटविण्याचा विषय हाती घेतला, तेव्हा काही मंडळींनी त्यांचा ' लेडी सिंघम' असाही उल्लेख केल्याचे पाहायला मिळाले. दोन्ही महिला अधिकारी लातुरातील गंज गोलाईतील अतिक्रमण काढण्याचा प्रयत्न करत आहेत, हे पाहून सुरुवातीला प्रत्येकाला आनंदच वाटला. मात्र, जुन्या - जाणत्या अनुभवी मंडळींना हे अतिक्रमण किती दिवसांपेक्षा नव्हे तर किती तासांकरिता काढले जाईल ? या प्रश्र्नाने भंडावून सोडले होते. अखेर अनुभवींचेच बोल खरे ठरल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे.

अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर अवघे काही तासच गंज गोलाईतील रस्त्यांनी मोकळा श्र्वास घेतला असावा. त्यानंतर हळूहळू, जसे काही अतिक्रमण हटवण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाकडून केला गेला, असे दाखवून देण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहीम राबविली गेली.

पुन्हा पहिले पाढे पंचावन्न झाल्याचे पदोपदी निदर्शनास येत आहे. हा प्रकार मागच्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. अतिक्रमणाने लातूरकरांना खूप त्रास होतो . परंतु सामान्य नागरिकांचे भ्रष्ट प्रशासन आणि स्वार्थी राजकीय नेत्यांपुढे काहीच चालत नाही, हे वास्तव आहे. नेत्यांनी आणि मनपा प्रशासनाने प्रामाणिकपणे अतिक्रमण हटविण्याचे ठरविले तर हा केवळ काही तासांचा उपक्रम असणार आहे. परंतु दुर्दैवाने आजपर्यंत तसे झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून तर लातूरचे वैभव समजल्या जाणाऱ्या गंज गोलाईला अजूनही अतिक्रमणाच्या विळख्यात दिवस कंठावे लागत आहेत. गंज गोलाई कायमस्वरूपी अतिक्रमण मुक्त झाल्याचे केव्हा पाहायला मिळेल ? या प्रतिक्षेत लातूरचे नागरिक अनेक वर्षांपासून आहेत.

## चित्रवार्ता



नियमित वर्दळ असलेल्या गांधी चौकात उन्हामुळे तुरळक वाहतूक दिसत आहे.




वेग आवरा आयुष्य सावरा याची जनजागृती करताना छ.शिवाजी महाराज चौकात आरटीओ उभी केलेली मोडकळीस असलेली बाईक



गंज गोलाई मध्ये कायम ऑटो चालकांची मनमानी पाहायला मिळते. स्वतःच्या तंद्रित चालणाऱ्या या मंडळींना आपल्यामुळे इतरांना त्रास

## उदगीर पोलीस प्रशासनाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात २२५ रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ मे :** उदगीर शहर व उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण २२५ रक्तदात्यांची यावेळी ऐच्छिक रक्तदान केले.




लातूर पोलिसांनी सामाजिक बांधिलकी, मानवतेची जाणीव आणि रस्ते सुरक्षा जनजागृती यांचा अनोखा संगम साधणारा भव्य रक्तदान उपक्रम उदगीर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. उदगीर शहर पोलीस स्टेशन व उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या सहकार्याने दि. ८ मे २०२६ रोजी उदगीर शहर पोलीस स्टेशन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आणि एक हेल्मेट एक जीवन या सामाजिक संदेशावर आधारित आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने मोफत हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले. रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षेचा महत्त्वपूर्ण संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, लग्नसराईचा हंगाम आणि विविध सामाजिक कार्यक्रमांची व्यस्तता असताना-ही तब्बल २२५ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाचे उत्तम उदाहरण घालून दिले. सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरात युवक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

लातूर जिल्हा पोलीस दल हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारे यंत्रणाच नसून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्य, सुरक्षितता व जनजागृतीसाठी सातत्याने पुढाकार घेत असल्याचे या उपक्रमातून पुन्हा अधोरेखित झाले. या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उदगीर शहर पोलीस स्टेशन, उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन तसेच सर्व पत्रकार बांधव,स्वयंसेवक, रक्तदाते व सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

### पंडित नेहरू विद्यालयाचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ९ मे :** जवाहरलाल नेहरू विद्यालय ,तोगरी ता. उदगीर जि.लातूर, १० बोर्ड परीक्षेच्या निकालाची उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून शाळेचा एकूण निकाल ९४.८४% निकाल लागला असून त्यात २३ विद्यार्थी विशेष प्रावीण्य सह उत्तीर्ण झाले, ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले व ३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले . तसेच केंद्रातून प्रथम कु कांचन गोकुळ तेलंग ९३%, द्वितीय कु विजयालक्ष्मी रामेश्र्वर पाटील ९२.२०% व तृतीय स्थानावर दोन विद्यार्थिनी कु स्नेहा राजकुमार ८६.८०% व कु वेदिका विश्र्वनाथ निडेबने ८६.८०%गुण घेऊन विशेष मुलींनी बाजी मारली आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ शांतम्मा पंडीतराव पाटील ,सचिव श्रीमती इंदुमती मनोहरराव येरनाळे कार्याध्यक्ष श्री महेश मनोहरराव येरनाळे ,प्राचार्या सौ.वंदना महेश येरनाळे,उपप्राचार्य गुणवंत काळगापुरे, पर्यवेक्षक लक्ष्मण लोभाजी, केंद्र प्रमुख श्री रऊफ सय्यद व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात आले.

## खून प्रकरणात तीन आरोपींना जन्मठेप

### उदगीरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ मे :** लातूर जिल्ह्यातील उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर खून प्रकरणात उदगीरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्या. डी. बी. म्हालटकर यांनी महत्त्वपूर्ण निकाल देत तीन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे येथे सदरील गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील फिर्यादी जनाबाई बाळासाहेब बिरादार, रा. दैठणा ह.मु. हेर ता. उदगीर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तपासाची दिशा निश्र्चित करण्यात आली होती. पोलिसांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात व सूचनेनुसार अतिशय बारकाईने गुन्ह्याच्या तपास करून साक्षीदारांचे जबाब,आरोपीविरुद्ध भरपूर परिस्थितीजन्य व भौतिक पुरावे गोळा करून आरोपी बालाजी माधव जगताप वय ६० वर्षे, लहु बालाजी जगताप वय २५ वर्षे व अंकुश बालाजी जगताप वय २२ वर्षे, सर्व रा. हेर ता. उदगीर. यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

खटल्याच्या सुनावणीअंती न्यायालयाने तिन्ही आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक दिपकुमार वाघमारे यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात अत्यंत बारकाईने व शास्त्रोक्त पद्धतीने केला. न्यायालयीन कामकाजात पैरवी अंमलदार पोलीस अमलदार ए. एस. शेख यांनी प्रभावी समन्वय साधला.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता एस. एम. गिरवलकर यांनी सक्षम युक्तिवाद करून आरोपींविरुद्धचे ठोस पुरावे प्रभावीपणे न्यायालयासमोर मांडले. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपींना कठोर शिक्षा होण्यास मदत झाली. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये काटेकोर तपास, सक्षम पुरावे व प्रभावी न्यायालयीन पाठपुरावा यामुळे दोषींना शिक्षा मिळवून देण्यात लातूर जिल्हा पोलीस दल सातत्याने यशस्वी ठरत असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे.

## लातूर शहरात 'महाराजस्व अभियान' उत्साहात

### विविध शासकीय योजनांचा २ हजार नागरिकांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर शहरासाठी गिरवलकर मंगल कार्यालय येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, प्रभारी गटविकास अधिकारी सतीश चोरमले, नगरसेवक सतीश साळुंके आणि फिरदोस अरीफ शेख-साकोळकर यांच्यासह विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या शिबिरामध्ये एकूण १२ विभागांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते, ज्याद्वारे नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत प्रलंबित बँक केवायसी पूर्ण करण्यासोबतच नवीन अर्जांसाठी मार्गदर्शन करण्यात आले, तर पुरवठा विभागामार्फत डिजिटल रेशन कार्डचे वाटप आणि दुरुस्तीबाबत माहिती देण्यात आली. महसूल विभागाने नागरिकांना जिवंत व डिजिटल सातबाराचे विनामूल्य वाटप केले, तसेच रहिवासी, उत्पन्न आणि जातीच्या प्रमाणपत्रांचे नवीन अर्ज स्वीकारले. भूमी अभिलेख विभागामार्फत लातूर मंडळातील ७ गावांचे नकाशे संबंधित ग्रामपंचायतींना सुपूर्द करण्यात आले असून पी.आर. कार्ड आणि मोजणीबाबत माहिती देण्यात आली.

कृषी विभागाने पी.एम. किसान, महाडीबीटी आणि 'महाविस्तार--ख' प यांसारख्या आधुनिक योजनांची माहिती दिली, तर आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या विशेष कॅम्पमध्ये रक्ताची व रक्तदाब तपासणी करण्यासोबतच 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा फुले जन आरोग्य' योजनेविषयी माहिती देण्यात आली. महावितरण विभागाने 'मागेल त्याला सोलर' आणि 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज' योजनेसाठी नागरिकांकडून अर्ज भरून घेतले. महिला व बाल विकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना आणि बेबी केअर किटबाबत मार्गदर्शन करून गरोदर मातांना आहार योजनेची माहिती देण्यात आली. याशिवाय घरकुल योजना आणि वन विभागाच्या योजनांचे स्टॉल्सही नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. एकूण १६५ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, शहरातील सुमारे २ हजार नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

## यशवंत विद्यालयाचे घवघवीत यश

### (१००% चे १० विद्यार्थी तर ९५ टक्के ५२ विद्यार्थी.)

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. ९ मे :** येथील यशवंत विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेत यंदा अभूतपूर्व यश संपादन करत आपली उज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेचा एकूण निकाल तब्बल ९८.५० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेचे प्रदर्शन केले आहे.

यंदाच्या निकालातील विशेष बाब म्हणजे तब्बल १० विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. शंभर टक्के गुण प्राप्त करणारे विद्यार्थी असे वैष्णवी फड, उत्कर्ष धामणगावकर, दिपाली अंभोरे, नैतिक उगिले, सृष्टी उपासे, संध्याराणी भगनुरे, मुकुंद केंद्रे, रुचिता तुळजापूरकर, सुप्रिया मुंढे आणि सतीश हंगरगे आदिनी १०० टक्के गुण घेऊन यश संपादन केले आहे. तसेच साधना बेधडे (९९.८०), ऋतुजा ढाकणे (९९.६०), मुकुंद केंद्रे (९९.६६), अर्जुन वळसे (९९.२०), माधुरी मुंढे (९९.२०), वैष्णवी मुंढे (९९.००), विष्णुप्रिया पाटील (९८.८०), यश डुडुरे (९८.८०), वैष्णवी नागरगोजे (९८.६०), मानसी बेंद्रे (९८.६०), स्नेहल बिलापट्टे (९८.६०), प्रथमेश मोरे (९८.४०), प्रतीक उगीले (९८.००), श्रावणी बडगिरे (९८.००), जय काडवदे (९७.८०), अक्षरा रोकडे (९७.६०), श्रेयश सावरगावकर (९७.६०), सर्वांगी कोसलगे (९७.४०), यश नागरगोजे (९७.२०) आणि आदित्य तेलंगे (९७.२०) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

या परीक्षेत ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ५२ विद्यार्थी, तर ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ९८ विद्यार्थी असून त्यांनी शाळेच्या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.